**पंचायतराज संकल्पनेचा उदय**: देशातील बहुसंख्य लोक ग्रामीण भागात राहत असल्याने भारताला खेडयाचा देश म्हणून ओळखल्या जाते. खेडयाचा विकास करण्याच्या उद्देशाने पंचायतराज या संकल्पनेचा उदय हा आज झालेला नाही तर प्रचिनकाळापासुन झालेला आहे. ही संकल्पना प्राचिन आहे. भारतातील पंचायतराज संकल्पनेचा पाया स्वातंत्र्यपूर्व भारतात घातला गेला. लार्ड रिपन या ब्रिटिश अधिका-याने भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था १२ मे १८८२ ला सुरू केली. पंचायतराज या संकल्पनेचा विचार करता आपणास असे म्हणता येते की देशात पुर्वी जातीनिहाय व्यवसाय केले जात होते व समाजात जातीव्यवस्था ही प्रभावी मानल्या जात होती. त्यामुळे जातीव्यवस्था समाजाचे एक महत्वपुर्ण अगं तथा समाजाचे एक प्रभावी वैशिष्ट होते. गावात जातपंचायतीच्या कार्यावरूना गावातील लोकांवर एक प्रकारे नियत्रंण ठेवल्या जात होते. जातीच्या समस्या व भांडणे एक प्रकारे सोडविल्या जात होते. जातपचांयतीच्या माध्यमातुन गावात एक प्रकारे नियंत्रण व सुरक्षा ठेवण्यात महत्वपुर्ण भुमिका होती. स्वातंत्र्याच्या काळात राष्ट्रपिता महात्मा गांधीनी ग्रामीण जीवनाबाबत म्हणाले की 'खरा भारत पहायचा असेल तर तो ग्रामीण भागात आहे'. ग्रामीण जनतेला अज्ञान व वंचिततेपासून मुक्त करणे आवश्यक आहे. खेडे आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी आणि संपन्न करावयाची असेल तर राज्याला स्वतःचे एक ग्राम उद्योग धोरण असणे आवश्यक आहे तरच समृध्द गाव संपन्न ग्रामस्थ ही संकल्पना साकारता येऊ शकते. ग्रामीण समाजाच्या विकासासाठी व प्रशाशनात जनतेचा सहभाग वाढविण्या करीता १९५२ मध्ये सामुदायीक विकास योजना आणि १९५३ मध्ये राष्ट्रीय विस्तार सेवा हा कार्यक्रम सुरू केला व यांचे मुल्यमापन करण्याकरीता बळवंत मेहता समिती १९५७ ला स्थापन करण्यात आली. देशात समान विकास कार्यक्रमाचा परिपुर्ण अभ्यास करूण काही शिफारशी सुचविल्या. महाराष्ट्र राज्य १ मे १९६० रोजी अस्तित्वात आले. महाराष्ट्रात पंचायतराज च्या संदर्भात वंसतराव नाईक समिती नेमण्यात आली व या समितीने सुचविलेल्या शिफारशीच्या आधारे महाराष्ट्र, जिल्हा परिषद, पंचायत समिती अधिनियम १९६१ ला कायदा तयार करून १ मे १९६२ पासून महाराष्ट्रात पंचायतराज पध्दतीस सुरूवात झाली. पंचायतराज पध्दत ग्रामीण विकासाच्या दृष्टीकोणातील एक महत्वपुर्ण पाऊल मानले जाते. देशात पंचायतराज हे नाव स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी दिले. देशात पंचायतराज ही संकल्पना प्रथमतः राज्यस्थान सरकारने सुरू केली नंतर आंधप्रदेश तर महाराष्ट्र राज्य सरकार नववे पंचायतराज संकल्पना राबविणारे राज्य ठरले. बलवंतराय मेहता हा पंचायतराज संकल्पनेचा प्रणेता म्हणून ओळखल्या जातो. २४ एप्रिल १९९३ ला ७३ व्या घटना दुरूस्ती करून भारतीय पंचायतराज व्यवस्था संवैधानिक ठरविण्यात आले. करीता २४ एप्रिल हा दिवस राष्ट्रीय पंचायत राज दिन म्हणून साजरा केला जातो.

**पंचायतराज या संकल्पनेचा उद्देश**: पंचायतराज ही संकल्पना त्रिसुत्री संकल्पना आहे. ज्यात ग्रामीण पातळीवर ग्रामपंचायत, तालुका स्तरावर पंचायत समिती, जिल्हा स्तरावर जिल्हा परिषद यांच्या माध्यमातुन ग्रामीण जनतेला गावाचा सरपंच, पंचायत समिताचा सभापती, जिल्हा परिषदेचा अध्यक्ष होता येते. गावाच्या विकासाची संधी पंचायतराज व्यवस्थेमुळे प्राप्त झाल्याने गावाच्या विकासाच्या दृष्टीकोणातुन अनेक शासनाच्या योजना राबवुन गावाचा विकास करण्याचे ध्येय स्थानिक प्रशाशनाकडे असल्याने ग्रामीण समुदायाचा विकास करणे, कृषी उत्पादनात वाढ करणे, ग्रामीण समाजात सामुदायिक भावनांचा प्रचार व प्रसार करणे, शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार करणे, ग्रामीण आरोग्य आणि स्वच्छतेकडे लक्ष देणे, ग्रामीण लोकांना आत्मनिर्भर आणि प्रगतशील होण्याची प्रेरणा देणे, उत्पादनाच्या पध्दतीमध्ये विकास करणे, महिलांना आत्मनिर्भर बनविणे, कुटीर उद्योगांना प्रोत्साहन देणे, या सारखे महत्वपुर्ण उद्देष पंचायतराज या संकल्पनेचे असल्याने गावाचा विकास पंचायतराजच्या माध्यमातुन करता येते.

**पंचायतराज व्यवस्थेचे ग्रामीण विकासात योगदानः**

१. ग्रामीण समाजाचे पुनर्रचना करणे हे पंचायतराजचे उद्देष असल्याने व पंचायतराज या संकल्पनेचा संबध ग्रामीण समाजाशी येत असल्याने गावाच्या विकासाला एक नवी दिशा देण्यास पंचायतराजची भुमिका महत्वपुर्ण ठरली आहे.

२. पंचायतराज व्यवस्थेमुळे गावातील युवकवर्गाला नेतृत्व करण्याची संधी मिळाली. अनेक युवक ग्रामपंचायतीचे संरपच बनुन गावाच्या विकासाकरीता शासनाच्या योजना राबवुन गावाचा विकास करताना दिसुन येते.

३. प्रत्येक ग्रामपंचायतीत ग्रामसभेची स्थापना करणे अनिवार्य करण्यात आल्याने ग्रामपंचायतीत लोकांना आपले प्रश्न मांडण्याची संधी मिळाली.

४. पंचायतराज व्यवस्थेमुळे महिलाना ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद या तिन्ही स्तरावर महिलांना आरक्षण ठेवण्यात आल्याने अनेक महिलांना राजकारणात आपला ठसा उमटविता आला. पंचायत राज व्यवस्थेमुळे गावातील स्त्रीयांना राजकीय नेतृत्व करण्याची संधी प्राप्त झाल्याने गावाच्या विकासा करीता महिलांचा सिहांचा वाटा असल्याने यातुन एकप्रकारे गाव विकासास चालना मिळाली.

५. पंचायतराज व्यवस्थेमुळे ग्राम विकासाला नवी दिशा मिळाली. अनेक गावाचा कायापालट घडुन आला. पंचायतराज व्यवस्थेमुळे अनेक गाव राज्यात आदर्श गाव ठरण्यास पंचायतराजची भुमिका महत्वपुर्ण मानली जाते.

६. पंचायराजमुळे शिक्षण, आरोग्य, पाणी, रस्ते या गावातील मुलभुत गरजा लक्षात घेवुन या योजना गाव विकासाच्या दृष्टीकोणातुन गावा गावात राबविण्यात येत असल्याने गावाचा विकास आज घडुन येत आहे.

७. पंचायतराज या संकल्पनेच्या निर्मितीमुळे गावात तंटामुक्ती व इतर विविध समिती स्थापन करून गावात एक प्रकारे लोकांमध्ये सलोख्याचे संबध उदयास आले व तसेच 'आपले गाव आदर्श गाव' ही संकल्पना उदयास आली.

८. शासनाने आपले गाव स्वच्छ गाव, हागणदारी मुक्त गाव, तंटामुक्ती गावा करीता लाखोचे पारितोषिके जाहिर केल्याने अनेक गावे आपल्या गावाला पारितोषिक मिळावे या करीता गावा-गावात स्वच्छतेबाबत एक प्रकारे स्पर्धा होऊ लागल्याने अनेक गावाचा चेहरा मोहरा आज बदलल्याचे चित्र पाहायला मिळते आहे.

९. ग्राम विकासाच्या दृष्टीकोणातुन गावात ग्रामसमृध्दी योजना आज पंचायतराज च्या माध्यमातुन गावात राबविल्या जात आहे व यातुनच एक प्रकारे गावाचा विकास घडुन येत आहे.

१०. पंचायतराज संकल्पनेमुळे महिलांना विविधक्षेत्रात कामकरण्याची संधी मिळाल्याने आज गावापातळीवर महिला सक्षमीकरण होत आहे.

११. पंचायतराज व्यवस्थेमुळे दर पाच वर्षांनी निवडणुक घेतली जात असल्याने गावातील अनेकांना राजकीय क्षेत्रात संधी मिळत आहे व एक प्रकारे गावात राजकीय सबलीकरणास चालना मिळाली आहे.

१२. पंचायतराज हे एक सामुदायीक योजनेचे एक माध्यम असल्याने ग्रामीण विकासाच्या दृष्टीकोणातुन पचांयतराजची भुमीका महत्वाची आहे.

१३. पंचायतराजच्या विविध योजनामुळे विकासाची गंगा ग्रामस्तरापावेतो पोहल्याने आज गावाचा विकास होत आहे या मध्ये कोणतेही दुमत नाही.

१४. पंचायतराज व्यवस्थेमुळे लोकांमध्ये आत्मनिर्भर, स्वावलंबी व स्वंयपुर्ण बनण्याची वृत्ती महिला, युवक व लोकांमध्ये वाढली आहे.

१५. पंचायतराज मुळे लोकांना स्थानिक विकास घडवून आणण्याची संधी मिळाली.

१६. पंचायतराज मुळे लोकांमध्ये सामाजिक दायित्वाची जाणीव निर्माण झाल्याने लोक एकमेकांना सहकार्याच्या भावनेतुन एकमेकाना मदत करू लागले आहेत.

१७. संविधानाच्या ७३ व्या घटना दुरूस्तीने त्रिसुत्रीय पंचायतराज या संकल्पनेच्या माध्यमातुन गावातील स्थानीय ग्रामपंचायत प्रमुख, सभासद गावाचा कारभार चालविताना स्थानीय सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक प्रश्न लक्षात घेऊन त्याचे निराकरण करण्याची संधी मिळाली. पंचायतराज हे सामुदायीक विकासाचे एक महत्वाचे माध्यम ठरलेले आहे. पंचायतराज या संकल्पनेमुळे ग्रामीण विकासास चालना मिळाली.

**निष्कर्ष**: ७३ वी घटना दुरूस्ती मुळे ग्रामीण समाजाच्या विकासात्मकदृष्टीने देशात त्रिसुत्री पंचायतराज व्यवस्थेची निर्मिती करण्यात आली. ज्यात ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद यांचा समावेश त्यात करण्यात आला. पंचायतराज संकल्पनेमुळे ग्रामीण समाजाच्या विकासाला चालना मिळाली. ग्रामीण महिलावर्गाला राजकारणात भाग घेण्याची संधी मिळाली. मागास समजल्या जाणा-या वर्गाना सदस्य, सभापती, अध्यक्ष बनण्याची संधी मिळाली. पंचायतराज पध्दतीमुळे ग्रामीण युवकांना गावाचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली. पंचयातराज व्यवस्थेमुळे गावाच्या विकासाकरीता गावा-गावात स्पर्धा निर्माण होवु लागली. गावातील स्पर्धा ही विकासाच्या दृष्टीने महत्वाचे ठरले आहे. पंचायतराज व्यवस्थेमुळे गावात विविध कल्याणकारी योजना राबविल्या जात आहे व या कल्याणकारी योजनेचा लाभ गावातील दीन-दलित व मागास समजल्या जाणा-या वर्गाना होत आहे. पंचायतराज व्यवस्थेमुळे महिलांच्या सक्षमीकरणास चालना मिळाली.

***संदर्भः***


*१. भारतीय समाजरचनाः पारंपारिक व आधुनिक, बोबडे, डॉ. प्रकाश, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९४.*

*२. ग्रामीण आणि नागरी समाजशास्त्र, आगलावे डॉ. प्रदिप, साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००२.*

*३. समाजशास्त्र, सेट / नेट, पेपर ३ रा, प्रा.घायाळ एस. प्रभू, श्री. गुरू समर्थ प्रकाशन शिरूर ताजबंद ता. अहमदपूर.*

*४. लोकसत्ता, चतुरंग, पंचायतराजः स्त्री नेतृत्वाचा यु टर्न, साधना तिप्पनाकजे, दि. ९ ऑक्टोबर २०२१.*

*५. द नॉर्थ पोल, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, लाखांदूर द्वारा आयोजित विदर्भ मराठी समाजशास्त्र परिषदेचे दुसरे राज्यस्तरीय अधिवेशन विशेशांक दि. ०५ व ०६ जानेवारी २०१२.*

# अंतिम सत्यः एक विवादात्मक प्रश्न

*डॉ. भारत वालोंद्रे, तत्त्वज्ञान विभाग प्रमुख, नबीरा महाविद्यालय, काटोल.*

विश्वाचे अंतिम सत्य कोणते? हा प्रश्न आजही तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात विवादात्मक प्रश्न आहे. कारण सृष्टी च्या संदर्भात काहींनी एक तत्त्व, काहींनी दोन तत्त्वे, तर काहींनी दोन पेक्षा जास्त तत्त्वे मानलेली आहेत. सृष्टी चे अंतिम मुलद्रव्य वेगेगळे मानल्यामुळे त्याविषयी विभिन्न वाद असल्याचे दिसून येतात. अंतिम सत्याविषयी ज्यांनी एक तत्त्व मानली ते एकतत्त्ववादी अर्थात अव्दैतवादी, ज्यांनी दोन तत्त्वे मानली ते व्दैतवादी, व ज्यांनी दोन पेक्षा जास्त तत्त्वे मानली ते अनेकतत्त्ववादी विचारधारा म्हणुन प्रसिद्ध पावली आहे.

तत्त्वज्ञानाचा उगम ग्रीक अथवा युरोप, युनानी देशातुन झाला. ज्याचे पडसाद भारतीय तत्त्वज्ञानावर पडल्याचे दिसून येतात. उपनिषदकारांनी अर्थात वेदांतानी विश्वकर्मा अर्थात ब्रम्हाची सत्ता ही एकच मानली. अशाप्रकारची सत्ता प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञ पार्मेनायडीस (५४०-४७० ई.पु.) यांनीही एकच मानलेली आहे. त्यांच्यामते सत्ता जशी आहे तशीच आहे. त्याला त्यांनी सता (Being) असे म्हटले आहे. यांनी प्रत्येक वस्तु परिवर्तनीय आहे. या मताचा विरोध केला. प्रत्येक वस्तु जशा असतात. त्या तशाच राहतात. त्यात कोणतेही परिवर्तन होत नाही. अशी सत्ता केवळ एकच आहे. जी सत् असत् ठरत नाही. ज्याप्रमाणे वेदांताने ब्रम्हाची सत्ता एक मानली त्याचप्रमाणे पार्मेनायडीसनेही एकमेव सत्ता मानली आहे. याचबरोबर विश्वाचे अंतिम सत्य म्हणून स्पिनोझानेही एक द्रव्य मानले आहे. हाच विचार जेनोफेनीस (५७०-४८० ई.पु.) यानींही व्यक्त केलेला आहे. त्यांनी ईश्वराला नित्य मानुन बहुदेववादाचा विरोध केला. या एकतत्त्ववादाला सर्वेश्वरवाद म्हणूनही ओळखले जाते. विश्वाचे सार, द्रव्य अथवा वस्तु एकच आहे. हा एकतत्त्व वादी विचार अव्दैतवादी विचारधारेनेही मांडला. झेनो (४९०-४३० ई. पु.) हा ही बहुतत्त्ववादी (Pluralism) विचारधारेच्या विरोधी होता. त्यांच्यानुसार संपुर्ण एकतत्व विभिन्न संख्येत वाटल्या जाऊ शकत नाही. अशी सता एकच असुन ह्या सत्तेला गती नाही, तसेच आरंभही नाही. या झेनो प्रमाणेच मेलिसस (५००-४४० ई.पु.) यानीही सत्ता एकच मानली आहे. अशी सत्ता अनंत अशी असते असे त्याचे मत आहे. परंतु यांच्या ब्रम्हवादाच्या अथवा एकतत्ववादाच्या विपरीत जॉर्जियसने (४४०-३८०ख्रि. पु.) सत्य हे सापेक्ष मानले. त्यांच्यामते निरपेक्ष सत्य अशक्य आहे. तर कोणतेही सत्य असेल तर ते सापेक्ष असते. जे जाणता येते हा त्यांचा विचार अनेक्सगोरस प्रमाणेच असल्याचे आढळते.

भारतीय तत्त्वज्ञानातील सांख्य विचारधारा सृष्टी च्या निर्मितीस दोन तत्त्व मानणारी आहे. त्यांच्यानुसार पुरुष व प्रकृती या दोन तत्वापासून सृष्टी निर्माण होते. ही त्यांची विचारसरणी व्दैतवादी (Dualism) म्हणून ओळखल्या जाते. सांख्यांनी पुरुष व प्रकृती ही दोन तत्वे मानलेली असुन ते प्रकृतीच्या ठिकाणी पंचविस तत्वाची गणना करतात. तर योग दर्शनानी सांख्याच्या पंचविस तत्वात ईश्वर नावाच्या तत्वाची भर घालून ते सव्वीसावे तत्व स्वीकारतात. म्हणून त्यांना सेश्वरसांख्य असे संबोधिले जाते.

याशिवाय भारतीय तत्त्वज्ञानातील न्याय-वैषेशिकांनी सृष्टी चे अंतिम तत्व अनेक मानली आहेत. त्यांच्यानुसार सृष्टीच्या निर्मितीसाठी एक किंवा दोन तत्वे कारणीभूत नसुन अनेक तत्व कारणीभूत ठरतात. ही त्यांची विचारसरणी अनेकतत्त्ववादी विचारसरणी म्हणून ओळखली जाते. यांनी सृष्टीच्या निर्मितीस सात तत्वे व नऊ पदार्थांची गणना केली आहे. अनेक्जगोरस (५००-४२८ ई.पु.) नुसार पृथ्वी, जल, तेज व वायु या चार द्रव्यात असंख्य द्रव्याचे मिश्रण आहें. प्रत्येक द्रव्य असंख्य परमाणूचे (Atoms) आधार आहेत. ते म्हणतात की, निरपेक्ष परिवर्तन अशक्य असून परिवर्तन हे सापेक्ष असते. असा प्रथम निरीश्वरवादी किवा विज्ञानवादी विचार अनेक्जगोरस यांनी व्यक्त केला. डेमाक्रिटस (४६०-३७० ई. पु.) यांनी विश्वाविषयी चा परमाणूवादाच्या सिद्धांताचे समर्थन केले. त्याच्यानुसार परमाणू अतीसुक्ष्म असून त्यात गती, संयोग वियोग राहात नाही. हाच विचार वैषेशिकांनीही मांडलेला दिसतो.

पाश्चात्य तत्वज्ञानात ग्रीक विचारवंत थेलिस (६२४-५५० ख्रि.पु.) यांनी विश्वाचे परमतत्त्व या अंतिम तत्त्व (Ultimate Substance) 'जल' याला मानले. त्यांच्यानुसार जल हे वाफेत परिवर्तित होवून अग्नि निर्माण करते. जलापासूनच जगातील विविध वस्तुंची उत्पती होते. जल हे सर्व जीवांचा आधार आहे. या अर्थाने थेलिस 'जल' याला परमतत्त्व मानतात. तर एनेक्जिमेनीजने (५८५-५२८ ख्रि.पु.) विश्वाचे परमतत्व 'वायु' ला मानले. वायु समस्त जीवांचा सार (Essance) तसेच जीवांचा मुल आधार आहे. वायु शिवाय कोणताही जीव जीवित राहु शकत नाही. त्यांनी श्वासालाच, प्राणवायुलाच आत्मा म्हटले. हेरेक्लाइट्स (५३८-४७५ ख्रि. पु.) ने विश्वाचे परमतत्व 'अग्नि' ला मानले आहे. त्यांच्यानुसार अग्नि हिच समस्त परिवर्तनाचा मुल आधार आहे. ते म्हणतात की, हे विश्व परिवर्तनाच्या अवस्थेत आहे. जगातील कोणतीही वस्तु स्थिर नाही. वस्तुचे स्थायित्व वास्तवात भ्रम आहे. ते अग्नि या परमतत्वाविषयी म्हणतात की, अग्नि जल व पृथ्वीत बदलते आणि पृथ्वी परत जल तसेच अग्नित परिवर्तीत होते. हा परिवर्तनाचा क्रम चालुच राहतो. हेरेक्लाइट्स प्रमाणे हाच विचार बुद्धांनी (५६३-४८३ ख्रि.पु.) मांडलेला आहे. त्यांच्यानुसार संपुर्ण जग परिवर्तनीय अथवा परिवर्तनशील आहे. बुद्धानुसार जल, वायु, अग्नि व पृथी हे केवळ एकेकच तत्व सृष्टीच्या निर्मितीस कारणीभुत ठरत नसुन पृथ्वी, जल, तेज व वायु या चार द्रव्याच्या समिश्रणातुनच हि सृष्टी निर्माण झालेली आहे. असा विज्ञानवादी दृष्टीकोन त्यांनी मांडला. एम्पेडोक्लीज (४९५-४३५ ख्रि. पु.) यांनी हि अंतिम तत्त्व पृथ्वी, जल, तेज व वायु हे चार महाभूत मानली. परंतु त्यांनी हे चारही तत्त्व सत् असुन अविनाशी तसेच अपरिवर्तनीय मानली. हे चार महाभूत

परमाणू रूप आहेत. हे त्यांचे विचार बुद्धाच्या विसंगत असल्याचे दिसते. विज्ञान असे सांगते की, या विश्वाच्या ठिकाणी जी ऊर्जा आहे. (Energy) ती कधीही न संपणारी आहे. ती इकडुन तिकडे परावर्तीत होणारी आहे. परंतु हि ऊर्जा नष्ट होत नाही. ती कायम स्वरूपी असते. हिलाच तत्वज्ञानात काहींनी ईश्वर, काहींनी आत्मा तर काहींनी परमात्मा, परमतत्व अशा विविध नावांनी संबोधिले आहे. अनेक्सगोरस (५००-४२८ ख्रि. पु.) नुसार पृथ्वी, जल, तेज व वायु या चार द्रव्याचे मिश्रण आहे. प्रत्येक द्रव्य असंख्य परमाणुचे (Atoms) आधार आहे. त्यांच्यामते निरपेक्ष परिवर्तन अशक्य असून ते सापेक्ष परिवर्तन असते.

तिसऱ्या-चवथ्या शतकात ज्ञानमीमांसेचा उदय झाला. ज्यात सर्वात प्रथम सुकरात अर्थात साक्रेटीसने (४७०-३९९ ख्रि. पु.) ज्ञानाचा सिद्धांत मांडला. त्यांनी मनुष्याच्या आचरणावर व सदगुणावर भर दिला. सुकरातनी मित्रांशी वाद-विवाद करून ज्ञानाचा सिद्धांत प्रतिपादीत केला. त्यांच्यामते ज्ञान हे सर्वोत्तम शुभ आहे. त्यांनी ज्ञानालाच परमशुभ मानले. ज्ञान हेच सदगुण मानले. पुढे सुकरातचा शिष्य प्लेटो (४२७-३४७ ख्रि. पु.) यांनीही ज्ञानाच्या सिद्धांताला अनुसरून प्रत्ययाचा सिद्धांत मांडला. त्यांच्यानुसार प्रत्यय हे मुलद्रव्य असून अनंत असे आहेत. ते सार्वभौम असतात. ते ज्ञानाच्या संदर्भात असे म्हणतात की, प्रत्ययाचे ज्ञान हे खरे ज्ञान असुन इंद्रिय प्रत्यक्षाव्दारे होणारे ज्ञान खरे ज्ञान नाही. याच प्लेटोच्या प्रत्यय सिद्धांताचा आधार घेऊन अरस्तुने (३४८-३२२ ख्रि. पु.) त्यांनीही प्रत्ययालाच सार्वभौम सत्ता मानले आहे. जीला वास्तविक सत्ता म्हटले आहे. हि सत्ता अनुभवातीत (Transcendental) सत्ता असते. कोणते तरी प्रत्यय अथवा आकार आहे. जे पुद्गलामध्ये गती प्रदान करते. पुद्गल आपल्या आकार प्राप्ती करिता इच्छा करते. असे पुद्गल नित्य आहे. त्यात गतीही नित्य असते. हा गतीदाता ईश्वर आहे. असे ॲरीस्टाटल ईश्वराचे समर्थन करतांना दिसतात.

ज्ञानाचा सिद्धांत भारतात सर्वात प्रथम न्याय दर्शनांनी मांडला. ज्ञानासंबंधीची चिकित्सा अधिकतर न्याय दर्शनांनी जेवढी केली तेवढी इतर दर्शनांनी केली नाही. गौतम ऋषी, वात्स्सायन, अक्षपाद, उदयनाचार्य, उद्योतकर, जयंतभट्ट यांनी हे विचार प्रस्तुत केले. बौद्ध दर्शनातही ज्ञानासंबंधी नागार्जुन, असंग, वसुबंधु, दिड्नाग, व धर्मकिर्ती आदींनी विचार प्रस्तुत केले. हा ज्ञानमीमांसेचा प्रभाव पाश्च्यात्यांचा भारतीयांवर पडलेला दिसुन येतो.

आधुनिक पाश्चात्य तत्वज्ञ रेने देकार्तने (१५९६-१६५० ई.) जन्मजात प्रययाला आधार बनवुन आपला बुद्धिवाद मांडला. याच आधारावर त्यांनी आत्म्याची तसेच ईश्वराच्या सत्तेलाही मानले. स्पिनोजा (१६३२-१६७७ ई.) ने द्रव्याची ईश्वरासारखीच द्रव्याची परिभाषां केली. त्यांनी सार्वभौम द्रव्याची (Universal Substance) स्थापना केली. त्यालाच ईश्वराचे अस्तित्व म्हणून घोषित केले आहे. लायब्निजने (१६४६-१७१६ ई.) यांनी ज्ञानाचा सिद्धांत प्रतिपादीत करून असंख्य चिदाणूची (Monads) संकल्पना मांडली. ह्या चिदाणूचाही चिदाणू ज्याला तो ईश्वर चिदाणू असे संबोधितो. हा लायब्निजचा विचार वैषेशिकांच्या परमाणूवादाप्रमाणे आहे. देकार्तच्या बुद्धिवादाचा आधार घेवून जॉन, लॉक ने (१६३२-१७०४ ई.) अनुभववादाची स्थापना केली. त्यांनी देकार्तच्या जन्मजात प्रत्ययाचे खंडन केले. त्यांनी ज्ञानाची मर्यादा ठरवितांना जे जे इंद्रियांना दिसते. तेवढया पर्यंतच ज्ञानाची मर्यादा मानली आहे. हि त्यांची विचारसरणी चार्वाक तसेच बुद्धाच्या विचारांशी जुळणारी आहे. पुढे बर्क्लेनी जॉन, लॉक चा अनुभववाद मोडीत काढून आपला कल्पनावाद मांडला. त्यांनी इंद्रिय संवेदनातून प्राप्त होणाऱ्या अमुर्त कल्पनाचे खंडन करून मुर्त कल्पनाची स्थापना केली. मी विचार करतो, म्हणून मी आहे. या वचनाव्दारे त्यांनी आत्म्याच्या अस्तित्वाचे समर्थन केले. पुढे डेव्हिड हयुम् (१७१७-१७८६ ई.) ने अनुभववाद व कल्पनावाद या दोन्ही सिद्धांताची सांगड घालून त्यांनी संशयवाद मांडला. हयुमनी प्रत्येक गोष्टीवर संशय घेत आत्मवादाचे तसेच ईश्वरवादाचेही खंडन केले. त्यांनी देकार्तप्रमाणेच संशयवादाची पद्धत अवलंबुन आत्मवादाचे खंडन केले. कांटने (१७२४ ई.पु.) बुद्धिवाद व अनुभववाद या दोन्ही सिद्धांताची चिकित्सा करून, समिक्षा करून समिक्षात्मक ज्ञानाचा सिद्धांत प्रस्तुत केला. या सिद्धांतामुळे ते प्रसिद्ध ठरले. कांटचे नैतिक विचार मानवी मुल्ये जपणारे होते. ते म्हणतात की, मानवता तुमच्यात व्यक्त झालेली असो, की इतरात व्यक्त झालेली असो तीला सदैव साधन न समजता साध्य म्हणून समजायला पाहिजे. हे कांट चे नैतिक विचार बुद्धाच्या विचारांशी जुळणारे आहे.

विश्वाचे अंतिम तत्व कोणते? या प्रश्नाच्या संदर्भात पाश्चात्य तसेच भारतीय विचारधारेशी तुलना केल्यास असे आढळून येईल की, ज्याप्रमाणे विश्वाचे अंतिम तत्व पाश्चात्यांनी काहींनी जल, काहींनी वायु, काहींनी, अग्नि असे सृष्टी च्या निर्मितीस अंतिम मुलद्रव्य मानले. याचा जर विचार केला तर भारतीय देखिल सुरूवातीच्या काळात अग्नि, वायु व जल यांना पवित्र ठरवुन त्यांची पुजा करीत असत. हा प्रभाव ग्रीकांच्याच विचारांचा असावा हे नाकारता येत नाही. याशिवाय वैदिक काळात इंद्र देवता, वरूण देवताचीही पुजा केल्या जात असे. पण पुढे ह्या देवता कालांतराने कालबाह्य ठरविण्यात आल्या. नंतरच्या काळात ब्रम्ह, विष्णू व महेश या त्रयींना पुजण्याचा प्रघात आला. ह्या तीनही देवता सर्वमान्य ठरल्या. ज्यांचा प्रभाव आजही वैदिक तसेच हिंदु परंपरेवर असल्याचा दिसून येतो. 'ब्रम्ह' वादांनी या त्रयींचे समिकरण बनवुन जन सामान्यात आपली संस्कृती रूजविण्याचा आटोकाट प्रयत्न केला. संपुर्ण भारतीय संस्कृतीला ह्या तीन सुत्रांनी बंदिस्त केल्याचे दिसून येते. पुढे या देवतांना मुख्य आधार बनवुन स्त्री पुरुषांच्या स्वरूपावरून देवतांनाही तसे स्वरूप देण्यात आले. गणेश ला पुरुषांचे तर लक्ष्मीला स्त्री चे रूप देवुन त्यांची उपासना आजही होतांना दिसते. यासंदर्भात झिनोफेनिस असे म्हणतो की, जर बैलांना व पशु-पक्षांना बुद्धी असती तर त्यांनीही आपल्या देवांची रचना स्वतःच्या स्वरूपाप्रमाणे केली असती. हे झिनोफेनिसचे विचार बुद्धीवादी विचारवंतांना इशारा करणारे आहे.

भारतात जशी ईश्वरवादी व आत्मवादी परंपरा होती. तशीच परंपरा निरिश्वरवादी व अनात्मवादीही परंपरा होती. ह्या विचारधारेचा प्रसार-प्रचार चार्वाक तसेच बुद्धांनी अडीज

हजार वर्षापुर्वी केलेला होता. परंतु हि विचारधारा नेस्तनाबुत करण्यात आली. १८५ ई.पु. सम्राट अशोकाचा नातु राजा बृहदतांचा त्याचा सेनापती पृश्यमित्रश्रुंग यांनी त्याची हत्या करून गादीवर बसला. तेव्हापासुन बौद्ध धर्माच्या पतनाला सुरूवात झाली. जिथे बुद्धाला सम्यक ज्ञान प्राप्त झाले तेथील पुरावे नष्ट केलेत ते ठिकाण 'बुद्धगया' म्हणून प्रसिद्ध आहे. म्हणजे बुद्धाला इथुन हद्दपार केले. असा समज पसरविण्यात आला.

नंतरच्या काळात ईश्वरवाद तसेच आत्मवादाचा प्रसार करण्यासाठी महाराष्ट्रातील संत परंपरेचे विशेष उल्लेखनीय कार्य राहिलेले आहे. यापैकी बहुतांश संतांनी ईश्वरवाद तसेच आत्मवाद आपल्या अभंगवाणीतून जनमाणसात रूजविले. ज्यामध्ये संत नामदेव (१२७० ई.पु.), संत ज्ञानेश्वर (१२७५ ई. स.), श्री चक्रधर स्वामी (१२ वे शतक), संत तुकाराम (१६०८ ई.स.), समर्थ रामदास (१६८१ ई.स.), संत सावता (१२५० ई.स.), संत गोरा (१२६७ ई.स.), संत जनाबाई १३ वे शतक), संत मुक्ताबाई १२७९ ई.स.), संत चोखामेळा (१४ वे शतक), संत एकनाथ (१४५० ई.स.), संत तुकडोजी महाराज (१९०९ ई.स.), संत गाडगे महाराज (१९०७ ई. स.), या संतांनी तीन संप्रदायात आपले कार्य केल्याचे दिसून येतात. ते म्हणजे वैष्णव संप्रदाय, महानुभाव संप्रदाय व वारकरी संप्रदाय यांनी भरीव असे योगदान दिले. यापैकी संत नामदेव, संत तुकाराम, संत चोखामेळा, संत तुकडोजी व संत गाडगे महाराज यांनी अंधश्रद्धा व जातीभेद निर्मुलनासाठी विशेष असे योगदान दिलेले आहे.

१८ व्या तसेच १९ व्या शतकात पाश्चात्य विचारसरणीत मानवतावादी विचारधारा उदयास आली. ज्यात आवर्जून जॉन स्टुअर्स मिल (१८०६-१८७३इ.) व जेरेमी बेंथम (१७४८-१८३२) यांच्या सिद्धांताची छाप जनसामान्यावर पडल्याचे दिसून येते. त्यांच्या विचारधारेंनी भांडवलशाही व कारखानदार यांच्या विरोधात बंड करून जनसामान्याच्या हिताची विचारसरणी म्हणून प्रसिद्ध ठरली. पुढे पाश्चात्य विचारसरणीत बर्टन्ड रसेल (१८७२-१९७०) ने विश्वाच्या अंतिम मुलद्रव्याविषयी अथवा सृष्टीच्या अंतिम सत्याविषयी जो निर्वाळा दिला. तो विज्ञाच्या कक्षेत बसणारा आहे. त्यांनी केलेले विश्लेषण बुद्धिला पटणारे आहे. या त्यांच्या विचारांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यांनी लिहिलेल्या 'प्रिन्सीपल ऑफ सोसल रिकन्ट्रशन' या ग्रंथांनी देखिल प्रभावित झालेले होते. बाबासाहेब आंबेडकरोचही संघर्ष मानव मुक्तीच्या कल्याणसाठीच होता. त्यामुळे मिल, बेंथम व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची लढाई ही मानवी अधिकारांचीच होती. हे निर्विवाद सत्य आहे. हे कोणीही नाकारू शकणार नाही.

मुख्य प्रश्न हा पडतो की, ईश्वरावर तसेच आत्म्यावर विश्वास ठेवणारे, देवतांची सगुण तसेच निर्गुण अशा दोन्ही रूपातून उपासना करतांना दिसतात. त्यांनी सगुणाची उपासना करावी की, निर्गुणांची उपासना करावी. हा त्यांच्यासाठी संभ्रमात पाडणारा प्रश्न आहे, असेच म्हणावे लागेल. ते या द्विधेतून आजही बाहेर पडलेले दिसत नाही. हा त्यांचा संभ्रम केव्हा दुर होईल? असा यक्ष प्रश्न आजही बुद्धिवादी विचावंतासमोर पडतो.

**निष्कर्ष**: १. पाश्चात्य व भारतीयांत एकतत्व व अनेकतत्ववादाविषयी बरेच साम्य असल्याचे दिसते. २. मुलतत्वाविषयी जी भिन्नता पाश्चात्यात आहे. तीच भिन्नता भारतीयांतही आढळते. ३. ईश्वरवाद व आत्मवाद हा विचार भारतीय तसेच पाश्चात्यातही दिसतो. ४. पाश्चात्य तसेच भारतीयांत सृष्टीच्या परीवर्तनाचाही विचार आढळतो. ५. निरिश्वरवादी व अनात्मवादी विचारधारा फार प्राचिन काळापासून अस्तित्वात होती.

***संदर्भः***


*१. धर्मकीर्ति डॉ. (२००३), महान बौद्ध दार्शनिक, सम्यक प्रकाशन, नई दिल्ली-६३.*

*२. जैन प्रो. धर्मचन्द्र, (२००९), बौद्ध दर्शन में प्रमाण मीमांसा, बौद्ध अध्ययन केंद्र, जोधपुर.*

*३. शेराबात्स्की एफ. टी. (अनु.) राय रामकुमार, (१९६९), बौद्ध-न्याय, चैखम्बा विद्याभवन, वाराणसी-०१.*

*४. वर्मा प्रो. अशोककुमार, (१९९१), तत्त्वमीमांसा एवं ज्ञानमीमांसा, मोतीलाल बनारसीदास प्रा.लि, दिल्ली-७.*

*५. बिजल्वान डॉ. चक्रधर, (१९९८), भारतीय न्यायशास्त्र, उत्तर प्रदेश हिन्दी संस्थान, लखनऊ.*

*६. दामोदरन के., (२००१), भारतीय चिन्तन परम्परा, पीपुल्स पब्लिकेशन हाउस प्रा.लि., नई दिल्ली-५५.*

*७. देवराज डॉ., (२००२), भारतीय दर्शन, उत्तर प्रदेश हिन्दी संस्थान, लखनऊ-०१.*

*८. जाटव डॉ. डी. आर., (२००४), प्रमुख पाश्चात्य दार्शनिक, राजस्थान हिन्दी ग्रंथ अकादमी, जयपुर.*

# जी. आय. एस. व रिमोट सेन्सिंगचे भूगोलशास्त्रात महत्त्व

*डॉ. अरुणा बावनकर, भूगोल विभागप्रमुख, एस. एन. मोर महाविद्यालय, तुमसर*

**प्रस्तावना**: 'जीआयएस' हे एक प्रकारचे तंत्रज्ञान असून या प्रक्रियेद्वारे भौगोलिक गोष्टींचे संशोधन, विश्लेषण, नियंत्रण, व्यवस्थापन इत्यादीसंबंधी कार्यवाही केली जाते आणि भौगोलिक ज्ञानाची वृद्धी केली जाते. ही प्रक्रिया म्हणजे एकप्रकारची डाटा मॅनेजमेंट असून ती भौगोलिक ज्ञानाची कक्षा वाढवते आणि ज्ञान, शास्त्रीय शोध, रिसोर्स मॅनेजमेंट आणि विविध विकास योजना आखणे इत्यादींसाठी फार उपयोगी पडते. भौगोलिक आणि पर्यावरणविषयक माहिती प्राप्त करणे, संचित करणे, तिचे विश्लेषण करणे आणि प्रसारित करणे हे या प्रक्रियेचे प्रमुख उद्दिष्ट असते. यामध्ये अर्बन मॅपिंग, हायड्रोलॉजिक रोड नेटवर्क, हवामान-पर्यावरण घटक, सूर्यमालेचे प्रमाण, कृती इत्यादी माहितींचा समावेश असतो. अशा प्रकारची माहिती संकलित करण्याकरिता या प्रक्रियेत सर्वेक्षण, फोटो ग्रॅमॅटर, रिमोट सेन्सिंग, कार्टोग्राफ इत्यादी पारंपरिक पद्धतींचा अवलंब केला जातो. अशा माहितीचा, एकात्मिक पद्धतीचा उपयोग करून बहुस्पर्शी विज्ञान आणि तंत्रज्ञान पद्धती विकसित केली जाते. त्याद्वारे पृथ्वी आणि पर्यावरणविषयक खात्रिलायक माहिती विविध प्रकारच्या नोंदीतून संकलित केली जाते व आवश्यकतेनुसार उपयोगात आणली जाते. अशा प्रकारच्या माहितीला जिओरेफरन्सड् डाटा किंवा जिओस्पेशल डाटा असे संबोधले जाते.

मानवाचा जसजसा विकास होत गेला तसतसा त्याच्या संसाधना विषयीच्या गरजा वाढत गेल्या आणि या गरजा पूर्ण करण्यासाठी मानव नविन तंत्रज्ञानाचा विकास करु लागला. आज मानव निरनिराळया शास्त्राचा अभ्यास करून नविन तंत्रज्ञानाचा विकास करीत आहे.

नकाशाशास्त्राला प्राचीन काळापासून महत्त्वाचे स्थान आहे. प्राचीन नकाशाशास्त्रात आज अनेक बदल घडून आलेले आहे. याला कारण म्हणजे मानवानी केलेली तंत्रज्ञानातील प्रगती होय. आज भूगोल विषयाच्या ज्ञानाच्या शाखा रुंदावलेल्या आहे याला कारण म्हणजे भूगोलशास्त्रात नविन तंत्रज्ञानाद्वारे अभ्यास होत आहे.

भूगोल विषयास नकाशाशास्त्राला अनन्यसाधारण महत्त्व आहे. भूगोलाचा ९९ टक्के अभ्यास हा नकाशा, आकृत्या आलेखाद्वारा होतो. म्हणजेच नकाशाशास्त्र भूगोलशास्त्राचा कणा आहे. म्हणून Dudley Stampयांनी म्हटले आहे की, 'The Map is the Geography'नकाशा काढण्याच्या कलेला नकाशाशास्त्र Cartographyम्हणतात. या नकाशाशास्त्रात आधुनिक पद्धतीद्वारे नकाशा तयार करण्यात येत आहे. यामध्ये सदूर संवेदन आणि भौगोलिक माहिती प्रणाली याच्या साहयाने नकाशाशास्त्रात नविन बदल घडून आलेला दिसतो. त्यामूळे भूगोल शास्त्रात विविध क्षेत्रीय अनुषंगाने आजच्या विज्ञान व तंत्रज्ञानाच्या सोबतच भौगोलिक माहिती प्रणालीचे अतिमहत्त्वाचे तंत्र जगाला मिळाले आहे. नकाशाशास्त्रात हे एक महत्त्वाचे नवीन बदल आहे. जे १९६० च्या दशकापासूनच मानवाला उपयुक्त ठरत आहे.

**जि. आय. एस. भौगोलिक माहिती प्रणाली:** जि. आय. एस. हे एक प्रकारचे महत्त्वाचे तंत्रज्ञान असून त्या प्रक्रियेद्वारे भौगोलिक गोष्टीचे संशोधन, विश्लेषण, नियंत्रण व व्यवस्थापन इत्यादी संबंधी कार्यवाही केली जाते आणि भौगोलिक ज्ञानाचा साठा वाढत आहे. ज्ञानाचे कंगोरे असलेल्या या तंत्राची अफाट, प्रचंड विश्लेषण क्षमता असल्यामुळे त्यांचा भौगोलिक वापर वाढत आहे. माहितीच्या या प्रणालीत संगणक संहीता (Hardware) मुद्रांक (Printer) या सोबत संहिता (Software) इत्यादी घटकाचा समावेश असून त्याचे अवकाशीय सांख्यिकी (Data Spatial) सोबत तंत्रज्ञ इत्यादी.

भूगोलशास्त्र हा ज्ञानाचा शोध घेणारा एक अभिक्षेत्रीय दृष्टिकोन आहे व त्याला जोड म्हणून जी. आय. एस. (GIS) म्हणजेच भौगोलिक माहिती प्रणाली हे तंत्रज्ञान मिळाले आहे. हे तंत्रज्ञान १९६१ सालापासूनच जगभर मोठ्या प्रमाणावर उपयुक्त ठरत आहे. या तंत्राची विलक्षण क्षमता व वाढते उपयोजन यामुळे त्याची वैज्ञानिक जगात एक प्रगत शास्त्र म्हणून गणना होत आहे व त्याचा वापरही सर्वत्र वाढतो आहे.

या तंत्रज्ञानाचे विविध पैलू आहेत. पृथ्वीवरील पर्यावरणीय व परिस्थितिक प्रक्रियांचे मापन करणे तसेच भूपृष्ठीय, वातावरणीय आणि जैविक माहितीसंबंधीची सांख्यिकी माहिती मिळवणे हे काम असल्यामुळे या प्रणालीला भौगोलिक माहिती प्रणाली असे म्हटले आहे.

भारताला या तंत्रज्ञानाचा फार मोठा फायदा झाला आहे. भारतीय उपग्रह मालिकांमुळे उपलब्ध होणा-या उपग्रह प्रतिमांचा भूजल संचय, भूमिउपयोजन, आपत्तिजनक घटक यांचे अचूक मूल्यमापन होत असते. जी.आय.एस. तंत्रात जमिनीचा कस, आर्द्रता, उतार पिके व तसेच वितरण अशा विविध घटकांच्या संदर्भात सांख्यिकी गोळा केली जाते. जी.आय.एस. तंत्रज्ञानात दूरस्थ संवेदन, संगणक उपग्रह प्रतिमा व इंटरनेट या साधनांचा सिंहाचा वाटा आहे. यामुळे भूगोलशास्त्र अधिक विकसित झाले आहे.

जी.आय.एस. चा सर्वप्रथम वापर १९६० मध्ये कॅनडातील जमिनीच्या मूल्यमापनातील एका प्रकल्पात झाला आहे. त्याच वेळी अमेरिकेतही लोकसंख्येचे वितरण, संपर्क साधन, मार्गाचे वितरण यासंबंधीच्या सांख्यिकीचे विश्लेषण करण्यात आले. आज मात्र या तंत्राचे जाळे सर्व जगभर पसरले आहे.

जी.आय.एस. संदर्भात अनेक संगणक प्रणाली व प्रतिमाने उपलब्ध असल्यामुळे त्यांचा वापरही प्रदूषणाची तीव्रता, नदी-खोरे नियोजन, पूर, भूमिपात यासारख्या आपत्तींचा अभ्यासही अधिक परिणामकारक होत असतो.

**जी. आय. एस. चे महत्त्वपूर्ण घटक**: GIS यंत्रणेची प्रमुख तीन वैशिष्टे लक्षात येतात. १. संगणक प्रणाली म्हणजेच संगणक वाचक व विश्लेषण प्रणाली. २. भौगोलिक सांख्यीकी प्रणाली. ३. सांख्यिकीचे विश्लेषण व पृथक्करण करणाची प्रणाली.

संगणक प्रणालीत संगणक मुद्रांक व आरेख याचा समावेश होतो. याद्वारे नकाशाशास्त्र, संगणकशास्त्र, पर्यावरणशास्त्र, जीओएसी, भूदृश्य स्थापत्य, हवाई छायाचित्र, मापनशास्त्र, संख्याशास्त्र व सर्वेक्षण इ. संबंधीचा अभ्यास करणारे तंत्र आहे.

**नकाशाशास्त्रीक कार्ये:** Cartography function हे जि. आय. एस. चे प्रमुख कार्य आहे. आधारसामुग्रीच्या आधारावर नकाशाशास्त्राच्या अनेक पैलूंची कुशल हाताळणी येथे होते. भौगोलिक आधारसामुग्री हाताळणीनुसार जि. आय. एस. चे सर्वसाधारण दोन गट पडतात.

आचार-संदिश GIS (Base Vector GIS)

आधार जाळी GIS (Base Rester GIS)

यांचे एकमेकात रुपांतर करणे, प्रमाणे बदल (Scale Changes) प्रक्षेपण बदल (Projection Changes) नकाशा सौंदर्यवर्धन (Map Embellishment) मध्ये प्रमाण, मथला, उत्तर बिंदु, संकेत सूची इत्यादीचा नोंदीचा समावेश होतो.

**सुदूर संवेदन (Remote Sensing) :** रिमोट सेन्सिंग सुदर संवेदन ही एक कला आणि शास्त्र आहे. रिमोट सेन्सिंगमध्ये आकडेवारिच्या नोंदी, यांची नोंदणी करुन केलेल्या मोजमापांनुसार अभ्यास केला जातो. त्यावरून माहिती तयार केली जाते. सुदूर संवेदनाच्या साहाय्याने अवकाशीय सर्वेक्षणातून विविध माहिती मिळविली जाते याद्वारे भूशास्त्रे व त्यांच्या शाखा, शेती हवामान शास्त्र व इतर शास्त्रे यांचा अभ्यास सोपा झाला आहे.

सुदूर संवेदनात अत्याधुनिक संवेदन प्रणालीच्या अभ्यासाला फारच महत्त्व येते हया प्रणालीच्या साहाय्याने जी माहिती गोळा केली जाते. ती प्रतिमाग्राहक छायाचित्राच्या स्वरुपात चित्रीत होऊन त्यांची व्यवस्थित नोंद करण्यात येते. सध्या Imaging Device म्हणून हवाई कॅमेरे यांची मदत घेतली जाते व Multi Spectral Scanner यांची मदत घेतली जाते व Sidelooking Airborne Scanner अशा प्रकारे सेन्सॉरचे १) पॅसिव्ह सेन्सॉर २) एक्टीव्ह सेन्सॉर असे दोन प्रमुख प्रकार पडतात. पॅसिव्ह सेन्सॉरसाठी बाहय शक्ती म्हणजे सूर्य काम होते. त्याद्वारे भूपृष्ठावरील खडक, माती, पाणी, वनस्पती इत्यादी पदार्थ स्वतःचे वैशिष्ट प्रगट होईल अशा रितीने Infrarade किरण परावर्तित येतात. हया रंगामुळे वनस्पतीच्या पाळीतील अनयमितता, वेगळी माती, भूजल जलमात्रा, पाणी परिस्थिती, प्रस्तरभंग प्रणालीची शेषरूप लक्षात येण्यास मदत होते.

साधारणपणे सुदूर संवेदनाची सुरवात १८५८ मध्ये पॅरीस येथे झाली. पुर्वी सुदूर संवेदनाचा वापर युद्धामध्ये शत्रुची माहिती गोळा करण्यासाठी करण्यात आला. विसाव्या शतकापासून अवकाशीय छायाचित्राचा वापर भूशास्त्रीय कामासाठी होवू लागला. १९५७ मध्ये पहिल्या मानवी उपग्रह अंतराळात फिरू लागल्यावर सुदूर संवेदनामार्फत असंख्य मानवी उपयोगाची सर्वेक्षण करणे मोठया प्रमाणावर सहज शक्य झाले. १९६० मध्ये रिरसि हा मानवी उपग्रह हवामानाचा अभ्यास करणारा मानवी अमेरिकी उपग्रह फिरू लागला. १९६४ मध्ये निंबस उपग्रह ज्यात उभारूण घेण्याची सोय होती. अशाप्रकारचे अनेक उपग्रह पृथ्वी भोवती फिरत असून कार्य करीत आहेत. उपग्रह छायाचित्रे, प्रतिभा चित्रांचा नकाशाशास्त्रात महत्त्वाचे स्थान आहे. भूपृष्ठावर ज्या गोष्टीची कल्पना येत नाही त्या प्रतिमा चित्रात झटकन लक्षात येतात. निरनिराळया ऋतुत निरनिराळया बदलाची कल्पना येते. दूरवर पसरलेल्या तुटक तुटक भागाचा अर्थ लावून त्यातून विशाल संरचनेचा बोध होतो. अशा प्रकारे सुदूर संवेदनाद्वारे भौगोलिक अभ्यास क्षेत्रात मोठा वाटा आहे.

**व्याख्या:** एखादया वस्तूला स्पर्श न करता दुरूनच छायाचित्र घेवून त्या विषयीची संपूर्ण माहिती प्राप्त करणे यालाच सुदूर संवेदन म्हणतात.

फिसचर: सुदर संवेदन ही एक अशी कला किंवा विज्ञान आहे की जो कोणत्याही वस्तुशी संपर्क न करता त्या वस्तुबद्दल माहिती प्राप्त करीत असते.

लिंट्ज व सिमोनेट: कोणत्याही वस्तूशी संपर्क न ठेवता त्या वस्तूबाबतीत भौतीक आकडे प्राप्त करणे.

बॅरेज कर्टिंज: निश्चित अशा अंतरावर राहून कोणत्याही युक्तीने आपले लक्ष प्राप्त करण्याला सुदूर संवेदन असे म्हणतात.

**उद्देश:** १) GIS भौगोलिक माहिती प्रणाली या तंत्रज्ञानाचे विविध उद्दिष्टे, पृथ्वीवरील पर्यावरणीय व परिस्थितीक प्रक्रियाचे मापण करणे तसेच भूपृष्ठीय वातावरणीय आणि जैविक माहिती संबंधीचा सांख्यिकीय माहिती मिळविणे हे मुख्य कार्य आहे व त्या सांख्यिकीय आकडेवारीच्या आधारावर नकाशा, आकृत्या, आलेख तयार केल्या जाते.

२) या तंत्रज्ञानामुळे भुजल संचय, भूमी उपयोजना, आपत्तीजनक घटक यांचे अचूक मूल्यमापन होत असते.

३) जी. आय. एस तंत्रज्ञानात दुरस्य संवेदन, संगणक, उपग्रह प्रतिभा व इंटरनेट या साधनाचा फार मोठा वाटा आहे. त्यामूळे भूगोल विषयात महत्वाचे स्थान आहे.

४) लोकसंख्या वितरण, संपर्क साधने, मार्गाचे वितरण याशिवाय प्रदूषणाची याशिवाय प्रषणाची तीव्रता, नदीचे खोरे नियोजन, पूर, इ. भौगोलिक घटकाचा अभ्यास करण्याकरीता या तंत्रज्ञानाचा फार महत्वाचा वाटा आहे.

५) सुदूर संवदेनाद्वारे पृथ्वीवरील वेगवेगळया घटकाची उपयुक्त माहिती गोळा करुन ती मापन संसाधनासाठी वापरणे हे मुख्य उद्दिष्टे आहे. त्यासाठी कॅमेरे; सेन्सर-जहाज, अंतरिक्ष यान, मानवी उपग्रह यांचा उपग्रह वापर केला जातो. याद्वारे माहितीचे विश्लेषण करण्यासाठी संगणकात वेगवेगळे सॉफ्टवेअर वापरले जातात.

६) सुदूर संवेदनाचे प्राथमिक उद्दिष्टे विद्युत चुंबकीय वर्णलेखाच्या विशिष्ट भागातील ऊर्जा शोधून त्याची व्यवस्थीत नोंद करण्यात येते.

७) सुदूर संवेदनाचे द्वारे जी माहिती घेतली जाते ती छायाचित्राच्या स्वरुपात चित्रीत घेवून त्याची व्यवस्थीत नोंद करण्यात येते.

८) भूपृष्ठावरील नैसर्गिक व सांस्कृतिक घटकाची दुरुन नोंद घेवून त्याची प्रतिमा तयार केली जाते यास संवेदक म्हणतात.

**भौगोलिक अभ्यासात माहिती प्रणाली व सुदूर संवेदन तंत्राचे महत्त्व**: भौगोलिक अभ्यास क्षेत्रात जि. आय. एस. आणि सुदूर संवेदनाचे महत्त्व फार वाढले आहे.

१) पृथ्वीवरील विस्तृत क्षेत्रातील व्यापक व दुर्गम अतिदुर्गम भागाची संपूर्ण व्यवस्थित व अचूक माहिती प्राप्त करता येते.

२) नैसर्गिक आपत्तीची जसे भूकंप, ज्वालामुखी, महापूर, वादळे, सुनामी, ई., ची माहिती सहजपणे उपलब्ध होते. तसेच सुदूर संवेदनाद्वारे भूगोल अभ्यासात आवश्यक असलेले घटक उदा. जंगले, वाळवंट, शहरे, नदीमार्ग, क्षारयुक्त जमीनी सहजपणे ओळखता येते.

३) आपल्या नजरेला न दिसणारे अनेक लहान मोठे भौगोलिक घटक Bird eye veal सुदूर संवदेक द्वारे नजरेतून सुटू शकत नाही.

४) भूगर्भातील खनिज पदार्थ, पाण्याचा साठा, धातु-अधातु, सागर पृष्ठाचे तापमान, वादळी संकेत, आजचे ग्रामीण व शहरी मानवी प्रदूषण, कारखाने, औद्योगिकरण, हवामानातील बदल, वन्य प्राणी इ. चा अभ्यास करण्यास भूगोल अभ्यासात जि. आय. एस. आणि सुदूर संवेदनाचे महत्त्वाचे स्थान आहे.

५) उपग्रहातील कॅमेरे व स्कॅनर या उपकरणाच्या साहाय्याने सर्व माहिती संकलित करुन छायाचित्रे प्राप्त करुन त्याचे विश्लेषन करुन सांख्यीकीय आकडेवारी संकलित केली जाते व त्यावरुन नकाशे, आकृत्या आलेख तयार केले जाते.

६) जि. आय. एस. हे संशोधन, साधनसंपत्ती विकास व नियोजन पर्यावरणीय आघात निर्धारण, नागरी नियोजन, नकाशाशास्त्र, गुन्हेगारीशास्त्र, इतिहास, आपत्ती व्यवस्थापन, उद्योग व्यवस्थान, व्यापार आरोग्य इत्यादी सर्वच क्षेत्रात लाभलायक ठरले.

७) भूगोलातील हवामानशास्त्र, जलविद्या Hydrology मृदाशास्त्र Soil Science परिवहन भूगोल Transport Geography यांचा अभ्यास व नियोजनास अधिक महत्त्व प्राप्त झाले.

८) इ. स. २००८ मध्ये भारताच्या अंतर्गत च्या वापराने देशाचा पहिला हिवताप नकाशा तयार करण्यात आला.

**भारतीय जि. आय. एस.:** १) भारताची संगणक, अवकाश संशोधन दूरसंवेदन क्षेत्रातील कामगिरी जि. आय. एस. च्या विकसनाच्या दृष्टीने अत्यंत पोषक ठरली. २) इ. स. १९८६ मध्ये भारतात इस्त्रोने स्वतंत्र जि. आय. एस. ची स्थापना केली. ३) टाटा कन्सल्टन्सी सव्हिसेस कंपनीने भारतात इ.स. १९९१ पासून जि. आय. एस. सेवा पूरविण्यास प्रारंभ केला. ४) शार श्रीहरीकोटा. ५) स्पेस अप्लिकेशन अहमदाबाद. ६) द नॅशनल रिमोट सेन्सिंग एजंसी, हैद्राबाद. ७) द नॅशनल रिमोट सेन्सिंग एजंसी, देहरादून.

**निष्कर्ष:** Remote Sensing & GIS हे आपल्या प्रगत तंत्रज्ञानाच्या युगात त्यांच्या अंगभूत गुणवैशिष्टयांमुळे सर्वच ज्ञानशाखांना त्याचा फायदा होत आहे. नकाशाशास्त्रात ती जि. आय. एस. आणि रिमोट सेन्सिंग हे आधुनिक तंत्रज्ञान आपल्या भूगोल विषयाच्या अभ्यासात महत्त्वाची देणगी ठरली आहे आणि सुदूर संवेदनद्वारे विविध पृथ्वीवरील नैसर्गिक संसाधने आणि मानवनिर्मित व त्याला अपेक्षित शोध व संशोधन होवून आज प्रत्येकच उद्दिष्टे पूर्ण होऊन त्याचे विविध आणि यथायोग्य परिणाम मिळत आहे. भौगोलिक परिस्थितीवरील उद्दिष्टे व त्याची निष्कर्ष काढण्यात भारतीय संशोधक तसेच विद्यार्थी जि. आय. एस. सुदूर संवेदन तंत्राचे महत्त्व वाढले आहे.

***संदर्भ ग्रंथ:***

*१. एस. ए. डयुरी - रमेज इंटरप्रिटेशन इन जिऑलॉजी*
*२. डॉ. नागतोडे / डॉ. लांजेवार - नकाशाशास्त्र व प्रात्यक्षिक भूगोलशास्त्र*
*३. कार्लेकर श्रीकांत, काळे मोहन - भूगोल शास्त्रातील संशोधन पद्धती*
*४. देशपांडे व प्रा. कोलते - भूगोल शास्त्र परिभाषाकोष राज्य मुंबई 2000*
*५. डॉ. एम. एस. सिसोदिया - उपकार प्रकाशन आगर - 2*
*६. क्युहॅओ वेंग - रिमोट सेसींग अँड जी. आ. एस. इंटीग्रेश*
*७. डॉ. नागतोडे / डॉ. लांजेवार - नकाशाशास्त्र*
*८. डॉ .घारपुरे - भूगोलशास्त्र परिचय*
*९. http://www.maayboli.com*
*१०. www.wikipedia.org/GIS*

# आदिवासींचे सामाजिक, आर्थिक व धार्मिक जीवन

डॉ. माया बी. मसराम, शरदराव पवार कला व वाणिज्य महाविद्यालय गडचांदूर ता. कोरपना जि. चंद्रपूर (महाराष्ट्र)

***सारांश:*** *आदिवासींच्या जीवनपद्धतीकडे त्याच्या मूल्यांच्या दृष्टीकोनातून, विशेषत: लोकशाही मूल्यांच्या दृष्टीकोनातून पाहिल्यास, आपल्याला स्पष्टपणे समजेल की ती भूतकाळातील अवशेष नसून भविष्याचा मार्ग दाखवणारी आहे. आदिवासी समाजातील लोकशाही जीवनाची समृद्ध परंपरा आपल्यासाठी आशा आणि प्रेरणादायी असू शकते. आदिवासी जीवनपद्धती कोणत्याही निश्चित साच्यात बसत नाही. जरी आपण स्वतःला फक्त पूर्व भारतापुरते मर्यादित ठेवले, जे मी येथे करणार आहे, परंतु विविध प्रदेश आणि जमातींची जीवनपद्धती वेगळी आहे. शिवाय, आदिवासींची जीवनपद्धती काळानुसार बदलत राहते. उत्पादनाच्या साधनांमध्येही बदल होत असतो. अन्नाच्या शोधात एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी जाणाऱ्या आदिवासी समूहांची जीवनपद्धती झुम शेती किंवा स्थिर शेती करणाऱ्या जमातींपेक्षा वेगळी असावी. त्याचप्रमाणे कोळसा खाणींमध्ये काम करणाऱ्या आदिवासींची जीवनपद्धतीही वेगळी असणार आहे. बाह्य प्रभाव (चांगला असो वा वाईट) आणि त्यांची स्वतःची सर्जनशीलता देखील आदिवासींच्या जीवनपद्धतीत बदल घडवून आणते. या विविधतेमध्ये, आम्ही फक्त काही मूलभूत समानता शोधण्याचा प्रयत्न करू शकतो. आज जेव्हा खनिज संपत्ती आणि औद्योगिक विकासासाठी जंगल-पर्वतीय क्षेत्र हे राष्ट्रीय अर्थव्यवस्थेसाठी आवश्यक मानले जात आहेत आणि या सर्व सुविधा या आदिवासी भागातच उपलब्ध आहेत, तेव्हा प्रादेशिक किंवा राष्ट्रीय हितासाठी, आदिवासींना विस्थापित करून, त्यांच्या आपली जीवनशैली, सामाजिक रचना, सांस्कृतिक मूल्ये जबरदस्तीने हिरावून घेणे? म्हणजेच आजच्या काळात विकासाच्या विद्यमान संकल्पनेचा पुन्हा एकदा आढावा घेण्याची आणि नवीन आधुनिक व्यवस्थेत आदिवासी समूहांच्या मानवी हक्कांचे योग्य रीतीने संरक्षण करण्याची अत्यंत गरज आहे. आदिवासी लोक फक्त जल, जंगल, जमीन आणि प्राणी यांची पूजा करतात. तसेच ते सूर्य आणि चंद्राची पूजा करतात. या सर्व गोष्टी वेगवेगळ्या जमातींसाठी भिन्न असू शकतात. गैर आदिवासी लोक आदिवासी समाजाला मागास समजतात कारण त्यांना आधुनिकता अंगीकारायची नाही पण या एका समाजाकडून प्रत्येकाने समाजाने काही तरी शिकले पाहिजे असे काहीतरी या आदिवासी समाजात आहे.*

***बीजशब्द :*** *निसर्ग उपासक, खुली जमीन, समता, श्रम विभागणी, सहकार्य, सांस्कृतिक विविधता.*

**प्रस्तावना:** आदिवासी हा शब्द आदी आणि वासी या दोन शब्दांपासून बनला असून त्याचा अर्थ मूळ असा होतो. भारताच्या लोकसंख्येचा मोठा भाग शेकडा ८.६ आहे. आदिवासी आहे. प्राचीन ग्रंथांमध्ये आदिवासींना वनवासी (संस्कृत ग्रंथांमध्ये) असेही म्हटले जाते. महात्मा गांधींनी आदिवासींना गिरिजन (डोंगरवासीय) म्हटले. अनुसूचित जमाती हा शब्द संविधानात आदिवासींसाठी वापरण्यात आला आहे. गोंड, मुंडा, खाडिया, हो, बोडो, भिल्ल, खासी, सहारिया, गरासिया, संथाल, मीना, ओराव, परधान, बिरहोर, पारधी, आंधळा, टाकणकर, इत्यादी भारतातील प्रमुख आदिवासी समुदाय आहेत. आदिवासींना भारतात सामान्यतः आदिवासी म्हणून ओळखले जाते. आदिवासी हे प्रामुख्याने ओरिसा, मध्य प्रदेश, छत्तीसगड, राजस्थान, गुजरात, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल या भारतीय राज्यांमध्ये अल्पसंख्याक आहेत, तर मिझोरामसारख्या भारताच्या ईशान्येकडील राज्यांमध्ये ते बहुसंख्य आहेत. भारत सरकारने त्यांना भारतीय राज्यघटनेच्या पाचव्या अनुसूचीमध्ये 'अनुसूचित जमाती' म्हणून मान्यता दिली आहे. ते सहसा 'अनुसूचित जाती' आणि 'जमाती' सारख्याच श्रेणीमध्ये समाविष्ट केले जातात.

आदिवासींचा स्वतःचा धर्म आहे. ते निसर्ग उपासक आहेत आणि जंगले, पर्वत, नद्या आणि सूर्य यांची पूजा करतात. आधुनिक काळात जबरदस्तीने बाह्य संपर्कात आल्याने त्यांनी हिंदू, ख्रिश्चन आणि इस्लाम धर्महीी स्वीकारला आहे. ब्रिटीश राजवटीत ते मोठ्या संख्येने ख्रिश्चन झाले, त्यामुळे स्वातंत्र्यानंतर त्यांचे हिंदूकरण करण्याचे प्रयत्न वेगाने झाले. पण आज ते स्वत:च्या धार्मिक ओळखीसाठी संघटित होत आहेत आणि भारत सरकारकडे जनगणनेत स्वत:साठी स्वतंत्र धार्मिक संहितेची मागणी करत आहेत.

**आदिवासी अर्थव्यवस्थेचे विविध पैलू :** या पारंपारिक अर्थव्यवस्थेत, खुली जमीन सर्वांच्या मालकीची होती, परंतु शेतीयोग्य जमीन नव्हती. जमीन लागवडीयोग्य करण्यासाठी प्रयत्न करावे लागले, कारण त्यासाठी जंगले साफ करावी लागली. ज्याने जंगल साफ केले, तेवढी जमीन त्याची झाली. त्यावर त्यांचा अधिकार वैध मानला जात असे. या मालकी हक्काचे स्वरूप वेगवेगळया समुदायांमध्ये आणि प्रदेशांमध्ये वेगवेगळे होते. उदाहरणार्थ, झारखंडच्या मुंडा आदिवासींच्या पारंपारिक भाडेपद्धतीमध्ये, ज्याला खुंटकट्टी म्हणतात, जंगल साफ करणारी व्यक्ती जमिनीचा मालक असतो आणि नंतर त्याचे वारस. संबंधित कुटुंबे त्या जमिनीवर शेती करतात, परंतु त्यावर कोणत्याही विशिष्ट व्यक्तीचा मालकी हक्क नसून ती विकण्याचा किंवा भाडेतत्त्वावर देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

शेतीसाठी जंगल साफ करणे हा केवळ श्रमाने वनजमीन उत्पादक बनवण्याचा मार्ग नाही. इतर पद्धतींमध्ये शिकार, वनोपज गोळा करणे, मासेमारी, गुरे चरणे आणि किरकोळ वनोपजावर प्रक्रिया करणे यांचा समावेश होतो. याव्यतिरिक्त, जंगले मानवांसाठी उपयुक्त गोष्टींचा एक मोठा स्रोत आहेत. यामध्ये घराचे बांधकाम साहित्य, सरपण, टोपल्या, दोरी, झाडू आणि हर्बल औषधांचा समावेश आहे. या क्षेत्रांत इतर आर्थिक घडामोडींना फारसा वाव नाही. आदिवासी अर्थव्यवस्थेचा एक

प्रकार आहे ज्यामध्ये त्यांनाच फायदा होतो. एकीकडे वनजमिनीवर सर्वांना समान प्रवेश आणि हक्क देऊन सामाजिक समता राखली जाते, तर दुसरीकडे शेतीयोग्य जमिनीवर कुटुंबांचे हक्क देऊन काही प्रमाणात वैयक्तिक स्वातंत्र्यही प्राप्त केले जाते.

**आदिवासी सर्वात लोकशाहीवादी लोक:** आदिवासींच्या जीवनपद्धतीची व्याख्या करणारा एक शब्द कोणता किंवा भारतातील आदिवासी जीवनाचा सर्वात परिभाषित घटक कोणता जर असेल तर तो 'लोकशाही' आहे. जयपाल सिंग मुंडा यांनी १९ डिसेंबर १९४६ रोजी संविधान सभेतील आपल्या पहिल्या भाषणात म्हटले होते, 'तुम्ही आदिवासींना लोकशाही शिकवू शकत नाही. त्याच्याकडून तुम्हाला लोकशाही मार्ग शिकावा लागेल. ते जगातील लोकशाहीवादी लोक आहेत'.

**आदिवासींची लोकशाही जीवनशैली:** डॉ. बाबासाहेब आंबेडकर लोकशाहीला 'एकत्र राहण्याचा मार्ग' म्हणतात. 'स्वातंत्र्य, समानता आणि बंधुता' ही घोषणा लोकशाही जीवनाची मूलभूत तत्त्वे व्यक्त करते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २५ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेतील आपल्या ऐतिहासिक भाषणात या तिघांमधील परस्परसंबंध अतिशय सुंदरपणे स्पष्ट केले होते. 'सामाजिक स्वातंत्र्य म्हणजे काय? याचा अर्थ असा जगण्याचा मार्ग आहे, जो स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही जीवनाची मूलभूत तत्त्वे मानतो. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तीन तत्त्वांना एकाकीपणाने पाहू नये. समानतेशिवाय स्वातंत्र्यामुळे अनेकांवर काही लोकांचे वर्चस्व निर्माण होईल. समानता, स्वातंत्र्याशिवाय, वैयक्तिक उद्योग चिरडून टाकेल. आणि बंधुत्वाशिवाय, स्वातंत्र्य आणि समानता जीवनाचा नैसर्गिक भाग होऊ शकत नाही.' ही लोकशाही तत्त्वे भारतातील आदिवासी समुदायांना अतिशय प्रिय आहेत. आदिवासींना स्वातंत्र्य आवडते आणि ते कुणाचेही वर्चस्व सहजासहजी स्वीकारत नाहीत. मग ते वसाहतवादी शासन असो, जमीनदार असो, वनविभाग असो, सावकार असो किंवा त्यांचे मालक असोत.

आजचे आदिवासी हेच आहेत जे लढूनही आपले स्वातंत्र्य टिकवू शकले आहेत. जे आदिवासी समाज असे करू शकले नाहीत त्यांना त्यांच्या जमिनी आणि हक्कांपासून वंचित ठेवण्यात आले आणि त्यांना जातीव्यवस्थेच्या तळाशी ठेवले गेले. झारखंडचे भुई आणि बिहारचे मुशर ही त्याची उदाहरणे आहेत.

**आदिवासींमधील समतावाद:** आदिवासी समाज इतर समाजाच्या तुलनेने समतावादी मूल्ये आणि कार्यपद्धतींसाठी ओळखला जातो. आदिवासी समाजाचा जुना समतावादी पाया नष्ट झालेला नाही. भारतातील पारंपारिक आदिवासी अर्थव्यवस्थेत जंगले, कुरण आणि नद्या या सर्वांच्याच मालकीच्या आहेत. आदिवासी आतापर्यंत जातीव्यवस्थेच्या तावडीतून वाचवले गेले आहेत. जयपाल सिंग मुंडा यांनी संविधान सभेतील त्याच भाषणात म्हटल्याप्रमाणे, 'माझ्या समाजात जात नाही. त्याचप्रमाणे आदिवासी समाज देखील मोठ्या प्रमाणात लैंगिक असमानतेपासून मुक्त आहे. व्हेरिअर एल्विन असेही म्हणतात की 'आदिवासी स्त्रिया आजही तितक्याच मुक्त आहेत जितक्या भारतभरातील स्त्रिया भूतकाळात होत्या किंवा भविष्यातही असतील.' भारतीय समाजातील बहुतांश घटकांच्या तुलनेत आदिवासींमध्ये स्त्रियांवर इतर समजतील स्त्रियांच्या तुलनेने कमी निर्बंध आहेत हे वास्तव आहे. उदाहरणार्थ, स्त्री आणि पुरुष यांच्यातील श्रम विभागणी तितकीशी कठोर नाही, स्त्रियांना वेगळे केले जात नाही, प्रेमविवाह सामान्य आहेत आणि विधवा पुनर्विवाह स्वीकार्य आहे. आदिवासी समाजाला स्त्रिया आणि मुलींची किंमत कळते, हे या समाजांच्या लिंग गुणोत्तरावरून दिसून येते. २०११ मध्ये, संपूर्ण लोकसंख्येमागे भारताचे लिंग गुणोत्तर ९१८ प्रति १,००० असताना, आदिवासींमध्ये ते ९५७ इतके चांगले होते. २० व्या शतकात वधूच्या किंमतीची जागा हुंडा पद्धतीने घेतली. पण तरीही, आजच्या भारतात, देशाच्या पूर्वेकडील आदिवासी समुदाय समतावादी प्रतिसंस्कृतीचा सर्वात मजबूत बालेकिल्ला आहे.

**एकता आणि सहकार्य:** डॉ. आंबेडकरांनी एकमेकांबद्दल सहानुभूती असल्याचे म्हटले आहे. त्यांच्या मते, बंधुभाव ही 'भावना आहे ज्याद्वारे एखादी व्यक्ती इतरांच्या कल्याणाशी स्वतःला जोडते.' दुसरीकडे एकता आपल्या विचारांपेक्षा आपल्या कृतींशी अधिक संबंधित आहे. आपण प्रेम किंवा बंधुत्वाच्या भावनेसह किंवा त्याशिवाय एकत्र येऊ शकतो. उदाहरणार्थ, जेव्हा तुम्ही रस्ता अपघातग्रस्तांना मदत करण्यासाठी काही करता तेव्हा ते एकता दाखवते. परंतु याचा अर्थ असा नाही की तुम्हाला त्या व्यक्तीबद्दल काही विशेष भावना आहेत. अपघाताचा बळी कोणीही असला तरी, अशा परिस्थितीत हे करणे आपल्यासाठी योग्य आहे असे तुम्हाला वाटण्याची शक्यता जास्त आहे. इतरांपेक्षा आदिवासींमध्ये अधिक एकता आहे. आदिवासींमध्ये मैत्री आहे. तो अतिशय सभ्य आणि शांत समुदाय आहेत.

**संशोधनातील अंतर:** संशोधन करतांना संशोधनकर्तीने साहित्याचे परिक्षण केले असता राव (२०००) च्या संशोधनाअंतर्गत विषेश करून नोकरी करणाऱ्या वृद्ध महिलांना आश्रयीत मानून मदत करतात. मात्र जे वृद्ध महिला गृहीणी असतात त्यांचा सुद्धा ह्या संशोधनाअंतर्गत शोध करावयाचे सुटले गेले. डेस्टी (२०००) यांच्या अध्ययनात कुटूंबातील भावनात्मक प्रेम कमी झाल्यामुळे वृद्ध वृद्धाश्रमात जाऊन एकाकी जीवन जगतात. मात्र ज्यांची आर्थिक परिस्थिती व्यवस्थीत असते अशाच कुटूंबातील पालक वृद्धाश्रमात जाऊन वास्तव्य करतात हे सत्य त्यांच्या संशोधनातून सुटले गेले / अंतर राहिले.

**संशोधनाच्या पध्दती**: या संशोधनात १) मौलिक अथवा शुध्द संशोधन २) व्यावहारिक किंवा क्रियाभिमुख संशोधन या पध्दतीचा आणि उपलब्ध सरकारी कागदपत्राचा उपयोग करण्यात आलेला आहे.

**संशोधनाचे क्षेत्र**: प्रस्तुत अध्ययनातर्गत ६० अधिक वयोगटातील वृध्द स्त्रियांची संशोधनाचे क्षेत्र म्हणून निवड करण्यात आली. अध्ययनाला एक विशिष्ट दिशा प्राप्त करण्याकरीता अध्ययनाचे क्षेत्र म्हणून नागपूर शहरातील एकुण ३८४ वृद्ध महिला उत्तरदात्यांची निवड करण्यात आली. त्यात नागपूर शहरातील उत्तर, दक्षिण, पूर्व, दक्षिण-पश्चिम, पश्चिम आणि मध्य या सहाही विभागातून प्रत्येकी ६४ वृध्द स्त्रिया, अशा उत्तरदात्यांची निवड या अध्ययनात करण्यात आली. ३८४ हा आकडा मॅरगन टेबलच्या आकडयानुसार घेण्यात आलेला आहे. एकूण ३८४ उत्तरदाते (Margin oferror 5.0 % & Confidence 95 %) हे अध्ययन क्षेत्राच्या एकूण लोकसंख्येच्या पाच टक्के घेण्यात आलेला असून संपूर्ण सहा ही विभागातून नागपूर शहरातील वृध्द स्त्रियांचाच या अध्ययनात समावेश किंवा निवड करण्यात आली.

**संशोधनाची उद्दिस्टे**: प्रस्तुत संशोधन कार्या करीता पुढिल उद्दिश्ट निश्चित करण्यात आली.

१) मुख्यत: वृध्द महिलांचे सर्वांगिन स्थितीचे अध्ययन करणे. विशिष्ट वृध्द महिलांचे शारीरिक, कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक व मानसिक स्थितीचे अध्ययन करणे.

२) वृध्द महिलांना वृध्दत्वामुळे निर्माण झालेल्या समस्यांचा शोध घेणे.

३) वृध्द महिलांना भेडसाविणाऱ्या आरोग्य विषयक समस्यांचे विश्लेषणात्मक अध्ययन करणे.

**गृहीतकृत्य:** १) कौटुंबीक विघटनामुळे कुटूंबात वृध्द स्त्रियांच्या आवश्यक गरजाकडे दुर्लक्ष होते. २) जुन्या विचारसरणीला धरून चालणाऱ्या वृध्द स्त्रियांचे आधुनिक विचार सरणीमुळे कौटुंबिक समायोजन होत नाही. ३) कुटुंबातील हलाकीच्या आर्थिक परिस्थितीमुळे वृध्द स्त्रियांकडे दुर्लक्ष होते. ४) सासु-सुनेच्या असमायोजनात्मक स्वभावामुळे कौटुंबीक कलह निर्माण होवून वृध्द स्त्रियांमध्ये शारीरिक व मानसिक तणाव वाढतो.

**गृहीतकृत्याची पडताळणी:** कोणत्याही विषयाच्या संशोधनासाठी घेण्यात आलेल्या संशोधन समस्यांची वा संशोधन प्रश्नांची संभाव्य उत्तरे म्हणजे गृहीतकृत्य होय. जे विधानाच्या स्वरूपात संशोधनाच्या पूर्वी सादर करण्यात येतात व या गृहितकृत्याची पडताळणी संशोधन पूर्ण झाल्यानंतर करण्यात येत असते. गृहितकृत्य हे सदैव संशोधनाच्या प्रश्नांशी व संशोधनाच्या उद्दिस्टाषी संबंधीत असतात. प्रस्तुत संशोधनात संशोधन प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी गृहितकृत्याचा अवलंब करण्यात आला आहे. संशोधनातुन उपलब्ध झालेल्या तथ्यांच्या माध्यमातून गृहितकृत्याची पडताळणी करण्यात आलेली आहे. 'सासु-सुनेच्या असमायोजनात्मक स्वभावामुळे कौटुंबिक कलह निर्माण होवून वृध्द महिलांमध्ये शारीरिक व मानसिक तणाव वाढतो', हे गृहीतकृत्य सत्य ठरले.

**नविन गृहितकृत्याची मांडणी:** नागपूर शहरातील वृध्द महिलांच्या समस्यांचे विश्लेषणात्मक अध्ययनातून पुढील नवीन गृहितकृत्याची निर्मिती करण्यात आली आहे ती खालील प्रमाणे.

१) सेवानिवृत्त गृहिणीत आणि घरकामे करणारी वृध्द गृहीणीतील विचारात फरक आढळून येतो.

२) अंथरूणात खिळणाऱ्या वृध्दांच्या समस्यातुन कौटुंबिक विवादास सुरूवात होते.

३) निराधार एकल कुटूंब झाल्यास वृध्दांच्या भावनांवर विपरित परिणाम आढळून येतो.

**संशोधन आराखडा**: प्रस्तुत संशोधन कार्यामध्ये उपयोजित केलेल्या संशोधन आराखडयात वृध्द स्त्रीयांच्या वैयक्तिक, शारीरिक, कौटुंबिक, मानसिक, आर्थिक आणि सामाजिक विषयक माहिती याचे यथार्थ पध्दतीने वर्णन केलेले आहे. म्हणून प्रस्तुत अध्ययन अंशत: वर्णनात्मक व अंशत: अन्वेषनात्मक किंवा परिचयात्मक स्वरूपाचे आहे. अशाप्रकारे संमिश्र स्वरूपाचा संशोधन आराखडा आहे.

**नमुना निवड**: प्रस्तुत संशोधन कार्यात संशोधकानी 'गैरसंभाव्यता नमुना निवड पध्दतीतील सहेतुक किंवा उद्देशपुर्ण नमुना पध्दतीचा' अवलंब करण्यात आलेला आहे.

**तथ्य संकलन**: स्थुलमानाने तथ्य संकलनाचे दोन स्त्रोत आहेत, ते पुढील प्रमाणे- १) प्राथमिक वा क्षेत्रीय स्त्रोत व त्याची माध्यमे. २) द्वितीय अथवा प्रलेखीत स्त्रोत

**तथ्य संकलनाची साधने**: संशोधन प्रक्रियेमध्ये तथ्य संकलनाला अतिशय महत्वाचे स्थान आहे. विषयाची बांधणी हे संशोधनाचे मुल्य वाढवीत असते व निष्कर्षाची मांडणी हे संशोधनाचे ध्येय असल्यामुळे त्या ध्येयाच्या पुर्तीसाठी संशोधकास तथ्यांचे किंवा माहितीचे संकलन करावे लागते.

**मुलाखत अनुसुची:** मुलाखत ही एक सामाजिक प्रक्रिया आहे. सामाजिक विषयाच्या संदर्भात व्यक्तींच्या मनातील भावना, विचार, प्रवृत्ती, संवेग इत्यादी प्रत्यक्ष चर्चा किंवा संवाद करून जाणून घेण्याचे एक तंत्र आहे. या तंत्रामध्ये मुलाखतकार प्रत्यक्ष संबंधित व्यक्तीशी भेटून त्याच्याशी चर्चा करीत असतो.

**तथ्य प्रक्रियन**: समाजशास्त्रीय अध्ययनाच्या संदर्भात वृध्द महिलांच्या मुलाखती व प्रश्नावली पध्दतीच्या सहाय्याने माहिती संकलित केली जाते. त्यानंतरची महत्वाची पायरी आहे ती म्हणजे तथ्य प्रक्रियन व सारणीकरण होय. संस्करण वा संपादन, वर्गीकरण, संकेतीकरण, संकेत पुस्तिका, स्थानांतरण, मास्टर चार्ट इ. च्या सहाय्याने तथ्य प्रक्रीयान केले.

**तथ्य विश्लेषण**: प्रस्तुत अध्ययनामध्ये तथ्य विश्लेषणासाठी प्रामुख्याने सांख्यकिय पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे. तथ्यांचे निर्वचण करण्यासाठी एस. पी. एस. एस. आणि एक्सेल द्वारे साधी सारणी, द्विचल सारणी व बहुचल सारणीचा अवलंब केला आहे. सोबतच गृहीतकृत्याची पडताळणी करीता क्रॉस टेबल, कायस्क्केयर टेस्ट केल्या गेले. याशिवाय आवश्यक त्या ठिकाणी आलेख, रेखाचित्र, नकाशे इत्यादींचा अवंलब केलेला आहे.

**मुलाखत अनुसुची पूर्व चाचणी**: मुलाखत अनुसूची तयार करीत असतांना संशोधनकर्तीने आधी तयार झालेली प्रश्नावली व्यवस्थित आहे का? काही उणीवा तर राहलेल्या नाही ना ! याची खात्री करून घेण्यात आली. पायलट स्टडी करून झाल्यानंतर उणीवा भरून काढून सुयोग्य अनुसूची तयार करून तथ्य संकलनाची प्रक्रिया करण्यात आली.

**संशोधनाचे समाजकार्यात योगदान:** वृध्द हे वयाने तर वृध्द असतात, तसेच ते मनाने ही वृध्द असतात. वृध्द जुन्या परंपरागत विचाराचे असतात त्या तुलनेत आजचा समाज हा नवीन विचारावर चालणारा आहे. वृध्द हे नवीन पिढीवरील आपले विचार लादण्याचा प्रयत्न करीत असतात. वृध्द हे फार भावूक असतात. त्यांना कुटूंबातील कुणीही व्यक्तीने काहीही बोलल्यास त्यांना ते ओझे वाटत असते त्यांना दुसऱ्यांचे विचार पटत नाही. वृध्दांची क्षमता समाजासाठी उपयोगात यावी यासाठी संपूर्ण समाजात वृध्दांचे जीवन सुधारणे आवश्यक आहे.

उत्साही राहण्यासाठी आनंदी राहा. आपल्या विचारांमध्ये सकारात्मक बदल आणा. शुभविचार ठेवा. उत्साही लोकांबरोबर राहा आणि आपल्या आवडीची कामे करा. स्वतः उत्साही राहुन इतरांना उत्साहित करावे.

शेवटी टाळी एका हातानी वाजत नसते म्हणून सर्वांशी प्रेमभावनेने जीवन जगणे कधीही योग्यच आहे. शेवटी म्हतारपणात आपल्या व्यक्तीची जे स्वतःचे रक्ताचे आहेत त्यांनी मदतीचा हात दुरावू नये आणि वृध्दांनीही त्यांना दुरावा निर्माण करण्यास परिस्थिती निर्माण करू नये याची काळजी घ्यावी.

**वृध्द महिलांकरिता महत्वाच्या सुचना आणि शिफारशी**:

१) घरगुती कामामध्ये, हातभार लावणे, बगीचे झाडे-झुडपे व्यवस्थीत ठेवणे, स्वतःची कामे स्वतः करणे आणि दुसऱ्यानाही सहकार्य देणे याद्वारे ही स्वतःला व्यस्त ठेवणे.

२) स्वतःचे मत दुसऱ्यावर लादले जाऊ नये याकरिता स्वतःतील संबंध स्नेहपूर्ण ठेवून कार्य करणे.

३) मुलं सुनं आणि नातवंडा मध्ये, मधे-मधेच आपले विचार मत व्यक्त करू नये.

४) ज्या घरात कमी जास्त लेखने अशाप्रकारचे ही कार्य करू नये. त्यामुळे एकमेकांचे भावना दुःखावले जाऊन संबंध तुटातुटी पर्यंत येण्यास विघटनाचे प्रमाण वाढते.

५) आपण कुणाविषयी काय बोलत आहोत याचे भान ठेवून बोलायला हवं. नातवंडा समोर त्यांच्या आईच्या कांगाल्या करू नये. त्यामुळे आपसात मत दुखावल्या जाते.

६) सुनांच्या कांगळयाही इतरांशी करू नये त्यामुळे द्वेषाची भावना निर्माण होऊन कौटुंबिक वादाचे कारण समोर येतात.

७) वृध्द महिलांना अपमान होईल त्यांच्या स्वाभीमानास धक्का बसेल असे वर्तन करण्याचा मोह टाळला पाहीजे.

**निष्कर्ष**: वृध्दमहिलांची कौटुंबिक पार्श्वभूमी विश्लेषणावरून असे दिसून येते की, १६३, (४२.४४) वृध्द महिलांना पेन्शन नसल्यास स्वतःच्या गरजांची पूर्ती आपल्या मुलांमुली मार्फत घेत होते. विभक्त कुटूंबाचे प्रकार २१६, (५६.३) सर्वाधिक आढळले. वृध्द महिलांना कुटूंबातील

सदस्यांबरोबर संबंध आणि वृध्दत्व ही एक समस्या १६९, (४४.०१) असल्याचे सिध्द झाले. समाजात वृध्दांना अपमानित करण्याची आणि युवापिढी वृद्ध महिलांचे अनादर ३६६, (९८.१७) करण्यास सहमत आणि काही प्रमाणात असहमतता दर्शविते. जुनी पिढीतील संघर्ष आणि भारतीय संस्कृती लयास गेलेली आहे असे २४५, (६३.६०) उत्तरदात्यांनी या प्रश्नांशी सहमती दर्शविली. वृध्द महिला ८२, (६२.५९) वृध्दावस्थेत कुटूंबातील वृध्द सुरक्षित नाही. वृध्दावस्थेतील प्राथमिक स्तरावर २४५, (६३.८०) दैनंदिनी कामे करण्यास समस्या जाणवत होते. त्यात खाणे, पिणे, देखरेख करणे, घरगुती कामे करणे, अर्थाजन करण्यास अकार्यक्षम इ. २३१, (६०.२) वृध्द महिला ह्या स्वतःच्या घरात राहत आहेत. २११, (५४.९) वृध्द महिला फावल्या वेळात नातवंड आणि कुटूंबासोबत घालवत होते. आईमुलीचे संबंध २९६, (७७.८) खुप चांगले होते. तर सासुकडे सुनेचा पाहण्याचा दृष्टीकोन २०९, (५४.४२), त्रासदायक, तिरस्काराचे, इत्यादि वाईट स्वरूपाचे होते. २०५, (५३.४), सासु-सुनेत कधी-कधी भांडणे होतात. महिन्यातून एकदा तरी १३०, (३३.९), भांडणे होतात. २८०, (७२.९१) घरगुती, शारीरिक दुर्बलता, जनरेशन गॅपमुळे वाद निर्माण होतात.

१८२, (४७.३९) काळजी घेतली जात नाही. विभक्त कुटूंबातील वृध्दांकडे २१६, (५६.२६) दुर्लक्षीत व्यवहार बाळगतात. ९०, (८२.५६) वृध्द महिलांना आर्थिक परिस्थिती कमकुवत असल्यास, युवांना वेळ नसल्यास, आपुलकी नसल्यास, आम्हीपणाची भावना वाढल्यास इत्यादी विभिन्न प्रकारच्या समस्यामुळे त्यांची काळजी घेत नव्हते. वृध्दत्वाविषयी वृध्द महिला ३११, (७६.२२) नकारात्मक भावना त्यात वृद्धत्व नकोसे वाटते, दुसऱ्यावर ओझे झाल्यासारखे वाटते, वृद्धत्व एक आजारपण, वृद्धत्व जीवनाचा अंत आहे आणि वृद्धत्व निवृत्तीचे वय इत्यादि भावना व्यक्त केले होते. २२७, (५९.१) वृध्द महिलांना कुठल्याही प्रकारचे व्यसन नव्हते. २१६, (५६.३) वृद्धत्व हे एक आजारपण वाटतो. २०१, (५२.३४) वृद्धत्वामुळे कार्यक्षमता कमी झाली.

*संदर्भ सूची:*

१. *जोशी, वर्षा, (२०१०), उर्वरित आयुष्यात रस, २७ ऑगस्ट २०१०, लोकमत सखी दैनिक वृत्तपत्र, नागपूर*
२. *लिमये, चंपा (१९८८), अबला होई प्रबला, श्री विद्या प्रकाशन, पूणे.*
३. *Uma, H.R. (2005), The Aging Populating, Yojana Oct. Pg. 40*
४. *हडप गोविंद व अरविंद जोशी, (२००७), वृद्धांच्या सामाजिक समस्या आणि ज्येष्ठांचे समुपदेशन, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर*
५. *गाडगीळ, कल्याणी (२०१४), नव्वद वर्षाचे तरूण, १७ जुलै, २०१४, लोकमत वृत्तपत्र सखी.*
६. *साने, गुरूजी, (२०१४), शाम ची आई, भारतीय संस्कृती, सुलभा प्रकाशन, शनिवार पेठ, पूणे*
७. *जोशी वर्षा, (२०१०), वृद्धत्वाची व्याख्या, दैनिक लोकमत वृत्तपत्र, दि.१३ मार्च, २०१०.*
८. *Thomas George, Syloja, H. (20 Dec. 2012), Adjustment in old age : a comparative study, Tata Shodhganga, www,1/4/15*
९. *Alho Abhilasha (2012) Ageing in Contemporary Society, A study of Ageing problems and their adjustment in India with special reference to Rajasthan, Maharaja Ganga Singh University Bikaner.*
१०. Ahuja Ram, (2003), Social Problems in India, Rawat Publications, Jaipur, IInd Edition, PP. 37-64

# शिक्षणाचा हक्क आणि मानव अधिकार

***डॉ. जयमाला पुंडलिकराव लाडे,*** *समाजशास्त्र विभाग प्रमुख, मिलिंद महाविद्यालय, मुळावा त. उमरखेड जि. यवतमाळ.*

**प्रस्तावना:** नविन शैक्षणिक धोरण-२०२० ची सध्या चर्चा सुरू आहे. हे शैक्षणिक धोरण स्वीकार करण्यास किंवा अस्वीकार करण्यास अनेक विचारवंत आपले अभ्यासपूर्ण विचार मांडीत आहेत. एकीकडे ६ ते १४ वयोगटातील मुलांना शिक्षण घेणे-देणे हा मुलांचा मानवी अधिकार आहे. या अनुषंगाने विचार केला तर आजही शिक्षणाच्या प्रक्रियेपासुन किती तरी विद्यार्थी वंचित आहेत. सरकारने असे जाहिर केले की, ज्या शाळेत पटसंख्या २० पेक्षा कमी आहे त्या शाळा बंद केल्या जाणार. मात्र ग्रामीण भागात छोट्या छोट्या खेड्यांत अजूनही शाळेत दहा पंधराच विद्यार्थी पटावर असलेले दिसून येते. ह्या शाळा जर बंद झाल्यात तर ही मुले शिक्षणापासून वंचित राहतील. ह्या वंचित विद्यार्थ्यांची जबाबदारी कोण घेईल? असा प्रश्न निर्माण होतो. कारण शिक्षणच हे समग्र व्यक्तिमत्वाचे साधन आहे. शिक्षणापासून वंचित ठेवले तर अनेक सामाजिक-आर्थिक प्रश्न निर्माण होतील. शिक्षण प्राप्त होणे हा प्रत्येक व्यक्तीचा मूलभूत मानवी अधिकार आहे. म्हणूनच प्रस्तुत शोध निबंधात शिक्षणाचा हक्क व मानवी अधिकार ह्यावर चिंतन करण्याचा प्रयत्न केला आहे. शिक्षणाचा हक्क हा एक वैश्विक हक्क आहे. एक असा हक्क जो मानवी हक्क म्हणून ओळखला जातो. यूनेस्कोनी शिक्षणाचा अर्थ पुढील प्रमाणे केला आहे. 'अशा सर्व हालचाली (क्रिया) ज्यामुळे एक मानवी समुह त्यांच्या वंशजांना एक ज्ञान आणि प्राविण्य देतात आणि एक नैतिक संकेत पण देतात जे त्यांना अस्तीत्वात राहण्यास मदत करतात. या अर्थाने शिक्षण म्हणजे पुढच्या पिढीला दररोजच्या जगण्याची कार्य करण्याची कौशल्य देणे आणि एका विशेष समूहाचे सामाजिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि तात्विक मूल्ये देणे होय.'

**अभ्यासाची उद्दिष्ट्ये**: १) मानवी हक्क म्हणजे काय अभ्यासणे. २) शिक्षणाचा मानवी हक्क म्हणजे काय ते अभ्यासणे. ३) ग्रामीण विद्यार्थ्यांची (प्राथमिक / वंचित) स्थिती अभ्यासणे.

**अभ्यास पद्धती**: प्रस्तुत शोध निबंध उद्देश तपासून पाहतांना दुय्यम स्त्रोतांचा आधार घेतला आहे. प्रामुख्याने पुस्तके, वर्तमानपत्रे, विविध वेबसाईट्स चा आधार घेऊन अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

**मानवी हक्क**: विसाव्या शतकापासून मानवी हक्कांचा किंवा मानवाधिकारांचा जोरदार पुरस्कार करण्यात आला. संयुक्त राष्ट्रांच्या स्थापनेपासून मानवी हक्क विषयक प्रश्नांना विशेष महत्व देण्यात येऊ लागले. संयुक्त राष्ट्रांच्या सनदेत 'मानवी हक्क' व मूलभूत स्वातंत्र्य' यांचा आग्रह धरण्यात आला त्यामुळे मानवी हक्कांचे महत्व अधोरेखित होण्यास खूप मदत झाली आहे. मानवी हक्क  हे मानवाच्या जीवनाचे अविभाज्य भाग आहेत. म्हणून मानवी हक्कांशिवाय कोणत्याही व्यक्तिला आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास करून घेणे शक्य होणार नाही. इतकेच नव्हे तर हक्कांशिवाय व्यक्तिला चांगल्या प्रकारचे जीवन जगणेही शक्य होणार नाही. मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे. प्रत्येक व्यक्ति समाजाचा घटक या नात्यानेच आपले जीवन जगत असतो. मानवाला आपल्या प्राथमिक किंवा जीवनावश्यक गरजांची पूर्तता करता यावी म्हणून सामर्थ्य प्रदान केले असते. परंतु ह्या सामर्थ्याचा तो मर्जीप्रमाणे वापर करू शकत नाही. त्याकरिता समाजाने व्यक्तिला काही संधी किंवा सवलती देऊ केलेल्या असतात. सामाजिक जीवनात व्यक्तिला प्राप्त झालेल्या अशा संधी किंवा सवलती म्हणजे 'हक्क' होत.

प्रा. एच. जे. लास्की ह्यांच्या मते 'हक्क म्हणजे सामाजिक जीवनाची अशी परिस्थिति होय की, ज्याशिवाय व्यक्तिला सामान्यतः स्वतःचा सर्वांगीण विकास करून घेणे शक्य होत नाही.'

प्रा. बोझाके ह्यांच्या मते, "आपण ज्या समाजाचे घटक असतो त्या समाजाच्या सर्वोच्च कल्याणाच्या दिशेने आपल्या जीवनाचा विकास घडवून आणण्यासाठी आवश्यक असणारी साधने म्हणजे हक्क होत."

**हक्कविषयक सिद्धांत**:

**नैसर्गिक हक्क सिद्धांत**: ह्या सिद्धांताचे पुरस्कर्ते असे सांगतात की, हक्क म्हणजे मानवाला निसर्गाकडून मिळालेली देणगी होय. हक्क हे निसर्गदत्त असल्याने ते मानवापासून हिरावून घेतले जाऊ शकत नाहीत. मनुष्यप्राणी या नात्यानेच प्रत्येक मानवाला हक्कांचाही लाभ झाला आहे. म्हणून हक्क मानवाच्या व्यक्तिमत्वाचे व जीवनाचे अविभाज्य भाग आहेत. तसेच हक्क सर्व व्यक्तींना समानतेने लाभले आहेत. त्यामुळे हक्कांच्या बाबतीत व्यक्ति व्यक्तींमध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव नसायला पाहिजे.

**ऐतिहासिक सिद्धांत**: कोणत्याही समाजात रूढी व परंपरा ह्यांना अतिशय महत्वाचे स्थान लाभलेले असतात. दीर्घकाळापासून त्यांचे पालन केले जाते. कालांतराने त्या रूढी व परंपरानांच हक्काचे स्वरूप प्राप्त होते. प्रा. रिची असे म्हणतात, पूर्वापार चालत आलेल्या आणि लोकांना हव्याश्या वाटणा-या रूढी, संकेत, परंपरा हे हक्कांचे मूळ आहे.

**आदर्शवादी सिद्धांत**: आदर्शवादी सिद्धांतालाच 'व्यक्तिमत्व सिद्धांत' असे म्हणतात. टी. एच. ग्रीन असे म्हणतात की, 'मानवाला नैतिक जीवन जगण्यासाठी आणि स्वातंत्र्यासाठी हक्कांची आवश्यकता असते.' आदर्शवादी सिद्धांताचे पुरस्कर्ते मानवाच्या आंतरिक विकासाला अधिक महत्व देतात. थोडक्यात असे म्हणता येईल की, हक्कांशिवाय मानवाला आपला सर्वांगीण विकास साधने शक्य होत नाही. म्हणूनच ग्रीन असे म्हणतात की, 'मानवाच्या आंतरिक विकासासाठी आवश्यक असलेली बाह्य परिस्थिति म्हणजे हक्क होय.'

**वैधानिक सिद्धांत**: जेरेमी बेंथम, जॉन ऑस्टिन, सिद्धांताचे प्रमुख पुरस्कर्ते आहेत. ह्या अभ्यासकांच्या मते 'हक्क' ही राज्याची निर्मिती आहे. राज्य ज्या हक्कांना मान्यता देते त्या हक्कांचाच व्यक्तिला लाभ घेता येतो. राज्याने केलेल्या प्रत्येक कायद्याला दंडशक्तीचे पाठबळ लाभत असल्यामुळे त्या कायद्यांचे लोकांकडून योग्य प्रकारे पालन केले जाते.

**सामाजिक कल्याण सिद्धांत**: प्रा. एच. जे. लास्की हे या सिद्धांताचे समर्थक आहेत. तसेच जेरेमी बेंथम जॉन स्टुअर्ट मिल हे सुद्धा या सिद्धांताचे प्रमुख समर्थक आहेत. ह्या अभ्यासकांच्या मते सामाजिक हित किंवा सामाजिक कल्याण हाच हक्कांचा मुख्य निकष असतो. व्यक्तिला प्राप्त होणा-या हक्कांतून सामाजिक हित किंवा सामाजिक कल्याण साधले जाते. म्हणजे सामाजिक हित किंवा सामाजिक कल्याण हाच हक्कांचा मुख्य आधार मानण्यावर त्यांचा विश्वास आहे.

अशाप्रकारे, 'मानवी हक्क' हे व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा अविभाज्य भाग होत. हक्कांशिवाय मानव चांगले जीवन जगने अशक्य आहे. व्यक्तीचा आंतरिक विकास तसेच भौतिक विकास ह्या दोहोंचाही आधार हक्क हेच असतात. म्हणून 'मानवी हक्क' हे मानवाच्या संपूर्ण व्यक्तिमत्वाशी निगडीत असतात.

मानवी हक्कांबद्दल महत्वाचे वैशिष्ठ्य म्हणजे मानवी हक्क सर्वांना समान असले पाहिजे. मानव जातीच्या सर्व घटकांना म्हणजेच सर्व व्यक्तींना ते समानतेने प्राप्त झालेले असतात.

वरीलप्रमाणे मानवी हक्क म्हणजे काय व मानवी हक्क व्यक्तीच्या विकासाला किती महत्वाचे आहे हे समजून येते. परंतु आज ही अशी अनेक घटक / व्यक्ति आहेत त्यांना निसर्गदत्त अधिकार प्राप्त झाले नाही. एवढेच काय तर शासनाच्या धोरणांमुळे किती विध्यार्थ्यांना शिक्षण सुद्धा घेता येत नाही. तांडा, वस्ती, पोड ह्यामध्ये शाळा नाहीत. कितीतरी शाळा अल्प पटसंख्या असलेल्या शाळा आहेत. ह्या विध्यार्थ्याकडे अनेक बाबतीत दुर्लक्ष होते. त्यामुळे त्यांचा विकास खुंटतो. म्हणजे विकासापासुन वंचित राहतात. शाळा बाह्य विद्यार्थ्यांची संख्या भरपूर आहे. प्रस्तुत शोध निबंधात शिक्षण ह्या मानवी हक्कांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. कारण मानवाचे सर्वांगीण व्यक्तिमत्वाचे / विकासाचे एकमेव प्रभावी साधन म्हणजे शिक्षण होय.

**'शिक्षण' मानवी हक्क**: शिक्षण हे रोजच्या गरजेच्या अन्ना सारखे आहे. शिक्षण हे सामाजिक न्याय सुनिश्चित करण्याचे साधन आहे. उच्च शिक्षणाद्वारे समाजातील सामाजिक व आर्थिक परिस्थितीतील फरक कमी होऊ शकतो. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या आयुष्यात सर्वात जास्त महत्व शिक्षणाला दिले. शिक्षणामुळेच मनुष्य उत्कर्ष करू शकतो, असे फक्त प्रतिपादन केले नाही तर त्यांनी कृतीद्वारे इतरांसमोर आदर्श ठेवला. शैक्षणिक संस्था ह्या ज्ञान देण्याचे पवित्र काम करीत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या मते, प्रत्येक शैक्षणिक संस्था ही समाज बदलणारी संस्था असली पाहिजे. आणि त्याचा उपयोग चारित्र्य संपन्न व्यक्ति निर्माण होण्यास व्हावा. परंतु आज अनेक शैक्षणिक संस्थेचे सामाजिक भान लुप्त होऊन त्या व्यावसायिक झालेल्या आहेत. प्रवेश शुल्क, परिक्षा शुल्क व इतर अनेक शुल्क मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. त्यामुळे अनेक विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहण्याची परिस्थिति निर्माण झाली आहे.

भारताचा स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा होत असतांना शिक्षण शेवटच्या घटकांपर्यंत गेले नाही ही चिंतनीय व राष्ट्रीय प्रगतीस फार धोकादायक आहे. भारतात शिक्षणाचे वारे ख्रिस्ती मिशनरी कार्यकर्ता, महात्मा ज्योतीबा फुले, सावित्रीबाई फुले, छ. शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. पंजाबराव देशमुख ह्या सुधारकांमुळे वाहू लागले, आणि आज जो शिक्षणाचा प्रसार झाला व होत आहे ह्याचे श्रेय ह्यांनाच जाते. शैक्षणिक (शाळा-महाविद्यालय) हे खरे विचारप्रवर्तक व संस्कारकेंद्र आहेत. शिक्षणातून देश निर्माण होत असतो यावर कोणतीही तडजोड नसली पाहिजे. मात्र आज वर्तमान काळात शिक्षण क्षेत्राचे बाजारीकरण झालेले आहे. शाळा-महाविद्यालयात अनुदानित आणि विनाअनुदानित हा फरक नसला पाहिजे. आज मात्र शिक्षण क्षेत्रात सर्वसामान्य विध्यार्थी मात्र अस्वस्थ झालेला आहे. अपप्रवृतींनी शिक्षणाला आणि शैक्षणिक क्षेत्राला रसातळाला नेले आहे.

कनिष्ठ वर्गामध्ये शिक्षणाची म्हणण्यासारखी प्रगति अद्याप झाली नाही. बहुजन समाजाच्या शिक्षणाची हेळसांड चालविली आहे. त्यामुळे अनेक विद्यार्थी शैक्षणिक प्रक्रियेपासुन दुर ठेवली जातील.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानात मूलभूत हक्कांचा समावेश केला. त्यात शैक्षणिक अधिकार हा मानवी अधिकार आहे. व्यक्तिला चांगले जीवन जगता यावे, स्व:विकास करता यावा, प्रतिष्ठा प्रस्थापित करता यावी, विकासाची संधी व संधीची समानता मिळावी ह्यासाठी सर्वांना शिक्षणाचा मूलभूत हक्क प्राप्त व्हावा ह्याची तरतूद भारताच्या संविधानातच केलेली आहे. कारण शिक्षण मानवाचा मूलभूत अधिकार आहे. शिक्षण ही सर्व बाल, तरुण व वृद्धांना सर्वांगीण विकासाकडे नेणारी जागतिक चळवळ आहे. ह्या जागतिक चळवळीची सुरुवात १९९० साली जागतिक शिक्षण अभियानात झाली.

आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांसाठी आंतरराष्ट्रीय करार ज्या सर्वांना मोफत, सक्तीचे प्राथमिक शिक्षण मिळण्याचा हक्क मान्य करतात अशा माध्यमिक शिक्षणाचा विकास करण्याचे बंधन असलेल्या अनेक आंतरराष्ट्रीय अधिवेशनात शिक्षणाचा हक्क मानवाधिकार म्हणून मान्यता प्राप्त झाली आहे. शिक्षणाचा हक्क एक असा वैश्विक हक्क आहे जो मानवी हक्क म्हणून ओळखला जातो. आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक आंतरराष्ट्रीय करारानुसार शिक्षणाचा हक्क म्हणजे सर्वांसाठी मोफत व सक्तीचे होय. ज्या लोकांनी आपले प्राथमिक शिक्षण पूर्ण नाही केले, त्यांच्यासाठी पायाभूत शिक्षण देण्याची जबाबदारी सुद्धा शिक्षणाच्या हक्कात येते. शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी शिक्षण संस्थेच्या सर्व

पातळीवर भेदभाव कमी करण्याचा बंधनाचा शिक्षणाच्या हक्कात समावेश होतो.

शिक्षण एक अर्थपूर्ण हक्क होण्यासाठी ४ A महत्वाचे आहेत. ते म्हणजे; Available (उपलब्धता), Accessible (सुगमता), Acceptable (स्विकार्यता) व Adaptable (अनुकूलता).

**उपलब्धता**: सरकारकडून जे निधि प्राप्त होते त्यातून विद्यार्थी जिथे शिकतात तेथे आधारभूत संरचना आणि सुविधा, पुरेशी पुस्तके आणि इतर साहित्ये उपलब्ध असली पाहिजेत.

**सुगमता**: सर्व मुलांना लिंग, जात, धर्म, जातीयता आर्थिक स्थिति ह्या आधारावर भेद न करता सर्वांना शिक्षणाची साधने उपलब्ध झाली पाहिजे. एका विशिष्ट अंतरावर शाळा असायला हवी, नसल्यास वाहतूक व्यवस्था पुरवल्या जावी तसेच पुस्तके, गरजा आणि गणवेश मुलांना पुरविले पाहिजेत. शिक्षण सर्वांना परवडणारे असावे. विशेष मुलांना शिक्षणाचा हक्क आहे.

**स्विकार्यता**: दिले गेलेले शिक्षण हे भेदभाव मुक्त, प्रासंगिक आणि सांस्कृतिक अशा सगळया विद्याथ्र्यांसाठी उपयोगी असायला पाहिजे. शिक्षण हे निष्पक्ष आणि वस्तुनिष्ठ असावे. शाळांमध्ये स्वच्छता आणि सुरक्षिततेवर भर असायला पाहिजे.

**अनुकूलनीयता**: शैक्षणिक उपक्रम हे लवचिक आणि सामाजिक बदलानुसार आणि गरजेनुसार जुळवून घेणारे असावे.

अशाप्रकारे, पालकाची जबाबदारी म्हणजे पाल्याचा पहिला शिक्षक बनणे आणि व्यावहारिक शिक्षकांची जबाबदारी म्हणजे एक चांगले गुरु बनणे. नवीन शैक्षणिक धोरण-२०२० अंमलात आले आहे. तब्बल ३४ वर्षांनंतर एज्युकेशन धोरणात बदल होत आहेत. ०३ ते ०६ वयोगटातील मुलांची बौद्धिक वाढ झपाट्याने होत असल्यामुळे ०३ ते १४ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांचा शिक्षण हक्क कायद्यात समावेश झाला आहे. अंगणवाडीला जवळच्या शाळेशी संलग्नीत केले जाणार आहे. दहावी बोर्ड रद्द होणार आहे. आता ९ ते १२ वी पर्यन्त सेमिस्टर पॅटर्न आला आहे. शिक्षण सेवक पद रद्द होणार आहे हे धोरण २०२२-२०२३ शैक्षणिक वर्षासाठी लागू होणार आहे.

ग्रामीण विद्यार्थ्यांची स्थिति: प्रस्तुत शोध निबंधात ग्रामीण विद्यार्थ्यांची स्थिति ही अनुभवाच्या आधारावर प्रस्तुत करण्याचा प्रयत्न करीत आहे. दि. १४ नोव्हेंबर २०२२ ला उमरखेड तालुक्यातील जि. प. प्राथमिक शाळा, आमदरी व जि. प. प्राथमिक शाळा, जयभीम नगर (कुपटी) येथे भेट देण्यात आली होती. ह्या दोन्ही शाळेत विद्यार्थ्यांची संख्या पटावर खुपच कमी म्हणजे अनुक्रमे १५ व १२ एवढीच आहे. आता प्रश्न हा आहे की महाराष्ट्रात अशा शाळा हजारोंच्या संख्येत आहेत. आणि महाराष्ट्र सरकारने निर्णय घेतलेला आहे की, २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करण्यात येईल. ह्या वरील दोन शाळेत अशी बाब लक्षात आली की, जास्तीत जास्त विद्यार्थी हे वंचित घटकातील आहेत. शाळा बंद झाल्यात तर ह्या विद्यार्थ्यांना कुठे समायोजित करतील? किंवा त्या शाळा लांब असल्या तर शाळेत कसे पोहचतील? वास्तविक ग्रामीण विभागातील अशा शाळा एक शिक्षकी शाळा आहेत. शाळात अनेक सुविधांचा अभाव आहे. विध्यार्थ्यांना पण अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. जि. प. प्राथमिक शाळा कुपटी येथे एकूण १२ विध्यार्थ्यापैकी एस. सी. संवर्गातील ०५, ओबीसी ०३, व इतर ०४ असे विद्यार्थी आहेत. आणि आमदरी येथे सर्व विद्यार्थी एस. सी. संवर्गातील आहेत असे तेथील शिक्षकांनी संगितले.

नविन शैक्षणिक धोरण २०२० नुसार ०३ ते १४ वयोगटातील मुले शिक्षण हक्क प्रक्रियेत आलेली आहेत. जे पूर्वी ०६ ते १४ वयोगटातील मुला-मुलींचा समावेश होता. जर का २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद झाल्यात तर शिक्षणापासून हजारो विद्यार्थी वंचित राहतील अशी भीती निर्माण झालेली आहे. मात्र शिक्षण सर्वांना मिळालेच पाहिजे. शिक्षण हे मानवी हक्क आहे. भारतीय संविधानाच्या कलम २१-अ अंतर्गत ०६ ते १४ वर्षे वयोगटातील ( सुधारित ०३ ते १४) बालकांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण उपलब्ध झाले पाहिजे अशी तरतूद बालकांसाठीच्या मोफत आणि सक्तीच्या शिक्षण अधिनियमात सविस्तर विशद केले आहे. १ एप्रिल २०१० रोजी हा कायदा भारतात अस्तीत्वात आला आणि शिक्षण हा प्रत्येक बालकाचा मूलभूत अधिकार असल्याचे मान्य करणाऱ्या १३५ देशांच्या यादीत भारताला स्थान लाभले.

१ एप्रिल २०१० च्या अधिनियमानुसार बालकांसाठी शिक्षण हा मूलभूत हक्क असल्याचे मान्य करण्याबरोबर प्राथमिक शाळेसाठीच्या किमान अटीही निर्धारित करतो. सर्व खाजगी शाळांमध्ये गरीब कुटुंबातील बालकांसाठी २५ टक्के जागा आरक्षित ठेवणे बंधनकारक आहे. प्राथमिक शिक्षण पूर्ण करेपर्यंत कोणत्याही बालकाला त्याच वर्गात ठेवणे, शाळेतून काढून टाकणे, अथवा मंडळामार्फत घेतल्या जाणाऱ्या परीक्षेत उत्तीर्ण होण्याची सक्ती करणे यांस मनाई आहे. शाळेतून गळती झालेल्या बालकांना त्यांच्या समवयस्क विध्यार्थ्याबरोबर शिक्षण देण्यासाठी विशेष प्रशिक्षणाची तरतूद, परिसरात स्वच्छता राखणे, शिक्षणाची आवश्यकता असणारी बालके हेरून त्यांना आवश्यक त्या सुविधा देण्याच्या दृष्टीने सर्वेक्षण करण्याची तरतूद, शालेय प्राथमिक शिक्षणासाठी विध्यार्थ्यांचा शालेय प्रवेश, उपस्थिती आणि अभ्यासक्रम पूर्ण करणे ह्याची जबाबदारी शासनाकडे सोपवणारा हा जगातला पहिलाच अधिनियम आहे. भारतीय संविधांनानुसार शिक्षण ही बाब संबंधित राज्यांच्या अखत्यारीत येते.

अशाप्रकारे, शिक्षण ही सर्व बाल, तरुण व वृद्धांना सर्वांगीण विकासाकडे नेणारी जागतिक चळवळ आहे. मात्र शैक्षणिक क्षेत्रातल्या चिंतेच्या बाबी म्हणजे शिक्षणातून मिळणाऱ्या कमी दर्जाचे शिक्षण म्हणजे प्राथमिक शिक्षणापासून तर उच्च शिक्षणापर्यंत पोहचण्याचे प्रमाण कमी होत जाते. तसेच शिक्षक व विध्यार्थ्यांचे प्रमाण सुद्धा योग्य नसते. जसे ४०: १

किंवा ४५:१ पेक्षा जास्त असते, कित्येक प्राथमिक शिक्षकांना शिकविण्याची पुरेशी पात्रता नसते.

अशा सर्व परिस्थितीत विद्यार्थी अडकलेला आहे. नविन शैक्षणिक धोरण २०२० विध्यार्थ्यांच्या भवितव्याबाबत कसे 'दिशा दर्शक' ठरणार? हे ते येणारा काळच ठरविणार!

शिक्षण हे मानवी हक्क आहे आणि ते प्रत्येकाला मिळालेच पाहिजे मग तो ग्रामीण विद्यार्थी असो की शहरी. प्रत्येकाला शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे हे राज्याचे नैतिक कर्तव्य आहे. शिक्षणामुळेच व्यक्तीचे संपूर्ण व्यक्तिमत्व विकास होऊ शकते हे आज निदर्शनास आले आहे. मानवी हक्कांपासून वंचित राहिलेल्या व्यक्तिला आपल्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास करून घेणे शक्य होत नाही. म्हणून राष्ट्रीय विकासाच्या प्रक्रियेत प्रत्येक घटकाला आणणे गरजेचे आहे. त्यासाठी शिक्षण आवश्यक आहे. शिक्षण हा ज्ञानप्राप्तीचा सर्वात महत्वाचा मार्ग होय. ज्ञानाला मनुष्याचा तिसरा डोळा असे म्हटले आहे. मनुष्याला ज्ञानप्राप्ती झाली की, त्याचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोण अधिक व्यापक किंवा प्रगल्भ बनतो. अशा ज्ञानप्राप्तीचे साधन म्हणून व्यक्तीच्या जीवनात शिक्षणाला अतिशय महत्व प्राप्त झाले आहे.

**निष्कर्ष**: शिक्षण हे मानवी हक्क आहे हे अभ्यासतांना असे लक्षात येते की, शिक्षण ही प्रत्येक समाजातील मूलभूत प्रक्रिया मनाली जाते. मानवाच्या जन्मापासून (सामाजिक जीवनाच्या सुरुवातीच्या काळापासून) ती सुरू होते आणि आयुष्यभर ती सातत्याने चालूच राहते म्हणूनच शिक्षण ही एक जीवनभर चालणारी प्रक्रिया आहे. शिक्षणातून सामाजिक मूल्ये, नैतिक मूल्ये आत्मसात करतात त्यामुळे व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा, कार्यक्षमतेचा विकास होतो. तसेच शिक्षणामुळे आत्मविश्वास वाढतो, चारित्र्याचे संवर्धन होते. त्यासाठी शैक्षणिक प्रक्रियेतून सवयी, गुण व दृष्टीकोण रुजविले जातात. म्हणून शिक्षणाला अंधारातून प्रकाशाकडे नेण्याचा मार्ग असे म्हटले आहे.

परंतु हेच शिक्षण समाजातील प्रत्येक घटकाला मिळतांना दिसून येत नाही. कारण समाजात सामाजिक आणि आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणात आहे. ग्रामीण विद्यार्थी अनेक सोयी, सुविधांच्या अभावाने व गरीबीमुळे (दारिद्रय), शिक्षणाबाबत असलेल्या जागरूकतेच्या अभावामुळे, शैक्षणिक धोरणामुळे, शासकीय उदासीनतेमुळे शिक्षणापासून वंचित आहेत. ग्रामीण विभागात एक शिक्षकी शाळा आहेत. शिक्षक असतील तर इमारत नाही आणि दोनही घटक असतील तर विद्यार्थी नाहीत अशी परिस्थिति आहे. ह्याचे महत्वाचे कारण म्हणजे इंग्रजी शिक्षणाला आलेले महत्व, तालुका व शहरात इंग्रजी शिक्षण व खाजगी संस्था ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. शिक्षण संस्थेला व्यवसायिकतेचे रूप आले आहे, म्हणजेच शिक्षणाचे बाजारीकरण झालेले आहे. शिक्षण हे रोजच्या गरजेच्या अन्नासारखे आहे. म्हणूनच प्रत्येकाला शिक्षण मिळणे हा मानवी हक्क आहे. शासकीय शैक्षणिक संस्थाकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे. शासकीय संस्थेतील शिक्षक, प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांची पदे भरली जात नाहीत. त्यामुळे शासकीय शैक्षणिक संस्थाचा विकास थांबला. म्हणून विद्यार्थी शासकीय संस्थेऐवजी खाजगी संस्थेमध्ये प्रवेश घेणे पसंत करतात परंतु खाजगी शिक्षण संस्थेत प्रवेश घेणे सगळयांनाच शक्य नाही कारण शुल्क खूप अधिक असते. आजच्या स्थितीत तर सरकारने शुल्क मोठ्या प्रमाणात वाढविले आहे. देशात मोठ्या प्रमाणात खाजगी शैक्षणिक संस्थाचे प्रमाण वाढत आहे. हेच आजच्या सरकारचे शैक्षणिक धोरण आहे काय? फक्त श्रीमंत आणि उच्चवर्गीय अशा मूठभर लोकांना शिक्षण दिले जात आहे. काल-परवा शिक्षणाकडे वळलेला देशातील गरीब, वंचित समाज आता पुन्हा शिक्षणापासून वंचित होत आहे असे चित्र निर्माण झाले आहे. ही अतिशय धोक्याची सूचना आहे. मूठभर सुशिक्षित झाले तर स्पर्धा निर्माण होऊ नये म्हणून गरीब, वंचित समाजाचे शोषण करतील. म्हणून शिक्षण हा मानवी हक्क आहे ते प्रत्येकाला मिळालेच पाहिजे, त्यासाठी संधि निर्माण करणे ही शासनाची जबाबदारी आहे.

वंचित घटकांमधील शैक्षणिक वंचितता आणि त्यांच्या वाट्याला आलेली सामाजिक विषमता हे शतकानुशतके ऐतिहासिक व एकंदर आर्थिक-सामाजिक आणि संरचनात्मकतेपासून वंचित राहिले आहे. दारिद्रय हे मुलांची शाळेत भरती न होण्याचे मुख्य कारण आहे. दारिद्रय व भेदभाव ह्यामुळेच शाळेत न जाण्याचे, शाळेतून गळती होण्याचे व शाळा-बाह्य राहण्याचे प्रमुख कारण आहे.

***संदर्भ:***


*१. थोरात, सुखदेव, 'भारतातील दलित समाज', सेज पब्लिकेशन, न्यू दिल्ली, २०१७.*
*२. आगलावे, प्रदीप, 'राजकीय न्याय', 'दीक्षा' धम्मचक्र प्रवर्तन दिन विशेषांक, २०२२.*
*३. पाटील, व्ही. बी., 'मानवी हक्क', सागर पब्लिकेशन, पुणे, २००९.*
*४. www.wikipedia.org/*
*५. www.vikaspedia.in*

# निबंध एक स्वतंत्र वाङ्:मयप्रकार

***डॉ. स्मिता गणेश अंबादे****, कला वाणिज्य महाविद्यालय, करडी ता. मोहाडी जि. भंडारा*

**प्रस्तावना**: निंबध हा एक स्वतंत्र वाङ्:मयप्रकार आहे. आजचा मराठी निंबध विस्तारीत होत चालला आहे. मराठी निबंध उदयापूर्वी इंग्रजी निंबध प्रकारास तीनशे वर्षाची परंपरा लाभली होती. पाश्चात्य वाङ्:मयात निंबध हा लेखनप्रकार १६ व्या शतकाच्या शेवटी उदयाला आला. त्यांचा जनक मॉतेन हा फ्रेंच लेखक आहे. इंग्रजीत निंबध या लेखनप्रकारास Essay असे म्हणतात. ती फ्रेंच संज्ञेवरून आली. इंग्रजी भाषेतील पहिला निंबधकार म्हणजे फ्रान्सिस बेकन हा आहे. बेकन ने इंग्रजी वाङ्:मयात निंबध प्रकाराला मानाचे स्थान प्राप्त करून दिले. परंतु आधुनिक जगाला निबंध हा वाङ्:मय प्रकार प्रथम उपलब्ध करून दिला तो मॉतेन या निंबधकारानी हेच मानले जाते.

भारतात इंग्रजी शासनकाळात बऱ्याच महत्वाच्या गोष्टी घडल्या. मुद्रणालयाचा प्रांरभ व त्यातुन उदयास आलेली वृत्तपत्रसृष्टी या दोन बाबी अत्यंत महत्वपुर्ण ठरल्या. मुद्रणालयामुळे पाठयपुस्तकाबरोबरच वृत्तपत्रे, मासिके, साप्ताहिके, यांचाही प्रसार वाढत राहिला. एकोविसाव्या शतकाच्या आरंभी विद्याप्रसारास सुरूवात झाली. 'दर्पण ', 'अरूणोदय', 'ज्ञानप्रकाश', 'विविध ज्ञानविस्तार', प्रभाकर' या सारखी वृत्तपत्रे निघत होती. लोकजागृतीला आणि समाज प्रबोधनाला त्यांनी हातभार लावला. उदा. बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी, महात्मा फुले, न्यायमुर्ती रानडे, विष्णुबुवा, दादोबा पद्मनजी इत्यादी गद्य लेखकांनी मराठी निबंधाचे प्राथमिक स्वरूप स्पष्ट केले. उपरोक्त लेखकांनी निबंधाचा फुलोरा फुलवित ठेवला आणि निबंधसाहित्याला मराठी साहित्याचे भूषण केले. खऱ्या अर्थाने समाजाचे उद्बोधन झाले ते निबंध साहित्याने.

इ.स. १९७४ साली विष्णुशास्त्री चिपळुणकर यांनी निबंधमाला या आपल्या मासिक पत्रिकेस आरंभ केला होता. निबंधमालेचा आरंभ हा महाराष्ट्रातील नव्या युगाची नांदी ठरला. विचारजागृती हे निबंधाचे अंग झाले आणि हळूहळू मराठी निबंधाला एक विशिष्ट असे भारदस्त रूप प्राप्त होत गेले. निबंध विस्तारीत गेले. मराठीत अनेक निबंधकार होउन गेले आणि अजुनही निबंध लेखन चालु आहे मराठी भाषेचे म्हणुन मान्यता पावलेल्या विष्णुशास्त्री चिपळुणकरांना मराठीतील पहिले निबंधकार म्हणुन मानाचे स्थान प्राप्त झाले आहे.

**निबंध म्हणजे काय** ? : निबंध या शब्दाचा अर्थ समजावून घेतल्यास वाङ्म:यप्रकाराचे स्वरूप ध्यानात येते. वास्तविक पाहता या प्रश्नाचे उत्तर एकच असावयास हवे. पण ज्यांनी उत्तमोत्तम निबंध लिहिले त्यांनी व ज्यांनी निबंधरचनेसंबधी विवेचन केले त्यांनी अनेकवेळी निबंधाच्या वेगवेगळया व्याख्या केल्या आहेत. वाङ्:मय रचनेचा मोठा, जो निबंध या रूढ अर्थाने परिचित आहे. मराठी शब्दकोशात 'निबंध ' शब्दाचा अर्थ प्रबंध, नियमबद्ध असणारा लेख, मोठा लेख, नीटपणे पक्का जडलेला लेख असा अभिप्रेत आहे. निबंध म्हणजे कशाचातरी प्रयत्न करणे, परिक्षण करणे, यत्नपुर्वक रचना करणे असा प्रत्ययास येतो. लेखनाची लांबीरूंदीतही निबंधाचे मोजमाप करता येत नाही. निबंधाला विषयाचेही बंधन नाही. 'निबंध ' या शब्दाचा अर्थ सांगावे, व या वाङ्:मया प्रकाराची बरोबर व्याख्या देणे अवघड आहे. निबंधाचे स्वरूप व त्याची लक्षणे यांचे विवेचन करतांना निरनिराळया दृष्टीकोनातून विचार करण्यात आला आहे. लेखकांनी वेगवेगळया अंगाने निबंधाविषयी मत मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**निबंधाच्या व्याखा**:

डॉ. जॉन्सन यांच्या मते. 'A loose Sally of the mind ,an irregular indigested piece ,not a regular or orderly performance.'[१]

जे. एच. फाऊलर यांच्या मते, 'A piece of writing on or about a given subject, making no pretentions to completeness or scientific accuracy.'[२]

प्र. न. जोशी यांच्या व्याख्येनुसार, 'आरंभ परिक्षा उपक्रम परिक्षणम् प्रयत्नः, निबंधः, प्रबंधः, लेख्यम् यासारख्या अर्थावरून निबंध म्हणजे प्रयत्न करणे, परिक्षण करणे, यत्नपूर्वक रचना करणे होय.''[३]

जे. बी. प्रिस्टले यांच्या मते· 'The true essay approximate to familiar talk and the essayist is the brilliant and self revealing conversa-tionalist whose phrase every phrase is salted with personality.'[४]

'एखाद्या विषयावर लिहीलेला नेमस्त आकाराचा किंवा लांबीचा लेख म्हणजे निबंध होय.'

'मनाचा मुक्त संचार असलेले विशेष पचनी न पडलेले असे सुसूत्र व सुव्यवस्थित नसलेले लिखाण.'

अशाप्रकारे निबंध या शब्दाचा अर्थ समजून घेतला तर या वाङ्:मयप्रकाराचे स्वरूप् लक्षात येते. हा वाङ्:मयप्रकार सतत लोकप्रिय राहिला आहे. 'निबंध हे मराठी साहित्याचे गौरवशाली अंग आहे. याचा सर्वोतोपरी विचार करून लेखकांनी वरील व्याख्याद्वारा याचा अर्थ उलगडून दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**निबंधाची घटकतत्वे:** निबंध हा वाङ्:मयप्रकार म्हणजे साहित्य पवनातील हिरव्यागार गवताच्या गालिच्याने आच्छादलेली जणू पाउलवाटच, असे म्हटले गेले आहे. निबंधकराची वृत्ती ही बागेत फिरणाऱ्या रसिक मालकाप्रमाणेच असावयास पाहिजे. श्रेष्ठ निबंधकाराच्या निबंधात काव्यशास्त्र विनोदाचा त्रिवेणी संगम झालेला पाहवयास मिळतो. अभिजात निबंधकार हा बहुश्रृत असतो. एवढेच नव्हे तर बहुगुणीही असतो. तो संचारी वाङ्:मप्रकार आहे. वाणीतुन प्रकट होणारे विचार हे जसे सुसंगत असणे अगत्याचे आहे. तसेच लेखनीतून झरणारे विचारही सुसंगत असावेत. मनात जे म्हणावयाचे तेच लेखणीतून उतरावे यातच सार्थकता आहे आणि हिच सार्थकता निबंधकार प्रत्ययास आणतो.

एखादा विचार किंवा एखादा मुद्दा सुसंगतपणे ज्यात मांडलेला असतो. तो निबंध जे. बी. प्रीस्टले यांनी ' पास्ट अॅण्ड प्रेझेंट' या ग्रंथात निबंधाच्या स्वरूपाविषयी लिहितांना म्हटले आहे. 'मनोरंजन संभाषणाशी निबंधाचे साम्य आहे. लेखकाच्या व्यक्तिमत्वातून निबंध आकारास येतो. कडू गोड आठवणी, आत्मचरित्रात्मक हृदय उल्लेख, सुख दुःखाचा अनुभव इत्यादी माल-मसाल्यांनी निबंध सजत असतो. हा विवेचनाचा रोख आहे. [५] डॉ. म. ना अळेतकर आपल्या 'मराठी निबंध' या ग्रंथात म्हणतात, 'अनिर्बंधता ही निबंध या वाङ्मय प्रकाराचा अभ्यासाच्या दृष्टीने सर्वात महत्वाची मर्यादा होय.

**निबंधाचा उदय:** निबंधाचा अभ्यास करतांना निबंधाच्या निर्मितीचा, उदयाचा विचार करणे अत्यावश्यक आहे. कारण खऱ्या अर्थाने समाजात विचार जागृती आणि समाजप्रबोधन करण्याचे कार्य ते निबंध साहित्याने 'निबंध' हा वाङ्मयप्रकार मराठी साहित्यात १९ व्या शतकाच्या आरंभी जरी उदयास आल्या असला तरी सुध्दा इंग्रजी साहित्यात १५ व्या शतकापासुनच याची बीजे रोवल्या गेली होती. मराठीतील निबंध हा वाडःमयप्रकार इंग्रजी परंपरेतून निर्माण झाला व आकारास आला.

(१५३३-१६०३) राणी एलिझाबेथच्या कारकिर्दीत इंग्रजी गद्याला आकार प्राप्त झालेला होता. मुद्रणकलेच्या प्रभावामुळे गद्यनिर्मितीस चालना मिळाला होती. इंग्रजी भाषेत नाव घेण्यासारखा पहिला निबंधकार म्हणजे फॅान्सिस बेकेन याने प्रथम धर्म, निती, वाचन, मृत्यु, मत्सर, प्रवास इत्यादी विषयावर प्रौढ, गंभीर पण सुत्रमय भाषेत निबंध संज्ञेत लिखाण लिहिण्यास सुरूवात केली. बेकनच्या तत्वस्पर्शी लेखणीने त्याला इंग्रजी वाङ्मयात अमर करून ठेवले. बेकनच्या निबंधाची पहिली आवृत्ती १५९७ मध्ये निघाली.

सन १६०३ मध्ये फ्रेंच भाषेतील विख्यात निबंधलेखन मॉतेन (१५३३-१६०३) यांच्या फ्रेंच निबंधाचे इंग्रजी भाषांतर प्रसिध्द झाले. आधुनिक जगाला निबंध हा वाडःमय प्रकार प्रथम उपलब्ध करून दिला, तो खरे म्हणजे मॉतेनने. मॉतेन याने जे लेख लिहिले. त्यांनाच प्रथम (Essay) निबंध असे नाव मिळाले. तेव्हा फ्रेंच वाडःमयातील प्रथम निबंधकार मॉतेन हा मानला जातो.

मॉतेन हा कलात्मक निबंधाचा प्रणेता सन १५७१ मध्ये एका मोठया राजवाडयात बंदिस्त होउन तेथील एकान्तवासात चिंतन, आत्मचिंतन, स्वैरचिंतन सुरू केले तेच निबंधाच्या रूपाने जगासमोर आले. बेकन व मॉतेन आद्य निबंधकार मानले तरी दोघांपुर्वी निबंध वा निबंधसदृष्य लेख नव्हते काय? असा प्रश्न पडतो. 'निबंध' हा शब्द जरी उशीरा आला असला तरी ती वस्तू फार जुनी आहे, असे स्वतः बेकन म्हणतो. 'ग्रेट एसेज ऑफ ऑल नेशन्स' या पुस्तकात ई. एच. प्रिचार्ड यांनी, 'जगातील इतर देशांच्या बरोबर हिन्दुस्थानातील साहित्याचा उल्लेख करतांना महाभारत, विष्णुपुरान, वेदान्तसुत्रे इत्यादीतील उतारे निबंधाची पुर्वावस्था आहे. असे म्हटले आहे.'[६]

वरील सर्व विवेचनावरून आपल्याला निबंधाच्या उदयाची कल्पना येते. 'निबंध' हा प्रहार आधुनिक नाही, तर फार प्राचीन काळापासून हा अस्तित्वात आहे. मनुष्य लेखनकला शिकला त्याने आपल्या मनातील विचार किंवा मतांचा प्रसार करण्यासाठी वैचारिक लेखनास सुरूवात केली आणि हे लेखन वृत्तपत्रांच्या आणि मासिकांच्या माध्यमातून वाढीस लागले आणि निबंधाचा जन्म झाला.

**स्वातंत्र्यपूर्व निबंध**: भारतात इंग्रजी राजवटीबरोबर अनेक नवलाई पण व्यावहारिक जीवनात उपयुक्त अशा गोष्टी जनतेसमोर आल्या. त्यात वृत्तपत्रे, मासिके, साप्ताहिके यांचा उल्लेख महत्वाचा वाटतो. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात निबंध वाङ्मयामागे लोक जागृतीची तळमळ होती. धडपड होती. निबंधाचे स्वरूप बहुतांशी प्राथमिक, अविकसीत होते. आणि हळूहळू आकारात येत होते. ती पायाची खणणी होती, पाया भरणी नव्हती. श्री. वि. स. खांडेकर म्हणतात, '१८७४ पुर्वीच्या बहूतेक निबंधकाराच्या दृष्टीने लेखन हे ज्ञानप्रसाराचे व समाजसुधारणेचे एक साधन होते. या एकाच दृष्टीने ते लेखन लिहित गेले. तलवारीला साधी मुठ असली काय? किंवा रत्नजडीत मुठ असली काय? शत्रूशी लढतांना महत्व असते ते तिच्या धारेचे. अशीच जणू काही त्यांची कल्पना होती. त्यामुळे आपला विचार नटवून, फूलवून किंवा साहित्यगुणात घोळवून सांगण्याचा प्रयत्न करणारा निबंधकार त्या काळात जवळजवळ झालाच नाही, असे म्हटले तरी चालेल.' [७]

१८७२ मध्ये 'दर्पण' या पत्रास प्रारंभ झाला. त्यातील संपादकीय स्फुट लेख व वाचकांची पत्रे हीच निबंधाची 'गंगोत्री' मानली जाते. १८७४ मध्ये विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी 'निबंधमाला' सुरू केली आणि निबंध दृष्टया इंग्रजी हे युग संपुष्टात येऊन नव्या युगाची पहाट झाली. १८४० मध्ये 'प्रभाकर', १८४१ मध्ये 'ज्ञानोदय', १९४९ मध्ये 'ज्ञानप्रकाश', १८५० मध्ये 'मराठी ज्ञानप्रसारक', १८६२ मध्ये 'इंदुप्रकाश', १८६४ मध्ये 'नेटीव ओपिनियन' यासारख्या पत्रांनी मराठी निबंध निर्मितीस चांगलाच हातभार लावलेला दिसतो. स्वातंत्र्यपूर्व गद्य लेखकांनी मराठी निबंधाचे प्राथमिक स्वरूप सिध्द केले.

निबंधाचे कालपरत्वे दोन विभाग पडतात. १८३२ ते १८४९ हा पहिला विभाग होय. यात 'मिसेस फेरार' आणि लोकहितवादी हे दोन प्रमुख निबंधकार दिसतात. १८४९ मध्ये 'मराठी ज्ञानप्रसारक' मासिक सुरू झाले व निबंधाचा दुसरा कालखंड (दुसरा विभाग) भवतरजा दिक्षीत, मांडलिक, मांडलिक पद्मनजी, विष्णुबुवा व समकालीन निबंधकराचा हा कर्तुत्वकाळ पूर्वार्धाच्या तुलनेने उत्तरार्धातील निबंध सर्व बांजुनी विकसित झाला. तसेच चिपळुणकर, टिळक, आगरकर, या तिघांचीही वृत्ती सारखीच उत्कट, आग्रही निर्भयी आणि निस्पृह होती. त्यांचा प्रत्येक शब्द आत्मविश्वासाने आणि चारित्र्याच्या तेजाने लखलखत होता. मराठी भाषेचे सामर्थ्य याच काळात वाचकाच्या प्रत्ययास आले आणि नव्या जागृतीचे युग सुरू झाले. हा काळ नवे युग निर्माण करणारा होता.

**स्वातंत्र्योत्तर निबंध**: निबंध हा वाङ्‌मय प्रकार स्वातंत्र्यपूर्व कालखंडात उत्कर्षात पोहचला आणि लोकप्रियही ठरला. स्वातंत्र्य काळानंतर व नवविचारांचे लोण समाजातील विविध थरापर्यत पोहचविण्याचे काम मराठी निबंधाने केले. स्वातंत्र्यानंतर निबंधकारात अनेक समर्थ आणि श्रेष्ठ निबंधकार नव्या पीढीत अस्तित्वात आले. आणि मराठी साहित्यात त्यांनी आपले स्वतंत्र असे मानाचे स्थान निर्माण करून ठेवले आहे. अलीकडच्या काळातील निबंधकार म्हणजे श्री. म. माटे, काका कालेलकर, विनोबा भावे, पु. ग. सहस्त्रबुध्दे, साने गुरूजी, ग. त्र्य. माडखोलकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बॅरिस्टर सावरकर, प्र. के. अत्रे, द. के. केळकर, मा. दा. अळतेकर, पु. भा. भावे, पा. वा. गाडगीळ, प्रभाकर पाध्ये, ह. रा. महाजनी, महात्मा फुले, डॉ. म. ना. वानखेडे, बाबुराव बागुल, केशवराव भोळे, वा. ना. देशपांडे, पु. म. लाड, म. भि. चिटणीस, वामन निबांळकर, डॉ. यशवंत मनोहर, डॉ. गंगाधर पानतावणे, डॉ. प्रकाश खरात इत्यादी श्रेष्ठ निबंधकार म्हणून ओळखले जातात. समाजाच्या, देशाच्या उद्धारार्थ थोर कार्यकर्त्यांची परंपरा उभी होउन ठाकली आणि निरनिराळया क्षेत्रात या सर्वांनी अभूतपूर्व कर्तृत्व केलेले आहे.

स्वातंत्र्यानंतर निबंध निर्मितीच्या क्षेत्रात केवळ पुरूषांचीच मक्तेदारी राहिली नाही. स्त्रियांनीही मोठया प्रमाणात निबंध लेखनास प्रारंभ केला आणि निबंधक्षेत्रात मानाचे स्थान प्राप्त केले. मराठी निबंधावर आपली स्वतंत्र अशी छाप पाडून वाचकांचे लक्षवेध्धार्यार्या वेधणाऱ्या दुर्गाबाई भागवत या आजच्या एक ज्येष्ठ-श्रेष्ठ लेखिका आहे. त्यांच्या अनेक पुस्तकांवरून वैचारिक निबंधकार तसेच ललीत निबंधकार म्हणूनही दुर्गा भगवताची योग्यता सहज ध्यानात येण्यासारखी आहे. आधुनिक युगात साने गुरूजीसारखे श्रेष्ठ निबंधकारदेखील आपल्याला लाभले. त्याचे निबंधसाहित्य म्हणजे त्याच्या व्यक्तित्वाचे लखलखीत आरसे आहे. ज्ञानपिपासू विद्यार्थी, समाजाचे अज्ञान पाहून विव्हळ होणारे सुधारक आणि उच्च जीवनमूल्ये ही केवळ विचाराकरिता नसून आचाराकरिता असतात. अशी श्रध्दा बाळगणारा संत यांचे विलक्षण मिश्रण सानेगुरूजीच्या व्यक्तिमत्वात झाले. माडखोलकर निर्भीड कलावादाचे, सौंदर्यवादाचे पुरस्कर्ते आहेत. त्यांची निबंधरचना अगदी बांधेसुद, रेखीव व घोटीव आणि चिरेबंद राहिली आहे. त्यांनी लिहीलेले ‘मृत्यूलेख’ निबंध लेखनाचे उत्कृष्ठ नमुनेच म्हटले पाहिजे.

**मराठी निबंधाचा उगम**: मराठी सहित्यात निबंधरचनेचे मूळ याबद्दल अनेक साहित्यिकांची निरनिराळी जी मते आहेत. त्यांचा विचार करणे आपल्याला अपरिहार्य आहे. याबद्दल मा. गो. देशमुख यांनी ‘निबंधपरिमल’ नावाच्या पुस्तका मध्ये असे म्हटले आहे की, 'मराठी निबंधाचे मुळ आपणास बहुतांशी संस्कृत दर्शनातील ‘अधिकरणात’ सापडते.'[८] प्रिचार्ड यांच्या मते, 'जगातील बहुतेक सर्व वाङ्‌मय निबंध या संज्ञेस प्राप्त होतात.'[९] बेकन यांच्यामते, 'दि वर्ड एसे इज लेट, बट दि थिंग इज एन्षण्ट.'[१०] प्र. न. जोशी यांचे मते, 'इंग्रजी निबंधाच्या वाचनानंतर मराठी प्रारंभी निबंध तयार झालेले दिसतात. सुरूवातीचे निबंध हे इंग्रजी वाङःमयाच्या परिशिलनाचे फल मानावे लागेल.'[११] अशाप्रकारे मराठी निबंधाच्या उगमाबद्दल निरनिराळी मते दिसतात.

मराठी निबंध म्हणजे रचनाबध्द, वस्तूनिष्ठ दृष्टीने लिहिलेला विचारप्रर्वतन लेख होय. इंग्रजी निबंधाच्या वाचनानंतर मराठीतील प्रारंभी कितीतरी निबंध तयार झालेले दिसतात. विचार प्रवर्तक अथवा पांडित्यपूर्ण विवेचनाचा निबंध जॉन्सन मेकाले प्रभुतीच्या परिचयाने मराठीत आला. मराठी निबंधाचे मूळ आपल्याला संस्कृतीमध्ये मिळणार नाही. कारण संस्कृतात या स्वरूपाचे लेखन अपवादात्मकच झाले असेल यात शंका नाही. मराठी निबंध परंपरेच्या विकासाच्या तीन प्रमुख अवस्था दृष्टीस पडतात. १) निबंधमालापुर्व मराठी गद्यातील. २) निबंधमालेच्या परिणामाने निर्माण झालेली. ३) आधुनिक काळातील ललीत निबंधाची वा लघु निबंधाची.

'मराठी निबंध वाढला, फुलला तो वृत्तपत्रे, साप्ताहिक, मासिक, यांच्याव्दारेच, केसरी, सुधारक करमणूक, संदेश यासारख्या पत्रांनी निबंध वाङ्‌मयाची जोपासना केली.'[१२] असे प्र. न. जोशी म्हणतात. मागील शतकातच मराठी निबंधाच्या स्वरूपाला विकसित रूप आले. त्यापुर्वी मराठी निबंध जरी अस्तित्वात होते पण त्यांचे स्वरूप हे अविकसित होते. मराठी निबंध सर्वस्वी आधुनिक आहे. पण प्रारंभी तरी ते इंग्रजी वळणावरचे आहे. शेवटी हाच निष्कर्ष प्रत्ययास येतो की, इंग्रजी निबंधाप्रमाणेच मराठी निबंधही वृत्तपत्रांच्या आश्रयानेच वाढीस लागला. लोकजागृतीचे, ज्ञानप्रसाराचे, विचार जागृतीचे, समाज प्रबोधनाचे, करमणूकीचे एक प्रभावी साधन म्हणून वर्तमान पत्राचा व नियतकालिकांचा उदय झाला आणि त्यांच्या आश्रयाने निबंधाचा परिपोष होत राहिला.

*संदर्भ टीपा*


१. *जोशी प्र. न., निबंधशास्त्र व कला, १९९९, पृष्ठ क्र. १९.*
२. *तत्रैव, पृष्ठ क्र. २०.*
३. *तत्रैव, पृष्ठ क्र. १७.*
४. *तत्रैव, पृष्ठ क्र. २०.*
५. *तत्रैव, पृष्ठ क्र. २०.*
६. *तत्रैव, पृष्ठ क्र. २०.*
७. *खांडेकर वि. स., प्रदक्षिणा खंड -१, पृष्ठ क्र. ३०.*
८. *कुलकर्णी वि. ह., अनिरूध्द कुलकर्णी, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे-३०.*
९. *जोशी प्र. न., निबंधशास्त्र व कला, पृष्ठ क्र. ३०.*
१०. *तत्रैव, पृष्ठ क्र. ३१.*
११. *तत्रैव, पृष्ठ क्र. ३१.*
१२. *तत्रैव, पृष्ठ क्र. ३१.*
१३. *तत्रैव, पृष्ठ क्र. ३९.*

# मधु लिमयेजी यांचे राष्ट्र उभारणीच्या कार्यातील योगदान: एक दृष्टीक्षेप

***डॉ. राजेंद्र बेलोकार****, राज्यशास्त्र विभाग प्रमुख, एस. एन. मोर महाविध्यालय, तुमसर जि. भंडारा*

**प्रस्तावना**: स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर भारतीय राजकारणाला आधुनिक विकासाच्या मार्गावर घेऊन जाण्यासाठी ज्या महान नेत्यांनी प्रमुख भूमिका बजावली. त्यापैकी मधू लिमयेजी एक प्रमुख विचारक आणि निष्ठावान कार्यकर्ता होते. ते भारतीय समाजवादी नेता राम मनोहर लोहिया याचे अनुयायी असून गोवा मुक्ती संग्राम मध्ये सुद्धा त्यांची मुख्य भूमिका होती. भारताच्या स्वातंत्र्यासाठी त्यांनी विद्यार्थी चळवळीपासून भाग घेणे सुरू केले होते. पुण्यावरून बांका (बिहार) मध्ये लोकसभा निवडणूक लढवून जिंकणे आणि संसदेत पोहोचणे मोठी गोष्ट आहे, ती त्यांनी करून दाखविली. समाजवादी चळवळीचे महानायक, राष्ट्रवादी विचारांचे पाईक, संवेदनशीलतेचे धनी, संघर्षमय जीवन कार्य असणारे, परराष्ट्र धोरणाचे जाणकार मधू लिमयेजीचे नेतृत्व राजकीय शुद्धता आणि वैचारिक प्रगल्भता यांचा समन्वय होता. त्याचे सार्वजनिक जीवन स्वच्छ, शुद्ध आणि पारदर्शक असेच होते. स्वातंत्र्योत्तर काळातही भारतीय सर्वसामान्य लोकांच्या न्याय हक्कांसाठी सतत लढत राहिलेले आपणास दिसून येतात.

लिमयेजी अखिल भारतीय समाजवादी पक्ष आणि एशियन सोशालिस्ट कॉन्फरन्सचे ते सरचिटणीस होते पुढे समाजवादी पक्षाचे अध्यक्ष, संयुक्त समाजवादी पक्षाच्या संसदीय गटाचे नेते, जनता पक्ष आणि लोक दलाचे सरचिटणीस म्हणूनही त्यांनी काम पाहिले. समाजकारण, अर्थकारण, इतिहास, संविधान, आंतरराष्ट्रीय राजकारण अशा राष्ट्रउपयोगी विषयी असणा-या समाजावर उत्तरे शोधण्याचे लेखन कार्य त्यांनी केले.

**ग्रंथसंपदा**: मधु लिमये यांची मराठी, हिंदी आणि इंग्रजी आदी भाषांमध्ये १२८ पेक्षा अधिक ग्रंथ प्रकाशित झाली आहेत. त्यापैकी

मराठी भाषेमध्ये - त्रिमंत्री योजना, कम्युनिष्ट जाहीरनाम्याची शंभर वर्षे, पक्षांतर बंदी नव्हे अनियंत्रित नेतेशाहीची नांदी, समाजवाद काल, आज आणि उद्या, चैखंबा राज्य, राष्ट्रपिता, पेच राजकारणातले आदी.

हिंदी भाषेमध्ये आत्मकथा, सरदार पटेल सुव्यवस्थित राज्य के प्रणेता, संक्रमण कालीन राजनीति, बाबासाहेब आंबेडकर - एक चिंतन, धर्म और राजनीति स्वातंत्रता आंदोलन की विचारधारा, भारतीय राजनीतिक संकट सार्वजनिक जीवन मे नैतिकता लोप, आपातकाल - संवैधानिक अधिनायकवाद का प्रशस्त पथ, कम्युनिस्ट पार्टी कथनी और करनी आदी.

इंग्रजी भाषेमध्ये Where is the left going Tito's Revolt against Stalin, Political Horizons India and the world Madhu Limaye on famous personalities, Goa liberation movement and Madhu Limaye, Gandhi - Ambedkar and other essays, limit to authority etc.

तसेच त्यांनी इतिहास, तत्वज्ञान, अर्थशास्त्र इत्यादी विषयांच्या संदर्भात सुद्धा सखोल वाचन केले. ते आपल्या राजकीय-समाजवादी विचारांमध्ये प्रामुख्याने स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधूता, लोकशाही, सत्तेचे विकेंद्रीकरण वैश्विक शांतता आणि सहजीवनाची आपल्या ग्रंथसंपदामध्ये विस्ताराने मांडणी करतांना दिसून येतात.

**समाजवादी नेतृत्व**: मधू लिमयेजी भारतीय राजकारणामध्ये डॉ. राम मनोहर लोहिया यांचे अनुयायी आणि भारतीय समाजवादी नेता म्हणून त्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वामुळे ओळख निर्माण केली. समाजवादी चळवळीला योग्य पायाभूत विचार देण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. किंबहुना लिमयेजी भारतीय लोकशाही समाजवादी चळवळीचे मुख्य करिष्माई नेतृत्व होते असेच म्हणावे लागेल.

राजकारण हे समाज परिवर्तनाचे साधन आहे. यावर त्यांचे ठाम मत होते. महात्मा गांधीजीच्या आणि समाजवादी विचाराच्या प्रभावामुळे त्यांनी आपल्या गरजा अतिशय मर्यादित ठेवून आयुष्यभर कमालीचा साधेपणा जपला. स्कूटरवर पाठीमागे बसून लोकसभेत जाण्या-या दुर्लभ व्यक्तिमधे त्यांचे नाव घेतले जाते. स्वातंत्र्य आंदोलनात सक्रीय भाग घेतलेल्या लिमयेजींनी स्वातंत्र्योत्तर काळातही आपल्या प्रामाणिक निष्ठेने विविध आघाडयावरील संघर्षात स्वतःला झोकून दिले. शेतकरी-कष्टक-यांची आंदोलने, अंग्रेजी हटाव चळवळ, राष्ट्रभाषा हिंदी व्हावी म्हणून संघर्ष, गोवामुक्ती लढा इत्यादी अनेक आंदोलनात मधूजींचा सहभाग हा लक्षणियच होता. सामाजिक प्रश्न हे समोपचाराने सोडविणे कारण सामाजिक बदलासाठी विचारमंथन गरजेचे आहे, असे त्याचे मत होते. जुनाट, अंधश्रद्धा वाद विचारांना दूर करून परिस्थितीनुसार आधुनिक विचार सर्वांगीण विकासाचे साधन असल्याचे त्याच्या विचारातून दिसून येते.

स्वातंत्र्यलढ्यात सहभाग घेण्याचा लिमयेजीना वयाच्या सोळाव्या वर्षी पहिला तुरुंगवास झाला तेव्हा साने गुरुजींच्या लोकशाही समाजवादाचा सुद्धा प्रभाव त्यांच्यावर पडला. त्यांनी पुढे राष्ट्रवाद, समाजवाद लोकशाही आणि धर्मनिरपेक्षता ही चार मूल्ये त्यांनी स्वातंत्र्यलढ्यासाठी प्रमुख मानली आणि आयुष्यभर आपल्या विचार कार्यातून आणि चिंतनातून जपली सुद्धा. १९४२ च्या 'चले जाव' चळवळीत भूमिगत नेतृत्व केले. त्यांच्या कुशाग्र बुद्धिमत्तेमुळे ब्रुसेल्स आणि रंगूनला भारतीय समाजवादाचे प्रतिनिधी म्हणून त्यांची निवड करण्यात आली. गोविंद तळवळकरांनी त्यांचे वर्णन खाजगी देशभक्त म्हणून केले आहे. त्यांचा व्यासंग संसदेचे वाचनालय आणि नेहरू मेमोरियल ग्रंथालय या दोन ठिकाणी असलेल्या ग्रंथालयात त्यांच्या अखेरच्या श्वासापर्यंत सुरू राहीला. लिमये यांची बुद्धिमत्ता, उत्कृष्ट कर्तव्यनिष्ठता, ध्येयवाद आणि त्यामुळे ते लवकरच डॉ. राम मनोहर लोहिया आणि जयप्रकाश नारायण यांचे विश्वासू सहकारी म्हणून समोर आले.

**मजूर व भांडवलदार वर्ग यांच्यातील समन्वय**: मजूर व भांडवलदार वर्ग यांच्यामध्ये सार्वजनिक वृत्तीचा अभाव दिसला असल्यानेच सार्वजनिक उद्योगांना दिवसेंदिवस अपयश येत असून खाजगीकरण वाढत आहे. रोजगार वाढीसाठी कुटीर, लघु, मध्यम उद्योगांना प्राधान्य देण्याचा धोरणाची अंमलबजावणी

करणे. विकेंद्रीकरणाच्या दृष्टीने करणे सुद्धा महत्त्वाचे आहे. कोणत्याही योजनाचा विचार हा गुणवत्तेनुसार झाला पाहिजे. भ्रष्टाचार आर्थिक विकासात मोठा अडथळा असून शेती विकास आणि व्यवसाय त्यामुळे लयाला जात असल्याचे ते म्हणतात. मजूर व भांडवलदार वर्गामध्ये एकमेकांप्रती सहकार्याची कृतिशील भावना निर्माण झाल्याशिवाय भारताचा आर्थिक विकास शक्य नाही यावर त्यांचा ठाम विश्वास होता. कारण साम्यवाद आणि भांडवलशाही या दोन्ही व्यवस्था ताठर असल्यातरी त्यांचे परस्परांशी जवळचे नाते आहे.

लोकशाहीमध्ये राजकीय पक्षाचे लोकशाहीकरण झाल्याशिवाय त्यांना अर्थ प्राप्त होणार नाही. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात समाजवादी नेत्यांची आणि कार्यकर्त्यांची जो त्याग, शौर्य आणि बलिदान दिल्याने देशाच्या कानाकोप-यातून अनेक तरुण मंडळी समाजवादी पक्षामध्ये सामील झाली. त्यांच्यासाठी सभा संमेलने सेमीनार घेऊन त्यांना पाठबळ देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य मधुजींनी मोठ्या प्रभावीपणे केले.

**अद्वितीय संसदपटू**: मधू लिमयेजी राष्ट्रीय स्तरावरचे कर्तृत्ववान, दृढ निश्चयी, प्रखळ स्पष्टवादी असे नेतृत्व होते. ते आपल्या विचार प्रणाली आणि कार्यनिष्ठेमुळे मुळ पुण्याचे असणारे बिहारमधून लोकसभेवर चारदा निवडून आले हे विशेष. जनसामान्याचे प्रश्न संसदेत निर्भीडपणे मांडुन वेगवेगळया मतदार संघातून लोकसभा निवडणूक जिंकले. लोहिया, कृपलानी, मिनू मसानी, रेणू चक्रपाणी, अटल बिहारी वाजपेयी आदींसारख्या नावाजलेल्या सदस्यांच्या उपस्थित संसदेच्या कामकाजावर प्रभाव पाडला. भारतीय लोकशाही शासन व्यवस्थेचे आणि संसदेच्या कामकाजाचे नियम याचे अध्ययन प्रचंड असल्यामुळे आपल्या वाक्पटूच्या जोरावर त्यांनी सरदार हुकुमसिंह सारख्या करारी आणि अधिनायकवादी सभापतीशी कडवी झुंज दिली.

लिमयेजी संदर्भ ग्रंथाचा आणि पुराव्यांना पिटारा घेऊन संसदेमध्ये प्रवेश करत असत. त्यांना पाहिल्यावरच लक्षात यायचे की आज दोन हात होणार आहेत. त्यांचा अभ्यास सखोल असल्याने अटल बिहारी वाजपेयी म्हणत असत. १९७० चा अर्थसंकल्प इंदिरा गांधी प्रधानमंत्री असतांना अधिवेशनात वित्त विधेयक मांडले न गेल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. वित्त विधेयक मंजूर केल्याशिवाय सरकारला एक पैसाही खर्च करता येणार नाही असे लक्षात आणून दिल्यावर रातोरात अधिवेशन भरवून वित्त विधेयक मंजूर करण्यात आले. इंदिरा गांधींनी आणीबाणीमुळे लोकसभेची मुदत एक वर्ष वाढविल्यामुळे लिमयेजींनी त्याच वेळेस तुरुंगातून लोकसभा सदस्याचा राजीनामा देऊन सरकारचा निषेध केला. त्यावेळी त्यांची लाखो लोकशाही पुरस्कर्त्यांनी स्तुती केली. पक्षांतर बंदीला त्यांनी कडाडून विरोध केला. ते धर्मनिरपेक्षता आणि सहिष्णूतेचे पुरस्कर्ते होते. सर्वधर्म समभावना त्यांना अपेक्षित होती.

आपल्या देशातील आर्थिकदृष्ट्या मागास वंचित समाजाला हित संरक्षणासाठी सुसंघटीत शासन संस्था असणे नितांत आवश्यक असल्याचे ते मानतात. त्या संदर्भातील सुधारणा कायदे संसदेत घडून आणण्यासाठी सतत प्रयत्न सुद्धा करत राहिले. संसद सदस्यांना मिळणा-या भत्ते आणि पेन्शनच्या ते विरोधी होते. चार वेळा संसद सदस्य असून सुद्धा त्यांनी एकच पेंशन घेतली हे विशेष. त्यांना जवळून समजून घेणारे रघु ठाकूर यांच्या मते मधु लिमयेजी आजीवन योद्धा राहिले. ते संस्कृत भाषा आणि भारतीय बोली भाषेचे सुद्धा जाणकार होते. नृत्यकला आणि संगीत यातील बारकावे त्यांना चांगल्याने समजत असत. तसेच महाभारतावर त्यांची पकड होती. त्यांनी १९७९ मध्ये जनता पार्टी मधील दोन सदस्याचा मुद्दा असल्याने जनता पार्टीमध्ये फुट पडून मोरारजी देसाई यांची सरकार पडली होती. सरकार पाडणे ही लिमयेजी याचा उद्देश नव्हता. ते तर स्पष्ट वैचारिक राजकारणाचे पक्षकार होते. राजकारणात धर्माचा वापर होऊ नये यावर मात्र त्याचे ठाम मत होते.

लोकसभेत असतांना त्यांनी भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे उघडकीस आणली. त्यापैकी एक म्हणजे तत्कालिन अर्थमंत्र्यांना राजीनामा सुद्धा द्यावा लागला. त्यांना कायद्याचे सुक्ष्म ज्ञान असल्यामुळे काँग्रेसचे बहुमत असून सुद्धा लिमयेजीची काँग्रेस सरकारला भीती वाटत असे. ते संसदीय नियमांचे पालन करणारे नेते होते. लिमयेजी राष्ट्रीय राजकारणातील एक नेतृत्व म्हणून नाही तर तत्वनिष्ठ प्रामाणिक राजकारणी म्हणून देशभर नावारुपास आले.

**गोवामुक्ती संग्राम चे शिपाई**: गोवा राज्याला पोर्तुगीजाच्या तावडीतून सोडविण्याचे आंदोलन केले गेले. त्यास गोवा मुक्तिसंग्राम असे संबोधले जाते. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होऊन तुरुंगवास भोगलेल्या मधू लिमयेजी स्वातंत्र्यानंतर ही गोवा मुक्ती संग्राम आणि शेतकरी-कष्टकरी कामगारांच्या आंदोलनात सुद्धा कारावासात गेलेले आहेत. आणीबाणीच्या वेळी ते स्थानबद्ध सुद्धा होते. पोर्तुगीजाच्या तावडीतून गोव्याला स्वातंत्र्य भारतात समाविष्ट करण्यामध्ये लिमयेजीचा सिंहाचा वाटा आहे. १९३९ मध्ये दुसरे महायुद्ध सुरू झाले. तेव्हा साम्राज्यवाद व वसाहतवादातून गुलाम देशाची सुटका करण्यासाठी हा सुवर्णकाळ असल्याचे त्यांनी ओळखले होते. महात्मा गांधीजींच्या भारत छोडो आंदोलनामध्ये त्यांनी भूमिगत राहून सुद्धा कार्य केले.

विजापूरच्या आदिलशहाकडून १५१० मध्ये पोर्तुगीजांनी गोवा जिंकून जवळपास १० वर्षे राज्य केले. गोवा, दीव, दमन, दादर व नगर हवेली एवढा भाग भारत ब्रिटिश अंमलाखाली असतानांही पोर्तुगीजांच्या ताब्यात राहिला. दुस-या महायुद्धानंतर जगामध्ये निर्वसाहती करण्याचे वातावरण असून सुद्धा पोर्तुगीज गोव्याला स्वातंत्र्य देण्यासाठी तयार नव्हते. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर सुद्धा गोवा गुलामीत असणे हे भारतीय जनमानसाला पटल्यासारखे नव्हते. यालाच अनुसरून डॉ. राम मनोहर लोहिया यांनी १९४६ पासून गोवा मुक्तीसाठी चळवळी उभ्या करणे सुरू केले. त्यामध्ये मधु लिमये यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. त्या काळात वाढत्या आडमुठेपणा आणि साम्राज्यवादी भूमिकेच्या विरोधात जनजागृती करण्याचे काम लिमयेजींनी केले. भारतातील वसाहतवाद व साम्राज्यवाद समाप्त करण्यासाठी सत्याग्रह सुरू केला.

पोर्तुगीजाच्या गोव्यामध्ये जबरदस्तीने ख्रिस्ती धर्म परिवर्तन करणे हिंदू विरोधी अत्याचार दस्तऐवजीकरण केले हिंदू हत्याकांड, हिंदू मंदिराच्या विध्वंस, हिंदू मुद्रा आणि हिंदू मूर्ती विटंबना करणे यासारख्या अन्याय अत्याचारी

पोर्तुगीजांच्या भूमिकेमुळे भारतीयांनी सशस्त्र आणि सविनय अशा दोन्ही मार्गांनी कार्यकर्ते आणि जनतेनी गोवा स्वातंत्र्यासाठी प्रयत्न केले. भारतीय सैन्याने ऑपरेशन विजय राबवून गोवा मुक्त केला. भारताने गोवा आणि दमण स्वतंत्र केले. मधू लिमयेजी सारख्या कार्यकर्त्यांच्या प्रयत्नाने गोवा राज्याला पोर्तुगीजापासून १९ डिसेंबर १९६१ ला पोर्तुगीजापासून मुक्ती मिळाली. म्हणून एकोणवीस डिसेंबर हा दिवस गोवा मुक्ती दिवस म्हणून पाळला जाते.

**निष्कर्ष**: भारतीय समाज घडविणा-या कार्यकर्त्यांना आणि राजकारणाच्या अभ्यासकांना महत्त्वाची असणारी बौद्धिक शिदोरी अखंड देण्याचे सामर्थ्य लिमयेजी यांच्याकडे होते. आज आपल्याला आपल्या संसदीय लोकशाही व्यवस्थेत राजकीय नेतेमंडळी ब-याचदा खालच्या स्तरावरचे व अविवेकी राजकारण करतांना दिसून येतात. उदा. लोकसभेमध्ये गदारोळ, सभापतींच्या अंगावर शाही फेकणे इत्यादी. तेव्हा मात्र मन सुन्न होऊन मधु लिमयेजीं सारख्या महान राजकीय नेतृत्वाची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. ते व्यासंगी विचारवंत असल्याने तसेच दीर्घकाळ राजकीय नेतृत्व केल्यामुळे त्यांच्या विचार कार्याला तात्विक अधिष्ठान लाभले होते. त्यांनी प्रत्यक्ष निस्वार्थ भावनेने आणि प्राथमिक निष्ठा ठेवून भारतमातेची सेवा केली. त्याच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त शत-शत नमन. मधू लिमयेजींच्या कार्यकर्त्याला देश नेहमीच आठवणीत ठेवेल, यात मुळीच शंका नाही.

***संदर्भ ग्रंथ सूची:***

१. *आगलावे प्रदिप, संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर, २०००.*
२. *भोळे भास्कर लक्ष्मण, आधुनिक भारतातील राजकीय विचार, पिंपळापुरे कं. पब्लिशर्स, नागपूर, २००३.*
३. *लिमये मधु, भारतीय राजनीति के अंतर्विरोध, सारांश प्रकाशन, नई दिल्ली, २००३.*
४. *लिमये मधु, धर्म आणि राजनीतिः राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, समाजवादी साहित्य संस्थान, दिल्ली, १९९९.*
५. *लिमये मधु, संक्रमणकालीन राजनीति, मुख्तार अनिस, राम मनोहर लोहिया, स्मारक समिति, लखनऊ, १९८६.*
६. *फडके य. दि., अनुवाद चंपा लिमये, न्यायालय में मधु लिमये, मधु लिमये स्मृती न्यास, नई दिल्ली, २००२.*
७. *https://en.wikipedia.org/wiki/Madhu_Limaye*

# बालकामगार एक सामाजिक समस्या

*डॉ. ठोंबरे मधुकर दत्तात्रय, समाजशास्त्र विभाग प्रमुख, स्व. नितीन महाविद्यालय, पाथरी.*

***सारांश:*** *संपूर्ण जगभरामध्ये गरिबी, दारिद्र्य, बेरोजगारी, निरक्षरता, व्यसनाधिनता, आतंकवाद, दहशतवाद अशा असंख्य समस्या आहेत. याही शिवाय बालकामगार ही समस्या संपूर्ण मानवी समाजाला कलंक ठरली आहे. ही समस्या वाढीस लागण्यासाठी अनेक कारणे जबाबदार आहेत. त्यामुळे विकसीत आणि विकसनशिल देशामध्ये बालकामगारांचे भयंकर शोषण होत आहे ही एक चिंतेची बाब आहे. भारतीय समाजात बालकामगारांचे होणारे शोषण भारतीय संस्कृतीला शोभा देत नाही. आपली संस्कृती, आपली मुल्ये जपली पाहिजेत त्यामुळे येणारी पिढी बलशाली राष्ट्र बनण्यांची क्षमता ठेवतील.*

*मुख्य शब्द: बालकामगार, शोषण, दारिद्र्य, बेरोजगारी.*

**प्रस्तावना:** आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या सर्वेक्षण अहवालनुसार भारतीय कुंटूबातील एकूण उत्पन्नाच्या २३ टक्के उत्पन्न बालकामगारांकडून मिळते. यावरुन भारतीय समाजात बालकामगार आधिक आहेत हे स्पष्ट होते. बालकामगारांचे मोठ्या प्रमाणात शोषण होते. त्यामुळेच बालकामगार समस्या एक गंभीर समस्या म्हणून ओळखली जाते. ही समस्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. अधिका अधिक देशामध्ये ८ ते १४ वर्षाच्या आतील २० टक्के बालकामगार दिसून येतात. यावरुन वेगवेगळया उद्योग व्यवसायामध्ये गरिब परिस्थीतीमुळे, दिवसेंदिवस वाढत्या लोकसंख्येमुळे, वाढत्या खर्चामुळे लहान मुलांना काम करावे लागते. त्यामुळे भारतात बालकामगार समस्येची तिव्रता दिवसेंदिवस वाढत आहे. भारतीय समाजात, गरिबी, दारिद्र्य, बेकारी, निरक्षरता, व्यसनाधिनता, आतंकवाद, दहशतवाद इत्यादी गंभीर स्वरुपांच्या समस्या आहेत. या सर्व समस्यापेक्षा अतिशय उग्ररुप धारण करणारी, सर्व मानव जातीला कलंक ठरणारी जर कोणती समस्या असेल तर ती आहे बालकामगार समस्या आहे.

*हे जिणे असे मजूराचे बैलावाणी राबावे*
*लागता भुक पोटात मातीचे घास मिळावे*
*कंठाला कोरडा पडता अश्रूचे पाणी प्यावे.*

या तीन ओळीवरुन बालकामगारांच्या आयुष्याचा मतीतार्थ कळतो. कवी नारायण सुर्वे म्हणतात, 'भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली' हे एक दाहक सत्य आहे. बालकामगारांच्या समस्येचे आज केवळ राष्ट्रीय नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवर एक ज्वलंत सर्वव्यापी समस्या बनली आहे. जगातील विविध देशात सुमारे ५ ते १२ वयोगटातील १२० दशलक्ष बालके पूर्णवेळ तर १३० दशलक्ष बालके अर्धवेळ रोजगार करतात. यातील निम्मे बालकामगार दक्षिण आशियातील आहेत. 'घटनेच्या २४ व्या कलमानुसार १४ वर्ष वयाच्या सतत मोठ्या व्यक्तीचे कार्य करणारे, स्वत:च्या शरिराला त्रास करुन घेऊन काम करीत राहणारे आणि स्वत:चे शिक्षणाचे आणि विकासाचे हक्क गमावून बसलेले अशी सर्व मुले-मुली म्हणजे बालकामगार होत. या वाढत्या बालकामगार समस्येला अनेक कारणे जबाबदार आहेत. त्यातील काही प्रमुख कारणांचा आढावा खालील प्रमाणे घेण्यात आला आहे.

**उद्दिष्ट्ये:** १) प्रस्तुत शोध निबंधाचे उद्दिष्ट म्हणजे बालकामगारांच्या समस्येच स्वरुप समजून घेणे. २) बालकामगार समस्येच्या कारणांचा शोध घेणे. ३) बालकामगारांच्या समस्येवर उपाय शोधणे.

**बालकामगार समस्येची कारणे:**

**वाढती लोकसंख्या:** जगात लोकसंख्या वाढीमध्ये भारताचा दुसरा क्रमांक आहे. भारतातील अनेक कुंटूबात सात-आठ मुले आहेत. त्यामुळे त्यांचे आई वडील या मुलांना पोटभर जेवन देऊ शकत नाहीत. अशा परिस्थीतीत ते आपल्या मुलांना शाळेत पाठवण्याची तर कल्पनाच करु शकत नाहीत. त्यामुळे मोल मजूरीसाठी कमी वयामध्ये मुलांना कामावर पाठवले जाते यामुळे बालकामगार समस्या जन्माला येते. ही मुले हॉटेल, कारखाने व दुकानामध्ये काम करुन २०० ते ४०० रुपये कमाई करतात.

**वाढती बेरोजगारी:** आधुनिक भारतीय समाजात दिवसेंदिवस वाढत्या बेरोजगारीमुळे काही पुरुष व्यसनाच्या आहारी जातात, दारु पितात त्यामुळे काही कुंटूबातील लहान मुलींना व्यश्याव्यवसाय करावा लागतो. कारण कुंटूबात अतिशय तंगी चालते अशा परिस्थीतीत व्यसनी व्यक्तीचा मनावरील ताबा सुटतो उदा. दिल्ली मध्ये एका गरिब वस्तीमध्ये राहणाऱ्या दारुड्या पित्याने आपल्या १४ ते १५ वर्षाच्या मुलीशी शारीरीक संबंध प्रस्थापीत केले.

**गरिबी:** गरिबीमुळे भारतात बालकामगार समस्या मोठ्या प्रमाणात निर्माण झाली आहे. भारतामध्ये जवळ जवळ ३४ टक्केहून अधिक लोकसंख्या गरिबीमध्ये जीवन जगतांना दिसून येते. ज्यामुळे देशातील लोक गरिब तो देश गरिब बनतो असे प्रोफेसर नर्क्स यांचे मत आहे. त्यांच्या मते गरिबीतून गरिबी जन्माला येते व या गरिबीमुळेच बालकामगार समस्या निर्माण होते.

**निरक्षरता:** भारतामध्ये वाढत्या बालकामगार समस्येला निरक्षरता जबाबदार आहे. अधिकाधिक निरक्षर माता-पिता आपल्या कमी वयाच्या मुलांना मजुरीसाठी पाठवतात कारण त्यांच्या बालमजूरीमुळे कुंटूबाच्या वाढत्या खर्चाला हातभार लागतो. यातूनच विकसीत आणि विकसनसील देशांमध्ये बालकामगार समस्या वाढीस लागली आहे.

**कमी वेतन:** प्रौढ पुरुष व स्त्रियांना एखाद्या कामासाठी जी मजूरी दिली जाते तिच्या तुलनेत बालकामगारांना अतिशय कमी मजूरी दिली जाते त्यामुळे व्यावसायिक अधिकाअधिक बालकामगारांना प्राध्यान्य देतात म्हणूनच वेगवेगळया व्यवसायामध्ये बालकामगार अधिक दिसून येतात. उदा. हॉटेल, चहाचे दुकान, कारखाने, दुकाने इ. ठिकाणी बालकामगार दिसून येतात.

**कर्ज बाजारीपणा:** एखाद्या कुटूंबात अधिक मुले असल्यास त्याच्या उदरनिर्वाहासाठी व विवाहासारख्या प्रसंगी

कर्ज घेतले जाते. सावकारी कर्जाचा व्याज दर अधिक असतो कर्ज घेणारे कुटूंब अशिक्षित असते. त्यामुळे ते कुटूंब व्याजासह कर्जाऊ रक्कम परत करु शकत नाहीत. तेंव्हा सावकार त्यांची संपत्ती घेतो व कुटूंब उघड्यावर पडते त्यामुळे आपल्या लहान मुलांना सुध्दा सावकाराकडे काम करावे लागते.

**कायद्याचे उल्लंघन:** युनिसेफच्या सर्वेक्षण अहवालानुसार 75 टक्के बालकामगार हॉटेल आणि घरकामामध्ये काम करतांना दिसून येतात. त्यामुळे सामाजिक संघटन कायद्याचे पालन होत नाही. अशा हॉटेल आणि घरामध्ये लहान मुलांना अतिशय कमी वेतनामध्ये काम करावे लागते. त्यांच्या मजबुरीचा फायदा घेत हॉटेल मालक व घरमालक या बालकामगारांचे शोषण करतात. त्यांना पशूपेक्षाही हीन वागणूक देतात. तरीही बालकामगार मोठ्या प्रमाणात निर्माण होतांना दिसतात.

**कौटूंबिक अडचणी:** अनेक कुटूंबात उदरनिर्वाह करणे कठीण असते यातच अशा कुटुंबात मुलांची संख्या अधिक असते त्यामुळे ७ ते १४ वयोगटातील मुल वेगवेगळया कामामध्ये दिसून येतात. आई सोबत कामात मदत करण्यासाठी अनेक लहान मुली घराबाहेर पडतात. उदा. घरकाम व धुनी भांडी करणाऱ्या स्त्रियांची मुल कुंटूबाला हातभार लावण्यासाठी कामावर जातात. यावरुन कौटूंबिक अडचणी बालकामगार समस्येला कारणीभूत आहेत.

**शाळाबाह्य मुले:** अनेक लहान मुल कुटूंबाच्या आर्थिक अडचणीमुळे शाळेत जाऊ शकत नाहीत अशी मुले आपल्या कुटुंबाला व खर्चाला हातभार लावण्यासाठी हॉटेल, कारखाने, दुकान व घरकामामध्ये अल्पवेतनात काम करतात त्याच्याकडून कमी वेतनात अधिक काम करुन घेतले जाते. यातूनच अनेक शाळाबाह्य मुले बालकामगार दिसून येतात.

**निराधार मुले:** अनेक कुटूंबात कुटूंब प्रमुखाचा अपघात झाल्यास कोणतीही आर्थिक तरतूद केलेली नसल्यामुळे कुटूंबातील स्त्री आणि मुल निराधार बनतात अशा मुलांना आपल्या उदरनिर्वाहासाठी वेगवेगळया ठिकाणी काम करावे लागते. उदा. विटभट्यावर, कातडी कमावण्याच्या कारखान्यात काम करतात म्हणून वाढत्या बालकामगार समस्येला निराधार मुले अधिक जबाबदार ठरतात.

**विघटीत कुटूंब:** आधूनिक समाजात वाढत्या औद्योगिकरणामुळे शहरीकरण होत आहे व शहरात विघटीत कुटूंबाची संख्या वाढत आहे. अशा विघटीत कुटूंबातील मुल रस्त्यावर भटकतात जगण्यांसाठी काम शोधतात याच संधीचा फायदा दलाल, कारखानदार, दुकानदार, हॉटेल मालक घेतात आणि कमी वेतनात जास्त काम त्यांच्याकडून करुन घेतात. त्यामुळे बालकामगार समस्येला अधिक चालना मिळते.

**स्थलांतरीत कुटूंब:** आधुनिक समाजात अनेक कुंटूबांना आपल्या आर्थिक अडचणीमुळे कामासाठी स्थलांतर करावे लागते उसतोड कामगार हंगामी स्वरुपाची कामे करतात त्यांना विशिष्ट कालावधीसाठी स्थलांतर करावे लागते. तेव्हा त्या कुटूंबातील लहान मुले सोबत घेऊन जातात. अशी मुले शिक्षणापासून वंचीत राहतात अशी मुले मिळेल ते खातात व पडेल ती काम करतात यातूनच बालकामगारांची समस्या वाढीस लागते.

**बाल वेश्याव्यवसाय:** भारतीय समाजातील अशिक्षीत कुटूंबात सात पिढ्या दारिद्रय असल्यामुळे प्रचंड गरिबी दिसून येते अशा कुटूंबातील लहान मुले मुली शोषणाला बळी पडतात. दारिद्र्याने पिडीत वस्तीमध्ये गरिब कुटूंबातील मुलींना विकत घेतात व आई वडील देखील आर्थिक परिस्थीतीला कंटाळून आपल्या कमी वयाच्या मुला मुलींना वेश्या व्यवसायात ढकलतात त्यामुळे बालकामगारांची समस्या वाढीस लागते.

**उपाय योजना:** प्रस्तूत शोध निबंधात असे निदर्शनास आले आहे की, सर्वत्र बालकामगारांचे मुळ दारिद्र्यात आहे. त्यामुळे उत्पन्न वितरण व सामाजिक सुधारणा केल्यास बालकामगार समस्येचे परिणामकारकरीत्या उच्चाटन करणे शक्य होईल. तसेच निरक्षरतेचे उच्चाटन करणे आवश्यक आहे मुलांना शिकण्याची इच्छा असूनही शाळा व शैक्षणिक सोयीच्या अभावाने ते शिक्षण घेऊ शकत नाहीत.

प्राचीन काळापासून ते आजपर्यंत गरिबी हेच बालकामगार समस्येचे मुलभूत कारण आहे. गरिबी दूर करायची असेल तर प्रशिक्षण, विकास व रोजगार निर्मितीच्या धोरणांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. सक्तीचे व मोफत शिक्षण आणि प्रशिक्षण योजनांची अंमलबजावणी केल्यास बालकामगारांची संख्या कमी होईल. समाजातील खालच्या स्तरातील व्यक्तींना अधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन भूमी सुधारणा, किमान मजूर कायद्याची व्यक्तींना अधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन भूमी सुधारणा, किमान मजूरी कायद्याची अंमलबजावणी करुन सामाजिक सुरक्षिततेच्या विविध योजना राबवून कामातील विषमता कमी करता येईल.

***संदर्भ सूची:***


१. *शेख आर. के., २०१४, बालकामगार समस्या व समाधान, प्रशांत पब्लिकेशनस जळगाव.*

२. *लोटे रा. ज., १९९९, भारतातील सामाजिक समस्या, पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.*

३. *बोधनकर सूधीर / अलोणी विवेक, मृणाल कुलकर्णी, २०११, सामाजिक संशोधन पध्दती, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.*

४. *पाटील व्ही. बी., २०१३, मानवी हक्क, के. सागर पब्लिकेशन्स, पुणे.*

*Volume – 11, Issue – 02, July - December, 2022/ ISSN 2278-3199/* ***Impact Factor – 7.303***

# भंडारा जिल्ह्यातील आदिवासींच्या जीवनावर आधुनिकीकरणाचा प्रभाव

*प्रा. करुणा वैजनाथ गायकवाड, समाजशास्त्र विभाग प्रमुख, एस. बी. के. आर्टस् कॉलेज, साकोली. मो. ८००७८८८७३९*

**प्रस्तावना:** भारतीय समाजव्यवस्था आदिवासी, ग्रामीण, नागरी समाज अशा तीन समूहात विभागला आहे. या तीन समाजापैकी नागरी समाजावर अत्याधिक प्रमाणात संशोधन झालेले आहे. त्या खालोखाल ग्रामीण समाजाचा क्रमांक लागतो. आदिवासी समाजाबाबत अजूनही पाहिजे त्याप्रमाणात संशोधनात्मक कार्य झालेले नाही. आधुनिक काळात आदिवासी इतिहासाची सुरुवात इंग्रजांच्या आगमनानंतर झाली. आजच्या बदलत्या परिस्थितीचा आदिवासी जीवनावर होणारा परिणाम लक्षात घेता त्यांच्यावर स्वतंत्र अध्ययन होणे गरजेचे आहे. आदिवासी शेकडो जमातीत विभागला असून आपली वैशिष्टपूर्ण संस्कृतीचे जतन करीत आहे. अशा दुर्गम, डोंगराळ आणि घनदाट अरण्यात पिढ्यानपिढ्या राहणाऱ्या या समूहाला आदिवासी असे म्हणतात. डोंगरद-यात राहत असलेल्या आदिवासींच्या भाषा, पोषाख, चालीरीती, सणसमारंभ, धार्मिक बाबतीत बरीच तफावत आहे. आदिवासीना कोणी जंगलाचे राजे, धरतीचे लेकरे असे म्हटले आहे. डॉ. धुर्ये आदिवासींना 'मागासलेले हिंदू' असे संबोधिले आहे. भारतीय राज्यघटनेत आदिवासीचा 'अनुसूचित जमाती' असा उल्लेख आहे. गिलीन व गिलीन यांच्या मते, 'एका विशिष्ट भूप्रदेशावर राहणारा, समान बोलीभाषा बोलणारा व समान सांस्कृतिक जीवन जगणारा पण अक्षर ओळख नसलेल्या स्थानीय गटाच्या समुच्चयाला आदिवासी समाज असे म्हणतात.

आज आधुनिकीकरणाचा आदिवासी जीवनावर अनुकूल-प्रतिकूल परिणाम होत आहे. परंतु आधुनिकीकरणाची प्रक्रिया सर्वत्र सारखी नाही. घनदाट अरण्यात राहणा-या आदिवासीमध्ये आधुनिकीकरणाचा मागमूसही आढळत नाही. ग्रामीण समाजाच्या संपर्कात आलेल्या आदिवासी समुदायात आधुनिकीकरणाची प्रक्रिया मंद गतीने कार्यान्वित आहे. परंतु नागरी समुदायाशी संबंधित आलेल्या आदिवासीमध्ये हि प्रक्रिया स्पष्टपणे नजरेस भरते. औद्योगिकरण, नागरीकरण, आधुनिक शिक्षण पद्धती, शिक्षणाचा प्रसार, जनसंवाद साधने, इत्यादींमुळे आधुनिकीकरणाला चालना मिळाली आहे. तसेच या क्षेत्रात प्रारंभ झालेल्या सहकारी चळवळीचा वाटा सुद्धा उल्लेखनिय आहे. आधुनिक बाजार पध्दती, व्यापारी क्रियाकलाप आणि या क्षेत्रात अवजड उद्योगधंद्याची स्थापना आधुनिकीकरणास गतिमान करणारी आहे. आदिवासी समाजात जागृती निर्माण करणे, शिक्षणाचा प्रसार, व्यवसायात विविधता आणणे, उत्पादनात वाढ करणे, सामाजिक गतिशीलतेस संधी देणे, नवीन तंत्राचा स्वीकार करणे, वैज्ञानिक दृष्टी रुजवणे इत्यादी अनुकूल बाबींचा समावेश होतो. त्यासोबतच प्रतिकूल परिणाम डोळयाआड करून चालणार नाही. आदिवासी भागातील खाणी, पोलाद कारखाने, धरणे बांधणे इत्यादी विकास योजनांमुळे शतकानुशतके वास्तव्य करणाऱ्या आदिवासींना विस्थापित व्हावे लागत आहे.

**अध्ययन क्षेत्र:** महाराष्ट्राच्या गोंडवाना प्रदेशात विदर्भातील भंडारा जिल्ह्याचा समावेश आहे. भंडारा जिल्ह्याचे संपूर्ण क्षेत्रफळ ३,७१७ चौ.कि.मी. आहे. जे महाराष्ट्र राज्याच्या क्षेत्रफळाच्या १.२१ एवढे आहे. या जिल्ह्याची उंची समुद्रसपाटी पासून २३४.२९ मीटर आहे. २०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची एकुण लोकसंख्या ११,००,३३४ असून आदिवासींचे प्रमाण ७.४१ टक्के आहे. म्हणजे एकूण लोकसंख्येपैकी ८८,८८६ आदिवासी आहेत.

आदिवासी लोकसंख्येची तहसीलनिय स्थिती:

जनगणना - २०११

| अ .क्र . | तहसीलचे नावे | एकूण लोकसंख्या | लोकसंख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | साकोली | १३६८७९ | १४६१८ | १०.६७ |
| २ | लाखनी | १२८५४५ | ८२३६ | ६.४१ |
| ३ | लाखांदूर | १२३५७३ | ६१७२ | ४.९९ |
| ४ | पवनी | १५४५८८ | १०१६७ | ६.५८ |
| ५ | मोहाडी | १५०६११ | ८९२६ | ५.९३ |
| ६ | तुमसर | २२६१०८ | २५०८७ | ११.१० |
| ७ | भंडारा | २८००३० | १५६७७ | ५.६० |
| एकूण भंडारा जिल्हा | | १२००३३४ | ८८८८६ | ७.४१ |

**उद्दिष्ट्ये:** १. भंडारा जिल्ह्यातील आदिवासीचे सामाजिक-सांस्कृतिक जीवनाचे अध्ययन करणे. २. आदिवासींच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे. ३. आदिवासींच्या मागासलेपणाच्या कारणांचा शोध घेणे. ४. आदिवासींच्या शैक्षणिक स्थितीचे अध्ययन करणे. ५. शासनाच्या विविध योजनांचा आदिवासींना लाभ झाला ते तपासणे. ६. आदिवासींच्या आरोग्यविषयक स्थितीची माहिती मिळविणे.

**संशोधन पद्धती आणि तथ्य संकलन:** प्रस्तुत अध्ययन प्राथमिक आणि दुय्यम साधनांचा आधार घेण्यात आला आहे. सर्व तथ्यांचे शास्त्रीय पद्धतीने परीक्षण करण्यात आले. भंडारा जिल्ह्यातील जिल्हा अधिकारी कार्यालय, तहसील कार्यालय, प्रकल्प अधिकारी, स्थानिक कार्यालय इत्यादींना भेट देवून आवश्यक ती माहिती मिळविण्यात आली आहे. याशिवाय ग्रंथालयातील साहित्य, मासिके, वर्तमानपत्रे, इंटरनेट यांचा वापर करण्यात आला आहे. तथ्य संकलनासाठी निरीक्षण, मुलाखत पद्धतीचा वापर करून सांख्यिकीय पद्धतीच्या वापराने आकडेवारी प्रदर्शित केली आहे.

**आदिवासी आणि आधुनिकीकरणाचा प्रभाव:**

आदिवासींच्या आधुनिकीकरणाची प्रक्रिया सर्वत्र सारखी नाही. ग्रामीण आणि नागरी समाजाच्या संपर्कात आलेल्या आदिवासी समाजात हि प्रक्रिया स्पष्टपणे नजरेस येते. आदीवासींवर आधुनिकीकरनाचा नेमका कोणता प्रभाव पडत आहे हे पुढील घटकांद्वारे स्पष्ट होते.

१. **सामाजिक – सांस्कृतिक जीवन:** आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेचा प्रभाव आदिवासींच्या सामाजिक-सांस्कृतिक जीवनावर पडत आहे. म्हणजेच आदिवासींच्या सामाजिक-सांस्कृतिक मूल्ये, रूढी, प्रथा, परंपरा, विश्वास, श्रद्धा इत्यादी मध्ये बदल झालेले दिसून येते. घनदाट प्रदेशात राहणारा, अक्षर ओळख नसलेला पण वैशिष्ट्यपूर्ण संस्कृतीचे जतन करणारा समाज म्हणजेच आदिवासी जमात होय. अशा वैशिष्ट्यपूर्ण

संस्कृतीचे जतन करणाऱ्या आदिवासी समाजाच्या धार्मिक परंपरा, सणसमारंभ, चालीरीती, अंगावरील गोंदण, कौवड्या-मणी अंगावर परिधान केलेले दागदागिने इत्यादी वैशिष्ट्यपूर्ण सामाजिक–सांस्कृतिक जीवनात परिवर्तन झाले आहे.

२. **शासनाच्या शेतीविषयक योजना:**

**अ. पीक उत्पादन प्रोत्साहन योजना:** आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या आदिवासी सभासदांना आर्थिक अडचणीतून सुटका करण्याच्या दृष्टीने आदिवासी विविध कार्यकारी संस्थांना सवलतीच्या दराने पीक कर्ज वितरित करणे आवश्यक आहे, असे शासनाने ठरविले आहे. आदिवासी सभासद सिंचनाद्वारे पिके घेतात.

**ब. आदिवासी शेतकरी कुटुंबांना दारिद्रय रेषेच्या वर आणण्यासाठी अर्थसहाय्य -** राज्यातील सुमारे ८८ टक्के आदिवासी लोकसंख्या दारिद्रय रेषेखालील आहे. वास्तव या योजनेद्वारे ज्या आदिवासी शेतकऱ्याचे वार्षिक उत्पन्न रु. २५,००० आहे. त्यांना अर्थसहाय्य देण्यात येते. आदिवासीच्या शेतीच्या उत्पादकतेत वाढ होण्यासाठी सहाय्यभूत ठरणाऱ्या विभिन्न बाबीसाठी या योजनेखाली अनुदान देण्यात येते आदिवासी शेत-कऱ्यांना अर्थसहाय्य देण्याची योजना कृषी विभागामार्फत आदिवासी उपयोजनेखाली, आदिवासी उपयोजना बाहेरील व माडा क्षेत्रात प्रामुख्याने १६ जिल्ह्यांपैकी भंडारा जिल्ह्यांतही योजना राबविण्यात येते. या योजनेतर्गत आदिवासी कुटुंबांना पुढीलप्रमाणे अर्थसहाय्य देण्यात येते.- जमीन विकास कामे, रोपसंरक्षक साधने आणि सुधारित शेती अवजारे, जुन्या विहिरींची दुरुस्ती, बैलगाडी पुरवठा, ३०० मीटर पाईप लाईन, नवीन विहिरी, ई.

**क. फलोत्पादन:** फलोत्पादन हा आदिवासींसाठी कृषी क्षेत्राशी संलग्नित असलेल्या आदिवासीना उत्पादनदायी ठरणारा महत्वाचा कार्यक्रम आहे. फलोत्पादनाच्या इतर लाभाबरोबरच त्यातून भरीव रोजगार क्षमतासुद्धा निर्माण केली जाऊ शकते. हि योजना संपूर्णपणे राज्यपुरस्कृत झाली आहे.

३. **औद्योकिक व व्यापारी उपयोगासाठी वृक्ष लागवड:** पूर्वी आदिवासींच्या अशिक्षित व अज्ञानीपणामुळे त्यांचे वन कंत्राटदाराकडून शोषण केले जात होते. म्हणून आदिवासींना शोषणमुक्त करण्यासाठी राज्यशासनाने वेळोवेळी अधिनियम तयार केले आहेत. आदिवासींना दारिद्रयरेषेच्यावर आणण्यासाठी त्यांच्या मिळकत क्षमतेत वाढ करणे हा या योजनेचा उद्देश आहे.

४. **आधुनिक शिक्षणाच्या सोयी:** आदिवासी विद्यार्थांना प्राथमिक व माध्यमिक शिक्षण संपल्यानंतर विद्यार्थांना विद्यापीठीय स्तराच्या शिक्षणाकडे जाण्याच्या प्रवृत्तीपासून परावृत्त करणे व उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थांना रोजगार व स्वयंरोजगार मिळविण्याच्या दृष्टीने उपयुक्त असे शिक्षण देणे हा या व्यावसायिक शिक्षणाचा मूळ हेतू आहे. त्यासाठी शासनाने तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण, व्यायाम शाळा, क्रीडांगण विकास, कौशल्यावर आधारित व्यावसायिक अभ्यासक्रम इत्यादी शिक्षण आदिवासी मुलांना घेता यावे म्हणून विशेष सोयी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

५. **आरोग्यविषयक सोयी सुविधा:** आदिवासी क्षेत्रात आरोग्यविषयक सोयी उपलब्ध व्हाव्या यासाठी आरोग्य उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्रामीण रुग्णालयाच्या स्थापनेसाठी आणि बांधकामासाठी आदिवासी उपयोजनेतून शासनाने नियतव्येय उपलब्ध करून देण्यात येते. आरोग्यविषयक सोयीसाठी शासनाकडून लाखो रुपये खर्च करण्यात येत आहे. आज आदिवासी समाज देखील आरोग्यविषयक समस्या सोडविण्यास दवाखान्यात जावून उपचार घेण्यास तयार असतो. म्हणजेच आदिवासींना आरोग्याविषयी जाणीव झाली आहे.

६. **दळणवळणाच्या सोयीसुविधा:** आदिवासी समाजाचा झपाट्याने विकास व्हावा या दृष्टीकोनातून आदिवासी क्षेत्रात दळणवळण सुविधा अत्यंत महत्वाची व आवश्यक आहे. योग्य रस्त्यांमुळे आदिवासींना आरोग्य केंद्र, बाजार केंद्र, शैक्षणिक सुविधांचा योग्य लाभ घेता येतो. भंडारा जिल्ह्यात गावा-गावात रस्त्यांची सुविधा असल्याने आदिवासींना सर्व सोयीचां लाभ सहज घेता येत आहे. म्हणून त्यांच्यावर आधुनिकीकरणाचा प्रभाव दिसून येतो.

**निष्कर्ष:** आदिवासींच्या जीवनावरील आधुनिकीकरणाचा प्रभाव पाहता असे लक्षात येते की आजच्या औद्योगिकरणामुळे आदिवासींच्या जीवनात स्थानिक गतिशीलता, व्यावसायिक गतिशीलता आलेली आहे. तसेच नागरी व ग्रामीण समाजाच्या संपर्कात आल्यामुळे आदिवासीच्या वेशभूषेत बदल झाला, खानपानाच्या पद्धत बदलल्या, शिक्षणाचे महत्व कळले, त्यांच्या पुढच्या पिढीला शिक्षणाच्या सोयी उपलब्ध झाल्या, घराची रचना बदलली. म्हणजे आदिवासी समाज हळूहळू आधुनिकीकरणाच्या प्रवाहात वाहत गेला. यासाठी मुळातच सभ्य समाजातील घटक कारणीभूत आहे. सभ्य समाजाने आदिवासींच्या वैशिष्ट्यपूर्ण संस्कृतीत ढवळाढवळ केली आहे. त्यांच्यात कोणत्या ना कोणत्या कारणाने जंगलाचे ठेकेदार, जमीनदार, फिरते व्यापारी, सरकारी अधिकारी, जंगल कर्मचारी, पटवारी, ग्रामसेवक, पोलीस यंत्रणा, राजकीय पक्षातील लोक इत्यादी अनेक लोकांचे हस्तक्षेप वाढले. त्यामुळे आदिवासींच्या जीवनातील आधुनिकीकरणाच्या प्रभावाबरोबर त्यांची पारंपरिक जीवन पद्धती कमजोर झाली आहे. म्हणजे त्यांचे सणसमारंभ, देवदेवता, धार्मिक पूजा-अर्चा, लोककला, लोकगीते यासारख्या पारंपरिक संस्कृतीचा ऱ्हास झाला आहे. म्हणजे ते आपल्या पारंपरिक संस्कृतीला मुकलेले आहेत.

***संदर्भ ग्रंथ सूची:***


१. *डॉ. गुरुनाथ नागगोंडे, सामाजिक आंदोलने, कॅन्टिनेंटल प्रकाशन, पुणे.*
२. *आगलावे प्रदीप, समाजशास्त्र, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.*
३. *लोटे रा . ज., आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.*
४. *जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, वर्ष १९९१ ते २०११.*
५. *जिल्हा जनगणना पुस्तिका, वर्ष १९५१ ते २००१.*
६. *कुलकर्णी एस. डी., प्रॉब्लेम्स ऑफ ट्राइबल डेव्हलोपमेंट इन महाराष्ट्र.*

# आंबेडकरवादी विचारदृष्टीचे साहित्य

प्रा. संतोष मोहन जाधव, एन. जे. पटेल कला व वाणिज्य महाविध्यालय, मोहाडी जि. भंडारा मो. ९४०५५८८०१२

**प्रस्तावना**: भारतीय समाज हा प्राचीन काळापासून जात-जमातीय पुरुषप्रधान समाज राहिला आहे. भारतीय समाजाची सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक रचना याच पायावर उभी आहे. प्रत्येक काळानुसार या सामाजिक रचनेत थोडा फार बदल झाला असेल. समाजाचा मूळपिंड मात्र जात-जमातीयच राहिला आहे. प्राचीन काळात निरनिराळया भक्ती संप्रदायाच्या माध्यमातून सामाजिक संरचनेत काही सुधारणा घडवण्याचा प्रयत्न झाले. महानुभाव संप्रदाय, वारकरी संप्रदाय लिंगायत धर्म अशा विविध स्तरांवर हे प्रयत्न झाले या भक्ती संप्रदायाच्या प्रामुख्याने भर आध्यात्मिक क्षेत्रात राहिला तरी सुध्दा त्यांचे अंतिम लक्ष सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात मूलभूत बदल करणे असे होते. संत साहित्याचे मराठी साहित्यात पहिल्यांदा स्त्रियांच्या व बहुजनांचा सांस्कृतिक हस्तक्षेपासाठी संघर्ष उभा केला आणि साहित्याच्या माध्यमातून धर्मक्षेत्रात सुध्दा हस्तक्षेप करण्याची भूमिका घेतली. धर्मचिकित्सा आणि प्रतिनिधीत्वाचे सार्वत्रिकरण हे संत चळवळीचे स्वरूप होते या चळवळीमुळे काही अंशी बदलाला अनुकूल असणारी सामाजिक मानसिकता तयार होण्याची प्रक्रिया सुरू झाली. परंतु मुलभूत सामाजिक क्रांतीची सुरूवात झाली नाही. अर्थातच याला कालखंडाचा एकूण समाजमानस व वैचारिक उत्क्रांती अवस्था कारणीभूत होती.

आधुनिक काळात मात्र सामाजिक, सांस्कृतिक क्रांतीची खरी संकल्पना भारतात उदयास आली. महात्मा फुले यांच्यापासून भारतातील सामाजिक क्रांतीला सुरूवात झाली भारतातील विषमता ही बहुस्तरीय असून तिच्या मुक्तीचा मार्ग सर्वकष प्रबोधन आणि शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणातून जातो असे महत्वाचे प्रतिपादन फुलेंनी कृतिशिलपणे केले. भारतातील विषमता ही केवळ सामाजिक नसून ती आर्थिक, सांस्कृतिक व भौतिक आहे. भारतीय समाजरचनेत मूलभूत क्रांती करायची असेल तर समाजातील उत्पादन पध्दती, उत्पादन संबंध यांच्यात बदल करावे लागतील ते करण्यासाठी जातीय अस्मिता, धार्मिक अहंकार पुरोहितशाही व सावकारशाही यांचे बिमोड करावा लागेल. धर्मचिकित्सेशिवाय ते शक्य नाही म्हणून फुलेंनी पहिल्यांदा आधुनिक काळातील मुलभूत अशी धर्मचिकित्सा केली. शेटजी आणि भटजी यांच्या वर्चस्वला पहिल्यांदा ऐतिहासिक व कडवे आव्हान दिले. एकाच वेळी फुलेंनी धर्मव्यवस्था, शेतीव्यवस्था, कामगारांचे क्षेत्र लिंगभाव विषमता आणि शिक्षणव्यवस्था या सर्वच क्षेत्रात क्रांती घडविण्यासाठी आंदोलक राजकारण उभे केले. स्त्रीदास्यवर्ग आणि जाती यांचे उच्चाटन करूनच भारताच्या विशेष संदर्भात क्रांती घडू शकते असा सिध्दांत मांडला. पुरोहित व सावकारांचे वर्चस्व झुगारून शिक्षणाच्या माध्यमातून जगाची पुर्नमांडणी करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. सर्व जात-धर्मीय स्त्री-पुरूषांना एकत्रित करून नव्या राष्ट्रीय कुटुंबाची कल्पना केली. यातूनच पुढे भारतातील सर्वंकष क्रांतीचा मार्ग सुकर झाला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक क्रांतीची हिच परंपरा पुढे नेण्याकरीता सर्वातोपरी प्रयत्न केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय सामाजिक व वैचारिक क्रांतीचे प्रमोच्च मानबिंदू ठरले. 'महार, मांग, निंदा/ठावी नाही व्यथा/जाळा मनु ग्रंथ/अग्नीमध्ये' महात्मा फुले यांनी आपल्या पुर्वसुरीच्या स्वप्नाला मृत स्वरूप देत सर्वसामान्यांवर अन्यायकारक करणा-या मनुस्मृतीचे दहन केले. महात्मा फुले आणि डॉ. आंबेडकर यांच्या सिध्दांतामध्ये अंशतः भेद मोठया प्रमाणात साम्य आहे. धर्मचिकित्सा, लिंगभाव समानता व सर्व समानसूत्र आहे. भारतातील शोषणाचा कोटीक्रम स्त्रीदास्यवर्ग आणि जातीच्या माध्यमातून स्पष्ट होतो व यांचे उच्चाटन करून भारतीय समाज वैचारिक उन्नत अवस्थेत जाऊ शकतो असे त्यांच्या विचारांचे सार आहे. महात्मा फुलेंनी आपल्या वैचारिक मांडणीला आधार देण्यासाठी सर्जनशील साहित्याची निर्मिती केली. अखंड कविता, नाटक लिहून त्यांनी मुक्तीगामी मराठी साहित्याची मुहूर्तमेढ रोवली. डॉ. आंबेडकरांनी वाङमयीन लेखन फारसे केले नसले तरी मराठी साहित्यातील वैचारिक साहित्याचे दालन समृध्द केले. फुले-आंबेडकर हे ख-या अर्थाने विवेकशील व क्रांतीकारी मराठी वैचारिक साहित्याचे उद्गाते आहेत.

डॉ. आंबेडकरांनी आपल्या कृतीतूनच मराठीतील येऊ घातलेल्या दलित साहित्याला वैचारिक अधिष्ठान प्राप्त करून दिले. डॉ. आंबेडकरांचे विचार ही दलित साहित्याची महत्वाची प्रेरणा ठरली. वेदनास, विद्रोह, नकार आणि विज्ञाननिष्ठा हे दलित साहित्याचे सुत्र ठरले. यातील नकार हे सूत्र अत्यंत महत्वाचे आहे. अमानवीय प्रथा-परंपरा-भेद एवढेच नवे तर धर्मव्यवस्था सुध्दा नकारास पात्र ठरू शकते असे पहिल्यांदा सिध्द केले. "हिंदु हा कोणी मनुष्यप्राणी आहे असे कुणीच ओळखत नाही कारण त्या नावाचा उच्चार केल्याबरोबर कुणी जवळ येणार नाही असल्या मधल्यास्थिती घोटाळत राहण्यापेक्षा आज हे नाव उद्या हे नाव असे नामांतर करीत बसण्यापेक्षा धर्मांतर करून कायमचे नामांतर तुम्ही का करू नये असा माझा तुम्हाला प्रश्न आहे?" असे सांगून इथल्या शोषित समाजाला निर्णायक स्वरूपाची पर्यायाची संस्कृती दिली. मराठी दलित साहित्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा वैचारिक मार्ग शिरोधार्य मानला आहे. तसेच सर्वंकष क्रांतीविषयी सडेतोड प्रतिबंधता सुध्दा जोपासली आहे. त्यामुळे दलित साहित्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारधारेचे व जात, धर्म पुरुषसत्तेविरहीत नवसमाजनिर्मितीच्या व मानवमुक्तीच्या क्रांतीकारक विचारांचे अधिष्ठान लाभले आहे.

"भारत स्वतंत्र झाला तेव्हा 'शतकानंतर आज पहिली रम्य पहाट' असा आनंदउत्सव मराठी कवितेत उसळला. त्यानंतर जेमतेम बारा वर्षांतच 'सारेच दीप कसे मंदावले?' अशी खिन्नतेची भावना याच कवितेत व्यक्त झाली पुढे 'स्वातंत्र्य कुणा गाढवीचे नाव आहे?' असा विद्रोही व वैफल्यग्रस्त प्रश्न याच कवितेने विचारला आणि याच कवितेने इशारा केला की, उषःकाल होता होता काळरात्र झाली! पुन्हा तुम्ही स्वातंत्र्याच्या पेटवा मशाली!'

अशाप्रकारे स्वातंत्र्योत्तर सहा दशकांच्या कालखंडामध्ये कवितेच्या प्रांतात परिवर्तने दृष्यमान होतात. या कवितेच्या

प्रवासाविषयी गुण-दोषात्मक भाष्य करता येईल. समाजाच्या विविध स्तरांतील आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक वृत्ती-प्रवृत्ती कवितेतून अभिव्यक्त होऊ लागल्या. या कालखंडात 'कविता' म्हणून जी साहित्यकृती आपणापुढे आली ती वैविध्यपूर्ण आहे. अभंग-ओवीपासून नव्या मुक्तछंदापर्यंत सगळयाच आकृतिबंधांत काव्यनिर्मिती झालेली दिसते. तसेच विदेशी भाषा आणि भारतीय अन्य भाषांतील कविताही मराठी भाषेत अनुवादित झालेली आपणास दिसते.

पेशवाई बुडाल्यानंतर महाराष्ट्रात ब्रिटीशांची सत्ता स्थापन झाली आणि पाश्चात्य ज्ञान व इंग्रजी भाषेचे प्रारंभिक शिक्षण आपल्याकडे सुरू झाले. हा नवीन युगाचा प्रारंभच म्हणावा लागेल. हे स्थित्यंतर पाहून जागे झालेले महात्मा फुले, लोकहितवादी, आगरकर या सारखे समाजसुधारक आपल्या लेखनातून सामाजपरिवर्तक विचार मांडतांना दिसून येतात.

शिक्षणामुळे राजकीय दृष्टी व सामाजिक अस्मिताजागृत होत होती. नवीन संस्कृतींशी संपर्क येताच विविध विचारांना गती मिळाली. त्यातून वैचारिक आणि सामाजिक प्रबांधनाची सुरूवात झाली. इहवादाच्या प्रभावाने पारमार्थिक परंपरेला गौणत्व आले. संत-पंत-शाहीर आणि लोकवाङमय यातील काव्याचे कथा, किर्तन, पुराणप्रवचन, भजनभारूड, लळिते आणि पोवाडे तमाशे इ. लोकरंजनाच्या माध्यमांतून खोलवर भिनलेले संस्कार बाजूला सारून नवीन पाऊलवाट आपल्या कवितेला मिळाली. ज्योतीबा फुलेंचे 'अखंड' प्रकाशित होऊ लागले. तद्नंतर ज्या नव्या मनुतील 'नव्या दमाचा शूर शिपाई आहे' ही केशवसुतांची ललकारी उसळली! याच काळात युरोपात ज्या सौंदर्यवादी स्वभावाची संवेदनशील जाणीव व्यक्त करणारा युगप्रवर्तक कवी म्हणून केशवसुताचा उल्लेख केला जातो. मध्ययुगीन विरळ होत जाऊन नवीन लौकिक जाणीव स्वीकारण्याची मानसिकता निर्माण होऊ लागली. निसर्गाच्या तरल संवेदना, स्वातंत्र्य, समता आणि विश्वबंधुता, वैयक्तिक व समाजिक भावभावना, सौंदर्यलालसा, प्रेमपूजन सामाजिक रूढींचा जाच आणि त्या विरूध्द बंडखोरी, मनस्वी उदासीनता इत्यादी वैशिष्टये या काळातील कवितेत दृग्गोचर होतात.

दुस-या महायुध्दाच्या शेवटी मराठी कवितेला नवकविता ही संज्ञा मिळाली. १९३० ते १९५२ या कालखंडात साहित्यात व विशेषतः कवितेत आमूलाग्र बदल घडत गेले. या वाङमयीन क्रांतीचे एक शिल्पकार बा. सी. मर्ढेकर होते. जुनी परंपरा नाकारून वेगळया दिशेने वाटचाल करण्याचे कार्य मर्ढेकरांनी केले. याच काळात काव्यसमीक्षेत वास्तववाद, संज्ञाप्रवाह प्रतिमासृष्टी या नवीन संज्ञा स्थीरपाद झाल्या. काव्यातील अर्थशून्य शब्दसोस, सांकेतिक अलंकारिता, निसर्ग चित्रणाचे पांरपारिक साचे मर्ढेकरांच्या कवितेने नष्ट केले. माणसाची अगतिकता, विफलता, एकटेपणा यांना मीतभाषी सूर दिला. अविष्कारात दैनंदिन व्यवहारातील प्रतिमा व देशी आकृतीबंधाचे नवे प्रयोग त्यांच्या कवितेतून प्रकटल रोबो, पिस्टन, पायलन्स? अशा यंत्रयुगीन प्रतिमा आणल्या माणसाच्या सुप्त-अर्धसुप्त मनोव्यापाराची जाणीव करून दिली आणि ह्या एकूण विशेषासह 'माणूसकीचे विडंबन' करणा-या प्रखर वास्तवाचे भान दिले. त्यामुळे त्यांची कविता समजण्यास कठीण असते ही भावना त्या काळात तरी स्वाभाविकच होती. कारण मर्ढेकर काळाच्या पुढे होते. साम्यवादी जाणिवेने काव्यलेखन करणारे, स्वतंत्र शैलीचे शरदच्चन्द्र मुक्तिबोध हे स्वातंत्र्योत्तर काळात महत्वाचे कवी विंदा करंदीकर, वसंत बापट आणि मंगेश पाडगावकर या कवींची कविताही स्वातंत्र्योत्तर मराठी कवितेतील महत्वाची उपलब्धी आहे. इंदिरा संत, पद्मा, शिरीष पै, अनुराधा पोतदार, अंजली ठाकर, सुशीला पगारीया, प्रभा गणोरकर, मल्लिका अमरशेख इत्यादी नंतरच्या महत्वाच्या कवयित्री होत.

साठोत्तरी काळात पारंपारिक दृष्टिकोन मावळला. कविता ही मानव केंद्री बनू लागली. या संदर्भात विलास सारंग यांचे निरीक्षण लक्षात घ्यावे लागेल - "राजकीय स्वातंत्र्यानंतर एक प्रकारच्या 'रेनेसान्स' ला प्रारंभ झाला आहे असे वाटत होते. परंतु लवकरच या सर्वांचा निराशाजनक अंत झाला. 'लिटल मॅगझीन्स' ही चळवळ संपुष्टात आली. बंडखोरीची आणि प्रयोगशीलतेची ऊर्मीही विझून गेली. परदेशातील विविध प्रवाहांबदलची जिवंत जाणीव आणि संकराची इच्छा उरली नाही. दिलीप चित्रे, अरुण कोलटकर किंवा मी यासारखे आधुनिकतेचे व नवीनतेचे पुरस्कर्ते प्रतिकूल वातावरणात वावरणा-या एकाकी शिलेदारांप्रमाणे भासू लागले. मराठी साहित्य आता पुन्हा जुन्या लोकरंजक पध्दतीकडे वळले आहे. मध्यमवर्गीय अभिरुचीला गोंजारण्यात लेखक धन्यता मानू लागले आहेत. जगातील अन्य समकालीन साहित्यात मराठी लेखक रस घेत आहेत असा पुरावा कुठे मिळत नाही. धार्मिक मूलतत्ववादासारखा एक प्रकारचा सांस्कृतिक मूलतत्ववादासारखा एक प्रकारचा सांस्कृतिक मूलतत्ववाद सध्या मराठी साहित्यावर प्रभूत्व गाजवीत आहे. 'इंडियन लिटरेचर' या नियतकालिकात १९९२ साली प्रसिध्द झालेल्या लेखात मी म्हटल्याप्रमाणे 'स्वतःवर खूष होऊन एकमेकांशी डरांवडरांव करणा-या बेडकांनी भरलेल्या डबक्यासारखे आजचे मराठी साहित्य विश्व आहे."

स्वातंत्र्यानंतर शिक्षणाचा प्रसार वाढला - बहुजन समाज शिकू लागला - समाजाचे अंतरंग उलगडणारे साहित्यिक समोर येऊ लागले. संविधानात जरी समानता असली तरी इथे सामाजिक न्याय मिळत नाही याची जाण दलित वर्गात निर्माण झाली आणि या जाणिवेला मुखर करणारा नवशिक्षित दलितांचा वर्ग उदयाला आला बाबूराव बागूल, शंकरराव खरात, दया पवार इ. लेखकांच्या साहित्यात क्रांतिकारी जाणिवा अभिव्यक्त होऊ लागल्या.

१९६० च्या सुमारास निर्माण झालेल्या आर्थिक, सामाजिक, राजकीय परिस्थितीचे आणि वाङ्मयीन प्रभावाचे प्रतिबिंब कवितेत दृष्यमान झालेले दिसते. १९६० च्या काळात 'संतप्त तरूण पिढी' आणि 'दलितमुक्ती साहित्य' अशी दोन वाङ्मयीन बंडे झाली या बंडांचा साहित्याच्या अन्य प्रकारांपेक्षा कवितेवर अधिक-विस्तृत आणि सखोल परिणाम झाला.

स्वातंत्र्यप्राप्ती (१९७४), महात्माजींची हत्या (१९४८), हैद्राबादचा मुक्तिसंग्राम (१९४८), संविधान स्वीकार (१९५०), संयुक्त महाराष्ट्राची स्थापना (१९६०), चीनचे आक्रमण (१९६२).

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौध्द धर्माचा स्वीकार केला व आपल्या लक्षावधी अनुयायांना धम्मदीक्षा दिली. (१९५६) मराठी साहित्यावर या घटनांचा ठसा उमटणे स्वाभाविक होते. लोकशाही समाजव्यवस्थेत साक्षरता वाढली,

शिक्षणप्रसार वाढला त्यातून काव्यनिर्मिती, वाचन, प्रकाशन इ. बाबींची व्याप्ती वाढली, चीनच्या आक्रमनाने भारतीय कम्युनिष्ट पक्ष दुभंगला. मध्यमवर्गीय साम्यवादाच्या आकर्षणाला आहोटी लागली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतराने दलितमुक्ती चळवळीला नवा आयाम प्राप्त झाली. दलितांच्या सृजनशील चिंतनातून काव्यधारा उसळू लागल्या. व्यक्तीचे स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठा यांचे भान समाजाच्या सर्व थरांना येऊ लागले.

१९५६ ते १९७५ या काळात संतप्त तरूण पिढीच्या लघु-अनियतकालिकांची एक चळवळ सुरू झाली. तिचा आरंभ शब्द या अनियतकालिकाने झाला. तद्नंतर अथर्व, आत्ता, वाचा, कावळा, अबकडई, स.न.वि.वि., त्रिशंकू, विद्रोह, येरू जातक इ. लघुनियतकालिके प्रसिध्द झाली. नवकवितेप्रमाणे ही चळवळ मुंबई महानगरात सुरू झाली. पुढे तालुका पातळीवर पसरली. प्रस्थापित व्यवस्थेशी झुंजणे, साहित्यक्षेत्रातील गटबाजीला विशेषकरून 'सत्यकथेच्या' मक्तेदारीला सुरूंग लावणे, सांकेतिकता मोडून काढणे ही या स्वातंत्र्योत्तर साहित्य चळवळीची फलश्रुती. या चळवळीने साहित्यक्षेत्रात एवढा गवगवा केला होता की, आता प्रस्थापित व्यवस्था जळून खाक होणार असे वाटू लागले होते पण बंडाचा वणवा पेटला न पेटला तोच विझवूनही गेला कारण या चळवळीला कोणतेही तत्वज्ञानात्मक अधिष्ठान स्वीकारता आले नाही. त्यामुळेच दलित वर्गातील तरूण 'दलित पँथर' आणि 'दलितसाहित्य' या चळवळीकडे ओढला गेला. आंबेडकर तत्वज्ञानाचे ऊर्जाकेंद्र त्याने स्वीकारले. त्यामुळे दलित वर्गीय लेखकांनी एकेकाळी लिहिलेले साहित्य हे दलितमुक्ती साहित्य म्हणून पुढे आले.

दलितमुक्ती साहित्यात आधुनिक जीवनमुल्यांचे प्रखर भान आहे. व्यक्तीच्या प्रतिष्ठेसाठी आणि सामाजिक समतेसाठी छेडलेल्या संगराची जाणीव आहे. जागृत अशा अस्मितेची धार आहे, प्रखर विद्रोहाची भावना आहे. सामाजिक परिवर्तनाच्या जाणिवेने भारावलेल्या सामाजिक बांधिलकीने निर्माण होणा-या दलितमुक्ती साहित्याने परंपरेला नकार दिला. अमेरिकेतील निग्रोंचा मुक्तिसंग्राम आणि साम्यवादी तत्वज्ञान यातूनही या चळवळीला दिशा मिळाली आहे. स्वातंत्र्योत्तर भारतातील दलित समाजाच्या वास्तव परिस्थितीतून, जातीव्यवस्था आणि दलित वर्गातील जागृती यातून विद्रोही कवितेची धारा निर्माण झाली म्हणून स्वातंत्र्योत्तर काळातील अतिशय महत्वपूर्ण वाङ्मयीन घटना म्हणून दलितमुक्ती साहित्याकडे पाहायला हवे.

या दलितमुक्ती कवितेला स्वातंत्र्यपूर्व पाश्र्वभूमी आहे. किसन फागुजी बन्सोडे, शाहीर हेगडे, भीमराव कर्डक, अण्णाभाऊ साठे, केरू बुवा गायकवाड, दीनबुधु वामनदादा कर्डक इ. लोकशाहीरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर या क्रांतीसूर्यापासून स्फूरण घेऊन दलितांच्या व्यथा, वेदना, आशा आकांक्षा प्रकट करायला सुरूवात केली. १९२७ महाडचे चवदार तळे संग्राम, १९५६ चे धम्मचक्रप्रवर्तन या दोन घटनांमधील क्रांतीकारक शक्तीने दलित माणूस जागृत झाला. या घटनेचे नेतृत्व बाबासाहेबांनीच केले होते. म्हणून दलितमुक्ती काव्याला भीमशक्तीचे स्फुरण म्हणता येईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्त्वाचा प्रभाव दलित वर्गातील लेखकांच्या वाङ्मय निर्मितीवर होणे, जातीनिष्ठ समाजात अटळ होते. परंतु डॉ. बाबासाहेबांच्या विचारांची व्यापकता एवढी होती की, त्याचे आव्हान बहुजन वर्गातील सर्व जातींपर्यंत सहज पोहचले आणि १९६० नंतर क्रमाक्रमाने का होईना सर्वच बहुजन जाती पुढे आल्या व काव्यनिर्मिती करू लागल्या. प्रा. गंगाधर पानतावणे यांच्या 'अस्मितादर्श' ने या सर्वांना एक समान वाङःमयीन व्यासपीठ मिळवून दिले.

साठोत्तर काळखंडात ग्रामीणतावादी साहित्याची चळवळ व्यापक होत गेली. ग्रामीण जीवनात निर्मितीशीलतेची मुळं शोधणारी ग्रामीणतावादी कवी लेखकांची मोठी पिढी ग्रामीण जीवनाचे चित्रण करू लागली. शोषित-शेतकरी वर्गाची सुखदुःख या साहित्यातून आता अभिव्यक्त होत आहेत. ग्रामीण कविता आता सामाजिक बांधिलकीचा अविष्कार करतांना दिसते.

स्त्रीवादी भावविश्वाचा अविष्कारही काव्यातून होऊ लागला आदिवासी कविलेखकही आपल्या जीवनाविष्कारासाठी काव्यात्म अभिव्यक्तीचा आधार घेऊ लागले आणि गत दोन दशकामध्ये आदिवासी कवितांनी मराठी साहित्यात स्वतंत्र प्रवाह निर्माण केलेला दृष्टीस पडतो.

**आंबेडकरी विचारदृष्टीची कविता**: दलितमुक्ती साहित्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार आणि कार्याचा फार मोठा प्रभाव आहे. डॉ. बाबासाहेब हेच त्याचा मुख्य प्रेरणास्त्रोत आहेत. आंबेडकरवादाच्या तळाशी 'एक माणूस एक मूल्य' हे तत्व आहे. मराठी दलितमुक्ती साहित्य हे डॉ. आंबेडकराच्या लढयातून विचारातून व त्यांच्या प्रेरणेतून निर्माण झाले असून त्यांनी आपले वेगळेपण सिध्द केले आहे. आंबेडकरांच्या तत्वाज्ञानात्मक वारश्याचे विवेचन करतांना प्रा. रा. ग. जाधव म्हणतात. "या वारश्यात विभूतीपूजेला अवसर नाही. पोथीनिष्ठेपेक्षा व्यक्तीच्या प्रतिष्ठेला व बुध्दिवादाला त्यात स्थान आहे. हा वारसा जातिभेद व त्यावर आधारीत उच्चनिचता यांच्या निर्मूलनाचा वसा आहे. मूलतः तो भारत व भारतीयता या व्यापक कल्पनांना जतन करणारा, संपन्न करणारा विजिगीषू देशीयतेचा वारसा आहे. दीनदलित, अनाथ-अपंग, बायाबापडया, आदिवासी अशा सगळया सामान्य जनांचा व जनांसाठी असलेला हा वारसा आहे. दलितांना दलितत्वातून बाहेर पडण्यास हात द्यावा असे सांगणारा हा वारसा आहे. हा वारसा सगळया समाजासाठी व देशासाठी आहे. साहित्यिकांनी या वारश्यांचा संस्कार समाजावर प्रभावीपणे करायला हवा अशी अपेक्षा जाधवांनी आंबेडकरांचा वारसा चालवणा-या लेखकांकडून केली आहे."

हिंदु संस्कृती परंपरांची, रूढींची, धर्मशास्त्रांची सर्व जाचक बंधणे झुगारून देऊन मानवमुक्तीचे चित्र दलितमुक्ती साहित्यात रंगवले आहे. हिंदू समाजव्यवस्थेत मानवाचे मुल्य तिच्या वर्णावर, जातीवर ठरविले गेले. या व्यवस्थेत समाजाची चौकट चातुर्वर्ण्यावर आधारली होती. या समाजव्यवस्थेत व्यक्तिस्वातंत्र्य, व्यक्ती समानता, व्यक्तिप्रतिष्ठा यांचा अभाव होता. जाती व्यवस्थेच्या विषमतेने अस्पृश्यता निर्माण झाली होती. या विषमतेविरूध्द विद्रोहीरूप दलित साहित्यात अभिव्यक्त झाले. बाबूराव बागूल म्हणतात "माणसाला मुक्त, महान करणारे ज्ञान द्यावे आणि जातिभेदाचा, जातीवादाचा पुरस्कार करणारे, माणसाला शूद्र समजणारे सर्व हद्दपार करावेत." दीनदलितांची दुःखे त्यांच्या व्यथा-वेदना आणि आंबेडकरी विचार हा प्रथम काव्यातून अविष्कृत झालेला दिसतो. मराठी काव्यक्षेत्रात विद्रोही दलित कवितेने एकच

खळबळ उडवून दिली होती. सनातन प्रवृत्तींना या कवितेने मोठा धक्का दिला. प्रस्थापित भाषेचे जूने बंधू, जूना तोंडवळा आशय बदलून नवे स्वतंत्र विश्व या दलित कवितेने निर्माण केले म्हणून कविता हा दलितमुक्ती साहित्याचा प्रमुख व प्रभावी वाङ्मय प्रकार ठरला.

शाहीर अण्णाभाऊ साठे, वामनदादा कर्डक, बाबुराव बागूल, नामदेव ढसाळ, वामन निंबाळकर, यशवंत मनोहर, केशव मेश्राम, दया पवार आदींनी आंबेडकरी प्रेरणेने आपल्या कविता शब्दबध्द केल्या आहेत. दैवी संकल्पना, कर्मकांड, आत्मा पुनर्जन्म, वर्णव्यवस्था व जातीव्यवस्था न मानणारे कवी वामनदादा कर्डक आपल्या कवितेत माणसाला म्हणतात.

'असे तुझे माझे नाते जडावे
तुझ्या संकटांशी इथे मी लढावे
तुझे भूकेचे कोडे उलगडावे
तुझे दुःख सारे गळूनी पडावे
एकाने हसावे एकाने रडावे
असे विश्व आता इथे ना उरावे'

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे तत्वज्ञान समाजाच्या सामान्य नागरिकांपर्यंत पोहचविणारा हा महाकवि उपरोक्त ओळींतून मानवतावादी संदेश देतो.

बाबूराव बागूल यांनी 'वेदाआधी तू होतास' - या कवितेत माणसाच्या महानतेचा गौरव अत्यंत प्रभावीपणे केला आहे.

हे माणसा,
तूच सूर्याला सूर्य म्हटले
आणि सूर्य सूर्य झाला
आणि चंद्र चंद्र झाला
अवघ्या विश्वाचे नामकरणे तू केलेस --,

मानवी जीवनाचा केंद्रबिंदू माणूसच आहे तो या साहित्याचा मुख्य विषय आहे. विश्व निर्मितीचे नायकपण कवी माणसाला बहाल करतो.

कवी नामदेव ढसाळ आपल्या 'गोलपिठा' या काव्यसंग्रहाने एक महत्वाचे कवी म्हणून मान्यता पावले आहेत. त्यांच्या कवितेतील अनोखे अनुभवविश्व आणि भाषा मराठी कवितेत युगप्रवर्तक ठरली. ते लिहितात -

"नंतर उरल्या सुरल्यांनी कुणालाही गुलाम करू नये, लढू नये,

काळा गोरा म्हणू नये. तू ब्राम्हण, तू ब्राम्हण, तू क्षत्रिय, तू वैश्य, तू क्षूद्र असे हिणवू नये ----

आभाळाला आजोबा आणि जमिनीला आजी मानून
त्याच्या कुशीत
गुण्यागोविंदाने आनंदाने रहावे
चंद्र सूर्य फिके पडतील असे सचेत कार्य करावे
एक तीळ सर्वांनी करंडुन खावा माणसावरच सुक्त रचावे
माणसाचेचे गाणे गावे माणसाने ---"

उपरोक्त कवितेतील मनाचा मोठेपणा ढसाळांचे नाते बुध्दाशी, मार्क्सशी आणि बाबासाहेब आंबेडकराशी जोडतो.

आंबेडकरवादी कवी म्हणून वामन निंबाळकर यांच्या कवितेतून सामाजिक जाणीव समृध्दतेने व्यक्त होतांना दिसते.

आंबेडकरी प्रेरणेने प्रेरीत आणि अर्थपूर्ण प्रतिमानिर्मितीचे प्रचंड सामर्थ्य असलेले कवी यशवंत मनोहर यांचा 'उत्थानगुंफा' (१९७८) हा 'काव्यसंग्रह म्हणजे विद्रोहाचा एक धगधगता ज्वालामुखी आहे. मनोहरांच्या कवितेतून व्यक्त होणा-या बंडखोरीला राजकीय रंग नाही तर ती बंडखोरी अधिक मूलभूत व म्हणून अस्सल आहे." असे विधान डॉ. भालचंद्र फडकेंनी केले आहे ज्यांनी आपल्या सोयीची तत्वज्ञाने, साहित्यशास्त्रे लिहून स्वतःचे श्रेष्ठत्व मिरविले त्या संकुचित विचारसरणीचा कवी जाहीर निषेध करतात या मक्तेदारी प्रवृत्तीचा कवीने निषेधनामा या कवितेते उघड निषेध केला आहे.

"तुम्ही लिहा साहित्यशास्त्रे
लिहा तत्वज्ञाने सोयीची
परंतु इथे मिरासदारी आहे काहींची
हे मी ओरडून आकांतून सांगत जाईन

जातांना मुक्याने जाणार नाही या पसा-याला शाप देऊन जाईन. येतांना प्रश्न घेऊन आलो जातांना उत्तरे घेऊन निघून जाईन" (निषेधनामा - पृ. ३०)

कवी दया पवार, 'कोंडवाडा' या कवितेत लिहीतात - "खरच कशाला झाली पुस्तकांची ओळख? / बरा ओहळाचा गोटा गावाची गुरे वळली असती, / असल्या इंगळया उसल्या नसत्या" (कोंडवाडा पृ. २०) ही गतकाळाची दुःखे अस्वस्थ करणारी आहे.

कवी त्र्यंबक सपकाळे, यांच्या सुरूंग या काव्यसंग्रहातील 'माणूस' या कवितेत म्हणतात -

हे अभाग्यांनो
जागवा तुमच्यातील माणूस तुम्हीच स्वतः
त्यातून उगवेल पहाट नवतेजाची
माणसाच्या महानतेची

हीरा बन्सोड यांचे पौर्णिमा (१९७०) आणि फिर्याद (१९८४) हे दोन काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. या देशाची स्त्री ही पुरुषप्रधान व्यवस्थेने आणि इथल्या मनुवादी संस्कृतीने गुलाम केली आहे. तिचे स्वप्न इथे मारल्या जातात हे नमूद करतांना कवयित्री लिहिते -

"ही माझी फिर्याद
आमच्या कर्मठ संस्कृतीवर आहे.
जिने आम्हाला बंद कोठडीत कैद केले आहे
जिथला पाऊस आम्हाला मुक्त दुष्काळच देतो
जिथले पाणी आमच्याशी मृगजळाची जीवघेणा खेळ खेळते."

आंबेडकरी प्रेरणेने लिखाण करणा-या ज्योती लांजेवार या महत्वाच्या कवयित्री, प्रज्ञा लोखंडे यांचा 'अंतस्थ!' हा काव्यसंग्रह आंबेडकरवादी प्रेरणेचीच निर्मिती आहे. बाबासाहेबांनी या कवितेला 'अत्तदिपभव' दिशा दिली होती - ती स्त्रीमुक्तीची दिशा आहे. आंबेडकरवादाने प्रज्ञा लोखंडेच्याही प्रतिभेला हे अंतःस्थ भान दिले आहे.

"आपल्यातच किती अंतस्थ कप्पे
वावरत असतात.
एकमेकांना अनोळखी असतात."

या कवयित्रीने स्त्रीमनाचे हे कप्पे, जाणिवेच्या पलीकडे फुलविण्याचा प्रयत्न केला आहे. अशाच अनेक कवयित्रींनी आंबेडकरवादी कविता समृध्द केली आहे. परिवर्तनासाठी घेतलेला हा बाबासाहेबाचा क्रांतिवसा आहे.

'छावणी हलते आहे' या कवितासंग्रहात अर्जून डांगळे म्हणतात 'अन्याय, अत्याचाराचा प्रतिकार करण्यास आम्ही

सज्ज आहो आमचे दुःखाचे गाणे परंपरागत स्वरांपेक्षा वेगळे आहे म्हणून वंचितांनो तुम्ही गात रहा तुमचं गाणं थोडं कर्कश असेल त्याला चाल नसेल पण आशय आहे म्हणून तुम्ही गात रहा---"

भूके कंगालाचा जुलूस होऊन
मुक्तवाहिनी किंवा व्हिएतनामी होऊन
तू गायाला हवे
त्यांनी त्यांच्या बंदिस्त सुर्याकडे कूच करेपर्यंत
छावणी हलू लागली आहे
छावणी हलते आहे."

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार घेऊन गात राहिले पाहिजे कारण आता कुठे छावणी हलू लागली आहे असा संदेश कवी देतो. डॉ. यशवंत मनोहर म्हणतात - "डॉ. बाबासाहेब यांच्या ऐतिहासीक क्रांतिकार्याची, त्यांच्या महनीय व्यक्तिमत्वाची - जीवनमूल्यांच्या पातळीवर आणि वाङ्मयीन मूल्यांचा पातळीवर - तात्विक अधिष्ठान आणि सकस निर्मितीचे बळ १९६७-६८ मध्ये लाभलेल्या या मराठीतीतल किंबहुना भारतातीलही साहित्याची प्रेरणा आहे." अशाप्रकारे आंबेडकरी प्रेरणेच्या दलित कवितेने वंचित दीनदलित जीवनाचा आशय प्रथमतः कवितेचा विषय केला. दीनदलितांचे दुःख दारिद्रय, अन्याय, अत्याचार यांचा प्रभावी अविष्कार वाङमयकृती मध्ये घडवून त्याला कारणीभूत असलेल्या धर्म, परंपरा, चातुर्वर्ण्याच्या संकल्पनांना आणि प्रस्थापित व्यवस्थेला नकार दिला - त्या विरूध्द विद्रोह प्रकट केला. आंबेडकरवादी कवी आदिवासी, भटक्याविमुक्त, ख्रिश्चन, मुस्लीम, दलित, तेली-तांबोळी, कुणबी, कुणीही असो या सर्वांच्या मुक्तीचा विचार मानतो. कोटयावधी मने आपल्यात वावरणा-या एका मनातून ही कविता येते. त्यामुळे स्वर व्यक्तीचा असला तरी त्या स्वरातील कोलाहल समूहाचा असतो.

आंबेडकरी लेखकांनी सर्वात जास्त वाङ्मयनिर्मिती 'काव्य' या साहित्य प्रकारात केलेली दृष्टीस पडते. हजारो वर्षांपासून समूहाच्या अस्मितेची अवहेलना, त्यांचा कोंडमारा प्रथमच काव्यातून प्रकट होत होता त्याचप्रमाणे उपेक्षित माणसाच्या भावविश्वाला विद्रोह आणि नकाराचे परिणाम देणारी शब्दकळा कवितेतून व्यक्त होत होती, नैसर्गिक हक्क नाकारलेला अर्थवंचित माणूस या कवितेचा नायक होता. विद्रोही दलित कवितेत आपले प्रेरणास्थान डॉ. आंबेडकर यांना मानले त्यामुळे तत्वज्ञनातील मानवमुक्तीची मानवतावादी संकल्पना पुढे आली.

मराठी कवितेला आत्मग्नते बाहेर काढण्याचे कार्य आंबेडकरी प्रेरणेच्या कवितेने केले. १९६० पूर्वी किसन फागु बन्सोड, शाहीर हेगडे, भीमराव कर्डक आदी कवी शाहिरींच्या अंगानी भावद्रव्य व्यक्त केले होते. विद्रोही दलित कवितेच्या विकास प्रक्रियेत भीमगीतकार व शाहिरांनी केलेले कार्य अतुल्य आहे. ढसाळ ते लोकनाथ यशवंत किंवा नवे कवी केतन पिंपळापूरे यांच्यापर्यंत आंबेडकरी कविता आज अत्यंत विपूल प्रमाणात लिहीली गेली आहे.

महत्वाचे कवी आणि त्यांच्या काव्यसंग्रहाचा उल्लेख या ठिकाणी होणे अप्रस्तुत ठरणार नाही.

केशव मेश्राम - उत्खनन / अर्जून डांगळे - छावणी हलते आहे / ज. वि. पवार - नाकेबंदी / त्र्यंबक सपकाळे - सुरूंग / नरेशकुमार इंगळे - अंगारा / प्रकाश जाधव - दस्तखत / भाऊ पंचभाई - हुंकार वादळाचे / बबन चहांदे - उच्छेद / डब्ल्यु कपूर - बंधमुक्त / लोकनाथ यशवंत - आता होऊन जाऊ द्या आणि शेवटी काय झाले / महेन्द्र भवरे - चिंताक्रात मुलुखाचे रूदण / सागर जाधव - उजेड / भुजंग मेश्राम - उलगुलान / अरूण काळे - रॉक गार्डन, सायरनचे शहर , नंतर आलेले लोक / केतन पिंपळापुरे - सुर्यकंकण, मार्शलरेस, डेमोफून इ. काव्यसंग्रहाची चर्चा आस्वादक समीक्षेचया अंगाने आंबेडकरी समीक्षेमध्ये केलेली आहे.

आंबेडकरी कवितांची निर्मिती जशी कवींनी केली तशीच हीरा बन्सोड, ज्योती लांजेवार, प्रज्ञा लोखंडे या प्रतिभाशाली कवयित्रींनी आपल्या काव्यनिर्मितीने एकूणच आंबेडकरी कवितेला व मराठी साहित्याला महत्वाचे योगदान दिले.

ज्योती लांजेवार - दिशा / हीरा बन्सोड - पौर्णिमा / प्रज्ञा लोखंडे - अंतस्थ / प्रतिक्षा राजानंद - मला हवी असणारी पहाट / उषाकिरण आत्राम - म्होरकी / सुरेखा भगत - साक्ष / माया वासनिक - अंतःक्षोभ.

सद्यकाळात अनेक नवीन कवी काव्यनिर्मिती करीत आहेत. भीमसेन देठे, शशीकांत हिंगोणेकर, उषा हिंगोणेकर, भ. मा. परसभाळे, सुखदेव ढाणके, सुभाष खंडारे, आनंद गायकवाड, सर्जेराव चव्हाण, विजयकुमार गवई, अशोक शेगावकर, लक्ष्मीकांत घुमे, गोकूलदास मेश्राम, गोविंद वाघमारे, विश्वेंदु जयभीम, मंगेश बन्सोड, शिवा इंगोले, दया हिवराळे, अशोक थोरात, सुदाम सोनुले, दिगंबर झाडे, प्रमोद भागवत यांनी केलेले काव्यलेखन संग्रहरूपाने प्रकाशित झाले आहे. परंतु अप्रकाशित प्रेसेनजित, का. रा. वालदेकर, इ. मो. नारनवरे, सतेश्वर मोरे, नारायण थोरात, अशोक पळवेकर, प्रभाकर गंभीर, रोहण नागदिवे, ऋषिकेश कांबळे, चंद्रकांत सरदार, बळी खैरे, सतीश राणा, प्रकाश तपासे यांचे काव्यलेखनही काव्यात्मक व आशय संपन्न आहे.

आत्मकथन हा दलित साहित्यातीतल एक महत्वाचा वाङमय प्रकार आहे. एका अर्थाने दलित आत्मकथन म्हणजे भारतीय समाज जीवनाचा आरसा आहे. भारतातील निम्न जातवर्गात केवळ जन्म झाल्यामुळे जे दुःख, वेदना, हालअपेष्टा वाटयाला आल्या त्याचे सार्थ वर्णन त्यातून व्यक्त होते. दलित आत्मकथन केवळ एका विशिष्ट जातींचे नसून जातीव्यवस्था नाकारणा-या असंख्य जाती-जमातीचे आहेत. 'बलूत' (दया पवार) 'तराळ - अंतराळ' (शंकरराव खरात) 'आठवणीचे पक्षी' (प्र. ई. सोनकांबळे) इ. अस्पृश्य जातीतील आत्मकथन असो किंवा 'उपरा' (लक्ष्मण माने) 'उचल्या' (लक्ष्मण गायकवाड) 'मरणकळा' (जनाबाई) 'तांडा' (आ. राठोड ) 'राणभैरी' (गुलाब वाघमोडे ) या भटक्या विमुक्त जाती-जमातीतील आत्मकथन असो 'जिण आमचं' (बेबी कांबळे) - 'आयदान' (उर्मीला पवार) 'तीन दगडांची चूल' (विमल मोरे) या सर्व जात जमातीतील स्त्रियांचे आतमकथने. आत्मकथनांनी मराठी साहित्याचे दालन समृध्द केले आहे. दलित स्त्रियांच्या आत्मकथनातून दलित म्हणून व स्त्री म्हणून असे दुहेरी शोषण समर्थपणे व्यक्त झाले आहे.

याशिवाय कथा, कादंबरी, नाटक, ललित इ. वाङमय प्रकारातून दलित साहित्य समृध्द झाले. यापैकी 'सूड' (बा. बागूल) 'आग' (सुधाकर गायकवाड). 'हिंदू' (शरणकुमार लिंबाळे) अशा काही कांदब-या 'युगयात्रा' (म. भी. चिटणीस)

'वाटा-पळवाटा' (दत्ता भगत) 'किरवंत' (प्रेमानंद गज्वी) अशी अनेक नाटके महत्वाची ठरली. जेव्हा 'मी जात चोरली होती' (बा. बागूल) 'मजल्याच घर' - वामन होवाळ, 'बेगड' (योगीराज वाघमारे) अशा अनेक कथा मराठी साहित्याच्या इतिहासात आपला वेगळा ठसा उमटवणा-या ठरल्या. थोडक्यात विविध वाङःमय प्रकारांमध्ये झालेल्या समृध्द लेखनाने दलित साहित्याने मराठी साहित्याची वैचारिक उंची वाढविली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचारकार्य हे केवळ व्यक्तीचे विचारकार्य नाही तर ते आधुनिक भारतीय समाजाला क्रांतीच्या दिशेने नेणारे मार्गक्रमण आहे. युग जाणिवेचा तो हुंकार आहे. म्हणूनच ''पारंपारिक संस्कृतीचे व कथाकाव्याचे मुलबंध नाकारण्याच्या किंवा त्यांना नवा अर्थ देण्याच्या किंवा त्यांच्या विरूध्द अर्थाने वापर करण्याच्या दलित लेखकांच्या वृत्तीमुळे मराठीत प्रथमच नव्याने प्रश्न उपस्थित झाले आहे.'' - दया पवार यांचे मत या संदर्भात महत्वाचे आहे.

थोडक्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी दलित साहित्य हे मराठी साहित्यातील क्रांतीदर्शी स्वप्न ठरले आहे. डॉ. यशवंत मनोहर म्हणतात 'आंबेडकरी साहित्य, जात, वर्ग धर्म अशा शोषणविहीन मानवी जीवनाचा नकाशा आहे'. 'सब्बे सत्तासुखी होन्तु' या मानववादाला जडवादाची आणि इहवादाची बैठक आहे. सर्वाचे समान हित हे या समग्रलक्ष्मी तत्वज्ञानाचे ध्येय आहे. जीवनाच्या केवळ बायनरी असोसिएशन्सकडे नेणा-या विचार करण्याच्या सवयींचे आंबेडकरवादी निर्मूलन करतो. त्या दृष्टीने संपूर्ण मानवी मानसशास्त्राचे नवे चित्र आंबेडकरवादी देतो. या चित्रातला समाज जसा प्रबुध्द आहे तसे या चित्रातले साहित्यही प्रज्ञानी आहे त्याचे हृदय आकाशाएवढे विशाल आहे. पृथ्वीच्या पाठीवरील कोणावरही हा अन्याय होणे हे त्याच्या बुध्दीवादी मानवतेला मान्य नाही.

---

*संदर्भ:*


१. *'प्रदक्षिणा' खंड - २, संपा. रवींद्र घवी, पुष्पा भावे, वि. भा. देशपांडे, अनंत कान्हो, म. द. हातकणंगलेकर व अन्य, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९९९, पृ. क्र. १.*

२. *२) 'अक्षरांचा श्रम केला', विलास सारंग, मौज प्रकाशन, मुंबई, प्र. आ. १ जाने. २०००, पृ. क्र. १८.*

३. *'आंबेडकरवादी मराठी साहित्य', डॉ. यशवंत मनोहर, भीमरत्न प्रकाशन, नागपूर, प्र. आ. १९९९ पृ. क्र. २८७ यावरून उद्धृत.*

४. *'दलित साहित्यः आजचे क्रांतिविज्ञान', बाबूराव बागूल, बुध्दिस्ट पब्लिशिंग हाऊस, नागपूर, प्र. आ. १९८१, पृ. क्र. ८.*

५. *'आंबेडकरवादी मराठी साहित्य', डॉ. यशवंत मनोहर, भीमरत्न प्रकाशन, नागपूर, प्र. आ. १९९९, पृ. क्र. १५६.*

६. *'मराठी साहित्यः परिदृश्य', चंद्रकांत बांदिवडेकर, वाणी प्रकाशन, नवी दिल्ली, प्र. आ. १९९७, पृ. क्र. १७९.*

७. *'मराठी वाङ्मयकोष खंड-४, संपादक, विजया राजाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य आणि साहित्य संस्कृती मंडळ, समीक्षा संज्ञा, मुंबई, २००२, पृष्ठ क्र. १४४.*

८. *'मुक्ती कोण पथे', डॉ. बाबासाहेब आंबेडकर, २०१३, सुगावा प्रकाशन, पुणे पृष्ठ क्र. १९.*

# माझ्या गावाकडे चल माझ्या दोस्ता: एक आकलन

***डॉ. आर. आर. दिपटे,** एस. एन. मोर महाविद्यालय, तुमसर जि. भंडारा मो. ८३०८१०७३९९*

**सारांश**: १९६० नंतरच्या साहित्यविश्वात वाचन प्रक्रियेमध्ये मोठया प्रमाणात बदल झाले असे दिसून येते. बदलाचे वारे ग्रामीण साहित्याच्या माध्यमातून कविता, कथा, कादंब-या, नाटक हयांच्या माध्यमातून अधिक जोरकसपणे पुढे येवू लागले. इंद्रजित भालेराव ह्यायातील एक महत्वाचे कवी असून त्यांनी 'माझ्या गावाकडे चल माझ्या दोस्ता' या कवितेतून ग्रामीण भागातील नवतरूणांना भावनिक आव्हान केलेले आहे. नव्या पिढीला शहरांचे असलेले आकर्षण, यातूनही आपली खेडे टिकली पाहीजेत. शेतीव्यवसाय, संस्कृती, सभ्यता, भाषा, नातीगोती याविषयीचे चिंतन यातून व्यक्त होत आहे. ही एक भावनिक साद केवळ नवतरूणांना नसून संपूर्ण ग्रामीण समाजाला केलेले हे आव्हान आहे.

**बीजशब्द**: ग्रामीण साहित्य, खेडे, कृषीसंस्कृती, लोक परंपरा.

**प्रस्तावना**: साहित्य हे समाजाच्या भावना व्यक्त करण्याचे महत्वाचे साधन असते असे म्हटले जाते ते खरे आहे. आजपर्यंत शिक्षणाच्या अभावामुळे ग्रामीण भागात राहणा-या माणसाच्या वेदना, त्यांचे दुःख, निराशा व्यक्त करण्यासाठी ग्रामीण साहित्य हे महत्वाचे अंग ठरले. ग्रामीण जीवन अनुभवणा-या लेखकांजवळ मोठा स्वानुभव होता व याचे पडसाद या साहित्यावरही उमटले आहे. आजपर्यंत खेडयापाडयात, डोंगरकपारीत वनाच्या साहाय्याने राहणा-या लोकांचे सामाजिक-सांस्कृतिक जीवन या साहित्याच्या निमित्ताने प्रकाशात आले. नागर जीवनापेक्षा प्रत्येक बाबतीत असणा-या त्यांच्या वेगळेपणाचा परिचय सर्वसामान्य वाचकाला होवू लागला.

स्वातंत्र्य मिळून दोन शतके होऊन गेली परंतु या स्वातंत्र्याचा शेतक-यांना विशेष फायदा झालेला नाही. त्यांचे जीवन पूर्वीसारखेच पशुपातळीवरचे होते. उलट आर्थिक बाबीतून निर्माण झालेले प्रश्न, शिक्षणातून वाढलेली बेरोजगारी, लोकसंख्यावाढ, अंधश्रद्धा हे आजही ग्रामीण भागातील मूलभूत प्रश्न आहेत. उलट विषयाच्या नावाखाली येथील स्त्री-पुरुष जीवन धोक्यात आले आहे. म्हणजेच "स्वातंत्र्य मिळाल्यावर मुखपृष्ठ तेवढे बदलल्यासारखे वाटते. पण त्याचे मुखपृष्ठ तेवढे बदलले ख-या अर्थाने खेडे बदलले नाही. याचे अंतरंग बदलले नाही."[१] यामुळे वास्तव स्थितीचे दर्शन घडवितांना ग्रामीण साहित्याने मोलाचा वाटा उचलला आहे असे दिसते. कवितेतून ग्रामीण जीवनात घडणारी स्थित्यंतरे, धरणामुळे उठणारी गावे, रोजगाराच्या शोधातून माणूस व माती यांचेही दुरावलेले संबंध, शहरीकरणामुळे ढासळत जाणारे ग्रामीण व्यावसायिक, श्रीमंत प्रतिष्ठिताकडून होणारे भूमिहीन मजुराचे शोषण, सुशिक्षित ग्रामीण तरुणांची बेरोजगारी अशा प्रकारचे बदलते ग्रामजीवन प्रकट करण्यात आले आहे. ग्रामीण कवितेचा विचार करीत असतांना आपण कोणत्या प्रकारच्या कवितेला ग्रामीण कविता म्हणणार आहोत हे स्पष्ट केले पाहिजे. "ग्रामीण कवितेमध्ये बाह्य वास्तव हे खेडे, निसर्ग आणि पारंपारिक मूल्य यातून घडलेले ग्रामजीवन आहे. आणि त्यात आकाररूपाला आलेली संवेदनशीलता त्या जीवनातील अनुभवाविषयीच्या प्रतिक्रिया देत असते. अशा कवितेच्या निर्मितीच्या बुडाशी असलेली संवेदनशीलता ही ग्रामीण संवेदनशीलता आहे."[२]

ग्रामीण वास्तवाला केंद्रस्थानी ठेवणारी ही कविता स्वभाव विकासासोबतच वास्तवभिमुख राहते. म्हणजेच ग्रामीण साहित्याच्या वास्तवशील प्रवाहाचा एक भाग म्हणून ग्रामीण कवितेचा विचार करावा लागेल. महाराष्ट्रात महात्मा गांधीच्या विचारांचे वारे ग्रामीण भागातही वाहू लागले. 'खेड्याकडे चला' ही घोषणा त्या काळात तरुणांमध्ये आकर्षणाचा केंद्र ठरली. विनोबा भावे यांच्यासारख्या विचारवंताचा पगडाही लोकांवर होताच. यातून ग्रामीण कला, संस्कृती, हस्तशिल्पे, खादी कपडे, यांचा प्रसार प्रचार मोठ्या प्रमाणात झालेला दिसून आला. शिक्षणाचा प्रसार हळूहळू शहराप्रमाणे ग्रामीण भागात होऊ लागला. यातून लोकांचे दैनंदिन जीवनाविषयीचे प्रश्न, वेदना, समस्या यांचा प्रत्यय ग्रामीण कवितेतून आलेला होता. या कवितेमधून ग्रामीण जीवनात घडणारी स्थित्यंतरे, धरणावर उठणारे गावे, वीज कपातीचा प्रश्न, यांत्रीकीकरणाने माणूस व माती यांचे दुरावलेले संबंध, शहरीकरणामुळे ढासळत जाणारे ग्रामीण व्यावसायिक जीवन, श्रीमंत प्रतिष्ठांकडून होणारे भूमिहिन मजुराचे शोषण, सुशिक्षित ग्रामीण तरुणांची बेरोजगारी अशा प्रकारे बदलते ग्रामीण जीवन प्रगट करण्यात आले आहे. या संबंधी मत व्यक्त करताना आनंद यादव म्हणतात की, "ग्रामीण हा शब्द फक्त ग्रामातील कायदेशीर निगडीत नाही. याचा अर्थ 'शहरी व्यवस्थेव्यतिरिक्त ही भारतीय जीवनव्यवस्था आहे, त्या सर्व व्यवस्थेला व्यापणारा असा अर्थ या चळवळीला अभिप्रेत आहे."[३]

"ग्रामीण साहित्यातील आस्सलतेचा शोध घेण्याच्या प्रयत्नातून व ग्रामीण व नेमकेपणाने स्पष्ट करतांना डॉ. गो. म. पवार म्हणतात, "जो लेखक ग्रामीण जीवनात वाढलेला, घडलेला असेल, ज्याने ग्रामीण जीवनाचा गाभा आत्मसात केलेला असेल. त्याची संवेदनशीलता ही ग्रामीण संवेदनशीलता म्हणता येईल.[४] खेड्यातील जीवनपद्धती, परंपरा, संस्कृती, भाषा ही नगरापेक्षा वेगळी असून ग्रामीण माणसांची जीवन जगण्याची सामूहिक अनुभव घेण्याची क्षमता निश्चितच वेगळी असते, यात शंकाच नाही. याविषयी सरोजिनी बाबर म्हणतात, "ग्राम-ग्रामातून खेड्या-खेड्यातून विखुरलेले सर्वसामान्य जनतेला असलेले व त्यांच्यासाठी लिहिलेले वाङमय हे ग्रामीण वाङमय होय. या वाङमयात या सर्वसामान्य लोकांचे जीवन प्रतिबिंबित झालेले असते. त्यांच्या भावना व आकांक्षा त्यात चित्रीत झालेल्या असतात. एवढेच नव्हे तर ही माणसे आपल्या सभोवतालच्या निसर्गावर या ठिकाणी आपल्याच रंगाने बोलकी झालेली असतात."[५] तुलनात्मक विचार करून समाजशील वृत्ती व मानवतावादी भूमिका हे ग्रामीण संवेदनशीलतेचे महत्त्वाचे घटक मानले आहेत. शहरी व ग्रामीण संवेदनशीलतेच्या संदर्भात यांनी समूहाचे जीवन हा फरक

केलेला आहे. याच्याच अर्थ ग्रामीण संवेदनशीलता या लेखनातून प्रत्ययाला येत असेल तेच अस्सल ग्रामीण साहित्य होय.

गावगाडा व समाज यांचे नातेही अतूट असते. या नात्यापोटीच आपली जमीन, गाव, जंगल, भाषा, संस्कृती, परंपरा या प्रेमापोटी माणसे गावाच्या आठवणीने व्याकुळ होतात. यावर भाष्य करतांना शरद व्यवहारे म्हणतात, "समाज आणि संस्कृती यांच्यातील परस्परसंबंध अतूट असतात."[६] याचा अर्थ यांची भाषा, सभ्यता, पेहराव, सण, कृषीकेंद्रित जीवन निष्ठा, कृषीसंबंधीचे रोजगार, पिके यांचे वेगळेपणा, समज-असमज, मनोरंजनाची साधने, लोकगीते, श्रमविहार गीते या सर्वांचा प्रभाव त्यांच्या जीवन पद्धती व कला या साहित्यावर दिसून येतो. गावगाड्यातील प्रतिष्ठेच्या कल्पना, गावातील पाटलाचे महत्व, शाहीर, तमासगीर, भाट, बहुरूपी, कुलदैवत विषयीचा आदर, वस्तूविनिमय पद्धतीचा वापर व घरात आलेले पीक, त्याबद्दल नवस खेळण्याच्या प्रथाचे चित्रात या साहित्यात दिसून येते.

मराठी साहित्यामध्ये १९६० नंतर नव्या जाणिवांचा संचार झाला. या साहित्याला साठोत्तरी वाङमय असे म्हटले जाते. साठोत्तरी साहित्यामध्ये प्रामुख्याने ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य व आदिवासी साहित्य असे निरनिराळे साहित्य प्रवाह उदयास आले. या सर्व साहित्य प्रवाहांना सामाजिक जाणीवांचा व सामाजिक बांधिलकीचा संदर्भ होता. या जाणिवांचा विकास होण्यामागे वैचारिक भूमिका सुद्धा कारणीभूत होती. सदरील साहित्य प्रवाहांचे अंशतः अस्तित्व १९६० पूर्वीसुद्धा पाहायला मिळते. मात्र १९६० पूर्वीचे व १९६० नंतरचे साहित्य मूल्यात्मकदृष्ट्या वेगळे ठरते. दलित साहित्यातील वैचारिक जाणीव फारशी प्रगल्भ नव्हती. जसे उपेक्षितांचे अंतरंग या श्री. म. माटे यांच्या पुस्तकातून दलित समूहाबद्दल केवळ सहानुभूतीचा स्वर व्यक्त होतांना स्थितीवादी दृष्टिकोन सुद्धा व्यक्त होतो. यातून मूलभूत बदलाची प्रक्रिया घडतांना दिसत नाही. दलित साहित्याप्रमाणेच ग्रामीण साहित्याचे सुद्धा अस्तित्व अंशतः त्यापूर्वीपासूनच पाहायला मिळते. परंतु ग्रामीण जीवन ग्रामीण समाज यांच्या विषयीची निम्मी भावना तेथे पाहायला मिळते.

प्रामुख्याने ग्रामीण भागात न राहता लोकांनी ग्रामीण भागाचे कौतुक करीत अतिरेकी उदात्तीकरण करणे असे या साहित्याचे स्वरूप होते. जसे शेतातील गारवा किती आल्हाददायक आहे. शेतातील पाणी किती स्वच्छ निर्मळ आहे. गावातील लोक किती प्रेमळ आहेत. तसेच निसर्ग किती मोहक आहे. अशा प्रकारचे वर्णन या साहित्यामध्ये येत होते. र. वा. दिघे, ग. ल. ढोकळ, अशा लेखकांनी ग्रामीण जाणिवा निम्म्या पद्धतीने मांडल्या. १९६० पूर्वीच्या ग्रामीण साहित्यामध्ये येणारे चित्रण हे ग्राम जीवनाला प्रेक्षकांच्या भूमिकेतून पाहणारे आहे. परंतु १९६० नंतरचे ग्रामीण साहित्य हे प्रत्यक्ष समाज जीवनातील मूलभूत समस्यांना केंद्रवर्ती ठेवणारे आहे. या साहित्यातून ग्रामीण जीवन म्हणजे केवळ आनंदी आनंद आहे. हा पूर्वीचा भ्रम नष्ट झाला. तर ग्रामीण जीवनामध्ये ज्याप्रमाणे सहकार्याची व सामाजिक बांधिलकीचे मूल्य आहे. त्याचप्रमाणे अनेक गंभीर समस्या सुद्धा आहेत, शोषण सुद्धा आहे. हे अधोरेखित करण्यात आले. ग्रामीण समूहाचे उदात्तीकरण त्यांच्या आर्थिक प्रश्नाकडे जाणीवपूर्वक डोळेझाक केली जाते. याबाबतचे साहित्यिक राजाश्रय ग्रामीण साहित्यीकी उलगडून दाखविले. म्हणूनच १९६० नंतरचे ग्रामीण साहित्य हे प्रत्यक्ष ग्रामीण भागात राहणा-या लोकांच्या प्रत्यक्ष अनुभवातून साकारले आहे. यातून प्रत्यक्ष ग्रामीण जीवनातील संघर्ष, राजकारण, सामाजिक दृष्टी, ठळकपणे व्यक्त झाली.

इंद्रजीत भालेराव हे आजच्या ग्रामीण कवितेतील लक्षणीय नाव आहे. भालेरावांची कविता गावापेक्षा शेतात अधिक रमते हे खरे आहे, मात्र हे शेत गावापासून वेगळे करता येत नाही. त्याचा पीकपाणी हा कवितासंग्रह १९८९ साली प्रकाशित झाला असून यांनी मराठवाड्याचे ग्रामजीवन मराठवाड्याच्या बोलीभाषेतून पहिल्यांदा अस्सलपणे अविष्कृत होत आहे. त्यांच्या कविता ह्या ग्रामीण संकेत, रूढी, परंपरा, तेथील भावजीवन, प्रश्न, लोकजीवन यांचा आविष्कार जगाला दिसते. उदा. पेरणी संपल्याबरोबर वाफधावणी करणे म्हणजे शेवटच्या तासात तिफण उभी करून तिची व पाच, सात ढेकलांची पूजा केली जाते. पेरणीला आलेल्या सर्वांना सांजा दिला जातो. अशा लहान-सहान संदर्भातून त्याची कविता ग्रामजीवन साक्षात करण्याबाबत थेट बहिणाबाईशी नाते सांगते. ग्रामीण साहित्यातील काही कवींनी लोकप्रिय शैलीतून आपल्या जीवनातील भावानुभावांचे प्रगटीकरण केले. इंद्रजीत भालेराव त्यांचा लोकप्रिय बाणा, सामूहिक भावनांचे प्रगटीकरण आणि त्यातून प्रत्यक्ष ग्राम जीवनातील समस्या एकत्रितपणे मांडण्याची कौशल्य त्यांच्या कवितेत आहे. शेतकरी शेती यासोबतच ग्राम संस्कृती आणि निसर्ग ह्या सा-यांशी त्यांची कविता घट्टपणे उभी राहते. शेतक-यांच्या जीवनातील व्यथा, वेदना, जीवनविषयक धारणा, रूढी-परंपरा, समज-असमज, लोकसंकेत या सर्वांशी त्यांचा अनुबंध यांच्यासह पूर्ण कृषीकेंद्रित ग्राम संस्कृती यातील विविध बारकाव्यासह त्यांची कविता येते. आपल्या मातीत सोने पिकविणा-या शेतक-याच्या जीवनातील अभावग्रस्त जिणे ते आपल्या कवितेचा मुख्य विषय बनवितात. यातून त्यांची शेतीनिष्ठा व ग्रामनिष्ठा यांचा आपल्याला प्रत्याय येतो.

"माझ्या गावाकडे चल माझ्या दोस्ता" या कवितेतून ते प्रभावीपणे व्यक्त झाले आहे. ग्रामीण भागातील तरुण शहरातील आपल्या मित्राला आपल्या गावात येण्याचे भावनिक आव्हान करतो. या आव्हानात जशी प्रेम आणि आपुलकीची भावना आहे. तशीचं ग्रामीण वास्तव प्रभावीपणे दर्शविण्याची क्षमता सुद्धा आहे. कवी म्हणतो की, गावाकडे जाण्याचा रस्ता काट्याकुट्याचा आहे. तिथं माणसं कशी उन्हात तळपतात. ते पाहण्यासाठी गावाकडे चल, गावातील लोक प्रत्येक क्षणाला खस्ता खातात. मातीत मिसळून कष्ट करतात आणि शेवटी मातीतच एकरूप होतात. हे पाहण्यासाठी गावाकडे चल. कवी म्हणतो की,

"काळया व्यापाच, व्यापाचं हिरवं रान,
काळया माईन, माईन पिकवलं सोनं,
त्यांच्या घामाचा भाव लई सस्ता,
माझ्या गावाकडे चल माझ्या दोस्ता"

येथे कवीने जमिनीशी आई-बापाचे तादात्म साधले आहे तसेच शेतक-याने पिकविलेल्या मालाची किंमत ठरविण्याचा शेतक-याला अधिकार सुद्धा नाही. हे वास्तव अधोरेखित केले आहे. ज्यावेळी शहरातील लोकांना डब्यातील साखर गोड

लागत असते. त्याचवेळी शेतक-याला त्याचे उत्पादन घेताना अतोनात कष्ट होत असतात.

जेव्हा शहरातील नागरी लोक सुखासीन आयुष्य जगत असतात तेव्हा ग्रामीण भागातील लोक दुष्काळामध्ये होरपळत असतात. या वास्तवाची जाणीव कवीने करून दिली आहे. कवितेच्या शेवटी कवीने निर्णायक भाष्य केले आहे. कवी म्हणतो,

"या भूमीचा, भूमीचा मूळ अधिकारी
बाप झालायं, झालाय आज भिकारी
गाव असून झालाच फिरस्ता
माझ्या गावाकडे चल माझ्या दोस्ता"

या ओळींमधून संपूर्ण समाजाच्या निर्माण जगाच्या पोशिंदा कसा देशोधडीला लागतो. हे मार्मिकरित्या व्यक्त झाले आहे. शेतक-याचे जीवन आर्थिक शोषणातून प्रत्ययाला येते. नागर समाजाला याची जाणीव नसली तरी नागर समाजच शेतक-याच्या या अवस्थेला जबाबदार असतो. हे कवीने समर्थपणे व्यक्त केले आहे. ग्रामीण भागातील मोहक दृष्यापेक्षा हे वास्तव भीषण आणि विदारक आहे. इंद्रजीत भालेरावांच्या लोकप्रिय कवितामधूनही या वास्तवाच्या प्रभावी प्रत्यय येतो ही निश्चितच आश्वासक बाब आहे असे वाटते.

**समारोप**: अशाप्रकारे आज शहरीकरणाच्या प्रक्रियेत एक प्रकारचे दुभंगलेपण अनुभवणारा तरीही मनात गावाकडची नाती जपू पाहणारा, बदलत्या वास्तवाला धीरपणे सामोरे जाणारा ग्रामीण कवी आपल्या अनुभवाशी प्रामाणिक राहून त्यांनी काव्यलेखन केले आहे. आजच्या बदलत्या परिस्थितीत आजचा ग्रामीण कवी एक प्रकारचे तुटलेपणा अनुभवतो. नौकरी-व्यवसायाशी जुळताना तो शहराशी एकरूप होऊ पाहतो. पण कवीला ते शक्य नाही. त्याची अवस्था आता जरासंधासारखी झाली आहे. तो आपल्या खेड्याकडे वळू पाहतो तर आपले खेडेही पूर्वीसारखे राहिले नाही. परिवर्तनाच्या या चक्रात खेडे अंतबाह्य बदल होत चालले आहे. तरीही ग्रामजीवनाची ओढ त्यांच्यातील कमी होत नाही. उत्तम शेती, मध्यम व्यापार ही कल्पना आता मागे पडत चाललेली आहे. अशा काळात कवी इंद्रजीत भालेराव यांनी ग्रामीण जीवनातील वास्तवदर्शी चित्रण आपल्या कवितेतून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी त्यांनी भावनिक साद घालण्यासोबतच गावाकडील महती वेगवेगळया उदाहरणाच्या माध्यमातून व्यक्त केली आहे.

**निष्कर्ष**: १. ग्रामीण साहित्यातून ग्रामीण भागात राहणा-या लोकांचे जीवन, संघर्ष, राजकारण, सामाजिक दृष्टी, भाव-भावना यांचे चित्रण दिसून येते. २. काळानुसार लोकांच्या बदलणा-या आवडी-निवडी, बदललेले लोकसंकेत, परंपरा ह्यांचेही प्रत्यंतर यात दिसते. ३. सततची नापिकी, सरकारी योजनेतील विफलता, शेतमालाचे भाव ह्या समस्याने जगाचा पोशिंदा कसा देशोधडीला लागलेला आहे. याचे चित्रण या कवितेमधून दिसून येते. ४. प्रस्तुत कविता ही इंद्रजीत भालेराव यांनी आजच्या तरूणांना घातलेली भावनिक साद आहे.

---

***संदर्भ:***


*१. संपादक, डॉ. ईश्वर नंदपुरे, साहित्य: ग्रामीण आणि दलित, (डॉ. मदन कुलकर्णी गौरव ग्रंथ), विजय प्रकाशन, नागपूर, प्र. आ. ५ सप्टेंबर २००२, पृष्ठ क्र. ७३.*

*२. तत्रैव, साहित्य: ग्रामीण आणि दलित, पृष्ठ क्र. ९२.*

*३. तत्रैव, साहित्य: ग्रामीण आणि दलित, पृष्ठ क्र. २०.*

*४. डॉ. गणेश देशमुख: ग्रामीण समाजातील वास्तविक, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. ५ सप्टेंबर २००८, पृ. क्र. २३१.*

*५. तत्रैव, ग्रामीण समाजातील वास्तविक, पृष्ठ क्र. ६०.*

*६. शरद व्यवहारे, लोकसंस्कृतीचा अंतःप्रवाह, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र. आ. १५ जून १९९९, पृष्ठ क्र. ८१.*

# स्त्री भ्रुणहत्या: एक सामाजिक समस्या

***डॉ. उल्हास रामजी राठोड**, नारायणराव काळे स्मृती मॉडेल कॉलेज, कारंजा (घा.), जि. वर्धा - ४४२२०३*

**प्रस्तावना:** पूर्वी भारतीय समाजात स्त्रियांचा आदर केला जात होता. आणि तिचे स्थान पुरूषांच्या बरोबरीचे समजले जात होते. हिन्दू धर्मशास्त्रानुसार स्त्री ही पुरूषाची अर्धांगिणी समजली जात होती. हिन्दु समाजात स्त्रीचा आदर केला जात होता. स्त्रीच्या रूपात ईश्वरी शक्तिचे प्रतिक म्हणून लक्ष्मी, सरस्वती, दुर्गा इत्यादीची पुजा केली जात होती. आपल्या देशाला 'भारत माता' म्हणून संबोधले जाते. त्याकाळी स्त्रीची अवस्था फार चांगली होती. स्त्रीला शक्तीमान, सुख-समृध्दीचे व संपत्तीचे प्रतीक मानल्या जात होते. माता, पत्नी व भगीणी म्हणून तिचा आदर केला जात होता.

सुरूवातीच्या काळात स्त्री-पुरुष विषमता नव्हती. स्त्री-पुरुषांमध्ये बंधने नव्हती. मानसीक व बौध्दीकदृष्ट्या स्त्री, पुरुषापेक्षा कनिष्ठ मानली जात नव्हती. सर्वत्र स्त्रीला स्वातंत्र्य होते, तीला प्रतिष्ठा होती. सार्वजनिक ठिकाणी ती भाग घेत होती. असे इतिहासावरून स्पष्ट होते. परंतू काळानुसार परिस्थितीमध्ये बदल होत गेला पुरूषप्रधान समाजामध्ये स्त्रीयांना अनेक बंधने घालण्यात आली, स्त्रीला शिक्षणापासून वंचित ठेवण्यात आले, विवाह करिता जोडीदार निवडण्याचे अधिकार नाकारण्यात आले. धार्मीक आणि सामाजीक कामात सहभागी होण्यास अनेक बंधने घालण्यात आली.

ज्याप्रमाणे व्यक्तीचा दर्जा जातीच्या अधारावर निश्चित केला जात होता त्याचप्रमाणे स्त्रिाच्या आधारावर देखील विषमता पाळली जाते. भारतीय समाजात मुलगा जन्माला आल्यावर कुटुंबातील सर्व लोक पेढा वाटून आनंद व्यक्त करतात. परंतू मुलगी जन्माला आल्यास विषेश आनंद होत नाही, उलट कुंटुबावरील ओझे समजले जाते 'ती परक्याची धन आहे' असे मानले जाते. हिन्दू धर्मात पितृऋन फेडण्यासाठी वंशाचा दिवा, म्हातारपणची काठी म्हणुन मुलगा जन्माला येणे आवश्यक मानले जाते सुशिक्षित आणि सुधारलेल्या समाजात मुलांना विशेष प्राधान्य दिल्या जाते.

गर्भजलाचे परिक्षण करून लिंगाची ओळख करून घेतली जाते आणि स्त्री लिंग असल्यास गर्भपात केला जातो. कुंटुबामध्ये मुलगा व मुलगी असतील तर त्या ठिकाणी जन्म देणारे आई-वडीलच भेद करीत असतात. मुलाला ताजे जेवण दिल्या जाते. त्याचे लाड करतात, त्याचे हट्ट पूरविले जातो. परंतू मुलीचे योग्य प्रकारे संगोपण केल्या जात नाही. मुलीविषयी भेदभाव केला जातो. तिच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करून मुलाच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष देवून तो शिकून मोठा झाला तर आपल्या कुंटुबाचे नाव होईल त्यामुळे मुली पेक्षा मुलाला अधिक महत्व दिल्या जाते. म्हणून भारतीय समाजात विषमता आढळून येते.

प्रसुती पुर्व लिंगाचे निदान करून स्त्री लिंग असल्यास त्याची हत्या करणे म्हणजे स्त्री भृणहत्या होय. २००१ च्या जनगणनेनुसार १००० पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण ९३३ इतके होते. हे प्रमाण असेच कमी होत राहीले तर येत्या काळात प्रत्येक पुरूषाला स्त्री मिळणे कठिण होईल. मुलगा किंवा मुलगी होणे पूर्णतः पुरुषांच्या गुणसुत्रावर अवलंबुन असते परंतू मुलगी झाल्याचा दोष फक्त स्त्रीला दिल्या जातो. मुली आजही योग्य पध्दतीने आपले कुंटुब सांभाळीत आहे. सुशिक्षित मुलगी विवाह झाल्यावरही त्यांचा सांभाळ योग्य पध्दतीने करित आहे. याउलट व्यसनाच्या आहारी गेलेला मुलगा आई-वडीलांना आधार देत नाही. त्याचा परिणाम आई-वडीलांना भिक मागुन जगावे लागते. म्हणूनच मुलगी परक्याचे धन मानू नका. देशातील एकूण लोकसंख्येत स्त्री-पुरूषाचे प्रमाण संतुलीत राहणे समाजातील संतूलनासाठी अत्यंत आवश्यक आहे. पुरूषाच्या संख्येच्या मानाणे स्त्रीयांच्या संख्येत घट होत असल्याचे आपणास पूढील तकत्यावरून स्पष्ट होते.

देशात हजार पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण

| क्र. | वर्ष | स्त्रियांचे प्रमाण |
|---|---|---|
| १. | १९०१ | ९७२ |
| २. | १९११ | ९६४ |
| ३. | १९२१ | ९५५ |
| ४. | १९३१ | ९५० |
| ५. | १९४१ | ९४५ |
| ६. | १९५१ | ९४६ |
| ७. | १९६१ | ९४१ |
| ८. | १९७१ | ९३० |
| ९. | १९८१ | ९३४ |
| १०. | १९९१ | ९२७ |
| ११. | २००१ | ९३३ |

विदर्भातील जिल्हानिहाय स्त्रियांचे प्रमाण

| अ. | जिल्हा | स्त्रियांचे प्रमाण |
|---|---|---|
| १. | नागपूर | ९४९ |
| २. | अमरावती | ९४७ |
| ३. | अकोला | ९३६ |
| ४. | भंडारा | ९५८ |
| ५. | बुलढाणा | ९१५ |
| ६. | चंद्रपूर | ९४४ |
| ७. | गडचिरोली | ९७४ |
| ८. | गोंदिया | ९६४ |
| ९. | वर्धा | ९३४ |
| १०. | वाशिम | ९२१ |
| ११. | यवतमाळ | ९४२ |

महाराष्ट्रामध्ये १००० पुरुषांमागे ९१७ एवढे स्त्रियांचे प्रमाण आहे. वरिल तक्त्यावरून हे स्पष्ट होते की १९०१ च्या जनगणने नंतर स्त्रियांच्या संख्येमध्ये सतत घट होत आहे. विदर्भामध्येही स्त्रियांच्या प्रमाणात घट होत आहे. महाराष्ट्र हे संताचे व पुरोगामी विचारांचे राज्य असूनही तिथे स्त्रियांच्या संख्येत घट होत आहे. १९७५ मध्ये जन्माला येणाऱ्या मुलामध्ये काही दोष, व्यंग असल्यास त्याचे प्रसवपूर्व निदान तंत्र विकसीत करण्यात आले. परंतू या निदान तंत्राचा उपयोग लिंग निदान करण्यासाठी केला जात आहे. राष्ट्रीय लोकसंख्या धोरण

लोकसंख्या नियंत्रन करण्यासाठी आहे. परंतू त्यामागचा उद्देश स्त्री-पुरूष प्रमाणात समतोल साधून संर्वांगीन विकास साधने हे देखील उदिष्ट आहे. त्यानूसार प्रसवपूर्व निदान तंत्र कायद्यात २००२ मध्ये दुरूस्ती करून हा कायदा १४ फेब्रुवारी २००३ मध्ये अस्तित्वात आला.

प्रसवपूर्व निदान तंत्र विनियम व दुरूपयोग प्रतीबंध १९९४ च्या कायद्याचे नावात बदल होवून त्यास गर्भधारणा पूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्र लिंग निवडीस प्रतिबंध कायदा असे नाव देण्यात आले. या कायद्यानुसार लिंग निदान करण्यास प्रतिबंध आहे. विकृती किंवा इतर दोष याचे निदान करण्यासाठी अल्ट्रासाउंड सारख्या तंत्राचा वापर करण्यास या कायद्यात परवानगी असली तरी या कायद्याद्वारे गर्भलिंग निदान तंत्रावर नियंत्रन आहे. या तंत्राचा दुरूपयोग होऊन गर्भलिंग निदान करून मुलीचा गर्भ असल्यास तो नाहीसा केल्या जातो. या गैर प्रकाराला आळा बसावा व त्याव्दारे समाजातील स्त्री-पुरूष प्रमाणातील असमतोल दुर व्हावा हा या कायद्याचा उद्देश आहे.

**सांस्कृतिक प्राधान्य:** विद्वानांच्या एका शाळेने असे सुचवले की स्त्री भ्रूणहत्या इतिहास आणि सांस्कृतिक पार्श्वभूमीतून पाहिले जाऊ शकते. सामान्यतः, पुरुष बाळांना प्राधान्य दिले जात असे कारण त्यांनी शारीरिक श्रम दिले आणि कौटुंबिक वंशामध्ये यश मिळविले. स्त्री भ्रूणांचा निवडक गर्भपात त्या भागात सर्वात सामान्य आहे जेथे सांस्कृतिक नियम विविध सामाजिक आणि आर्थिक कारणांमुळे स्त्री मुलांपेक्षा पुरुष मुलांना महत्त्व देतात. एक मुलगा "मालमत्ता" म्हणून प्राधान्य देतो कारण तो कमावू शकतो आणि कुटुंबाला आधार देऊ शकतो. मुलगी ही 'दायित्व' असते कारण तिचे लग्न दुसऱ्या कुटुंबात केले जाईल आणि त्यामुळे ती तिच्या पालकांना आर्थिक हातभार लावणार नाही. स्त्री भ्रूणहत्या नंतर, स्त्री भ्रूणहत्येची प्रथा किंवा काही घरांमध्ये मुलींसाठी प्रसूतीपश्चात आरोग्य सेवा रोखणे हे वेगळ्या स्वरूपात सुरू आहे. शिवाय, काही संस्कृतींमध्ये मुलांनी त्यांच्या म्हातारपणात त्यांच्या पालकांची काळजी घेणे अपेक्षित आहे. हे घटक बाल लिंग गुणोत्तरावरील रोगांच्या प्रभावामुळे गुंतागुंतीचे आहेत, जेथे संसर्गजन्य आणि गैर-संसर्गजन्य रोग पुरुष आणि स्त्रियांना वेगळ्या प्रकारे प्रभावित करतात.

**संसाधनासाठी असमान लिंग प्रवेश:** जन्म लिंग गुणोत्तरातील काही तफावत आणि गर्भित स्त्री भ्रूणहत्या हे संसाधनांच्या असमान प्रवेशामुळे असू शकतात. मॅकफर्सन (२००७) ने नोंदवल्याप्रमाणे, लिंग हिंसा आणि अन्न, आरोग्यसेवा, पुरुष आणि महिला मुलांमधील लसीकरण यामध्ये लक्षणीय फरक असू शकतो. यामुळे मुलींमध्ये उच्च अर्भक आणि बालमृत्यूचे प्रमाण वाढते, ज्यामुळे लिंग गुणोत्तरात बदल होतो.

संसाधनांमध्ये असमान, लिंगनिहाय प्रवेश सामाजिक-आर्थिक स्थितीशी जोरदारपणे जोडलेला दिसतो. विशेषतः, गरीब कुटुंबांना कधीकधी रेशनचे अन्न देण्यास भाग पाडले जाते, विशेषतः मुलींना मुलांपेक्षा कमी प्राधान्य दिले जाते. ही प्रथा सर्वात गरीब कुटुंबांमध्ये कमी सामान्य आहे, परंतु थोड्या कमी गरीब कुटुंबांमध्ये नाटकीयरित्या वाढते. क्लासेन आणि विंक यांच्या २००३ चा अभ्यास असे सूचित करतो की हे "जास्त महिला आर्थिक स्वातंत्र्य आणि लोकसंख्येच्या गरीब वर्गांमधील कमी सांस्कृतिक कठोरतेशी संबंधित आहे." दुस-या शब्दात सांगायचे तर, सर्वात गरीब कुटुंबे सामान्यतः सांस्कृतिक अपेक्षा आणि नियमांनी कमी बांधली जातात, आणि स्त्रियांना गरज नसताना कौटुंबिक उपजीविका बनण्याचे अधिक स्वातंत्र्य असते.

लोपेझ आणि रुझिकाह (१९८३) यांना असे आढळून आले की, समान संसाधने दिल्यास, स्त्रिया बालपणानंतर जीवनाच्या सर्व टप्प्यांवर पुरुषांपेक्षा जास्त जगतात. तथापि, जागतिक स्तरावर, संसाधनांचे नेहमीच समान वाटप केले जात नाही. अशाप्रकारे, काही विद्वानांचा असा युक्तिवाद आहे की आरोग्यसेवा, शिक्षण आणि पोषण यासारख्या संसाधनांच्या प्रवेशातील असमानता जगातील काही भागांमध्ये दिसणाऱ्या उच्च लिंग गुणोत्तरामध्ये कमीत कमी भूमिका बजावतात.

भारतातील महिला नेत्यांनी पुरवलेल्या अल्पसंख्याक वस्तू महिलांच्या संसाधनांमध्ये असमान लिंग प्रवेशाच्या काही समस्या दूर करण्यात मदत करतात. सार्वजनिक वस्तूंची व्याख्या गैर-वगळता येण्याजोगी आणि गैर-प्रतिस्पर्धी अशी केली जाते, परंतु भारतामध्ये सार्वजनिक वस्तूंची व्यवस्था नाही आणि स्वच्छ पाणी किंवा रस्त्यांच्या उपलब्धतेच्या अनेक समस्या आहेत. याव्यतिरिक्त, बऱ्याच 'सार्वजनिक वस्तू' मध्ये महिलांना वगळले जाते कारण कुटुंबे त्यांच्या पुरुष मुलांच्या त्या संसाधनांमध्ये प्रवेशास प्राधान्य देणे निवडतात. भारतात, पूर्वीच्या संशोधनात असे आढळून आले आहे की महिला नेते सार्वजनिक वस्तूंमध्ये गुंतवणूक करतात जी महिलांच्या पसंतींना अनुरूप असतात, विशेषतः पाण्याच्या पायाभूत सुविधांमध्ये, ज्यामुळे किशोरवयीन मुलींकडून घरगुती कामांसाठी खर्च करण्यात येणारा वेळ कमी होतो. यामुळे तरुण मुलींना शिक्षण घेण्यासाठी अधिक वेळ मिळतो आणि त्यांच्या कुटुंबासाठी आणि समाजासाठी त्यांचे मूल्य वाढते. जेणेकरुन त्यांना भविष्यात संसाधनांमध्ये प्रवेश मिळण्याची अधिक शक्यता असते. अल्पसंख्याक गट, स्त्रियांप्रमाणे, अल्पसंख्याक किंवा कमी स्पिलओव्हर वस्तू जसे की हस्तांतरण, शिधा आणि पाणी कनेक्शन प्रदान करण्याची शक्यता असते, ज्याचा फायदा फक्त इतर महिलांना होतो. बहुसंख्य पुरुषांना या वस्तूंपासून कोणताही फायदा होत नाही आणि त्यांना त्यामध्ये गुंतवणूक करण्याची शक्यता कमी असते. उदाहरणार्थ, चट्टोपाध्याय आणि डुफ्लो या राजकीय शास्त्रज्ञांनी केलेल्या अभ्यासात असे दिसून आले आहे की पश्चिम बंगालमध्ये स्त्रिया पाणी आणि रस्त्यांबद्दल अधिक तक्रार करतात आणि महिला राजकारणी त्या समस्यांमध्ये अधिक गुंतवणूक करतात. राजस्थानमध्ये, जिथे स्त्रिया पिण्याच्या पाण्याबद्दल जास्त तक्रारी करतात, तिथे महिला राजकारणी पाण्यात जास्त आणि रस्त्यांवर कमी गुंतवणूक करतात.

**हुंडा पद्धत:** जरी हुंडा प्रथा १९६१ च्या हुंडाबंदी कायद्याने कायदेशीररित्या संपुष्टात आली असली तरी, कुटुंबांवर देखरेख ठेवण्याची अशक्यता आणि भ्रष्टाचाराची व्याप्ती यामुळे संपूर्ण भारतात ती सुरूच राहिली आहे. हुंडा म्हणजे लग्नाच्या वेळी वधूच्या कुटुंबाकडून वराच्या कुटुंबाला दिले जाणारे पैसे. हे सहसा 'सामाजिक दृष्ट्या स्तरीकृत, एकपत्नी समाजात आढळते जे आर्थिकदृष्ट्या गुंतागुंतीचे असतात आणि जेथे स्त्रियांची उत्पादनक्षम भूमिका तुलनेने लहान असते'. सैद्धांतिकदृष्ट्या, विवाहाचा परिणाम भागीदार

अशा जोडीदाराची निवड करतात जो त्यांची उपयुक्तता जास्तीत जास्त वाढवतो आणि दोन्ही सहभागींना परताव्याची समान वितरण होते. परिणाम परंतु इष्टतम असतो आणि समतोल गाठतो जेव्हा कोणीही इतर कोणत्याही जोडीदाराशी चांगले असू शकत नाही.

**भारताची कमकुवत सामाजिक सुरक्षा व्यवस्था:** या पुरुषांच्या पसंतीचे आणखी एक कारण म्हणजे मुलगा होण्याचे आर्थिक फायदे आणि मुलगी होण्यासाठी होणारा खर्च. भारतात, अत्यंत मर्यादित सामाजिक सुरक्षा व्यवस्था आहे त्यामुळे पालक त्यांच्या मुलांकडे त्यांचे भविष्य सुनिश्चित करण्यासाठी आणि वृद्धापकाळात त्यांची काळजी घेण्यासाठी त्यांच्याकडे पाहतात. मुली जबाबदाऱ्या असतात कारण त्यांचे लग्न झाल्यावर त्यांना दुसऱ्या कुटुंबात जावे लागते आणि त्या त्यांच्या पालकांची काळजी घेऊ शकत नाहीत. याव्यतिरिक्त, ते कौटुंबिक संपत्तीमध्ये आर्थिकदृष्ट्या योगदान देत नाहीत आणि हुंडा पद्धतीमुळे ते महाग आहेत. भारतातील लोक सहसा पुरुषांचे काम 'उत्पादक' आणि कुटुंबाला हातभार लावणारे म्हणून पाहतात, तर स्त्री श्रमाच्या सामाजिक धारणामध्ये असा अर्थ नाही. हे भारतातील पुरुषांना जास्त पगाराच्या नोकऱ्या मिळवणे आणि त्यांच्या कुटुंबासाठी आर्थिक तरतूद करणे सोपे आहे या वस्तुस्थितीशी संबंधित आहे. लाभदायक रोजगाराच्या त्या पातळीपर्यंत पोहोचण्यासाठी आणि मुलींना आर्थिक उत्तरदायित्व देण्याच्या लोकांच्या समज बदलण्यासाठी महिलांना शिक्षण आणि आर्थिक संसाधनांमध्ये वाढीव प्रवेशाची आवश्यकता आहे. या खर्च आणि फायद्याच्या विश्लेषणासह, अनेक कुटुंबे या निष्कर्षापर्यंत पोहोचतात की त्यांचे आर्थिक भविष्य सुनिश्चित करण्यासाठी त्यांनी पुरुषांच्या जीवनाला स्त्रियांपेक्षा प्राधान्य दिले पाहिजे. भारतातील पारंपारिक सामाजिक सुरक्षा व्यवस्था कुटुंबकेंद्रित आहे, तीन पिढ्यांचे संयुक्त कुटुंब एकत्र राहतात आणि एकमेकांची काळजी घेतात.

**कायदे आणि नियम:** भारताने आपला पहिला गर्भपात-संबंधित कायदा, तथाकथित मेडिकल टर्मिनेशन ऑफ प्रेग्नन्सी कायदा १९७१ मध्ये पास केला, ज्याने बहुतेक राज्यांमध्ये गर्भपात कायदेशीर केला, परंतु गर्भपातासाठी कायदेशीररित्या स्वीकार्य कारणे नमूद केली जसे की आईला वैद्यकीय धोका आणि बलात्कार. कायद्याने डॉक्टरांची स्थापना केली जे कायदेशीररित्या प्रक्रिया आणि सुविधा प्रदान करू शकतात जेथे गर्भपात केला जाऊ शकतो, परंतु तंत्रज्ञानाच्या प्रगतीवर आधारित स्त्री भ्रूणहत्येचा अंदाज लावला नाही. १९८० च्या दशकात शहरी भारतात लैंगिक तपासणी तंत्रज्ञानाची वाढती उपलब्धता आणि त्याचा गैरवापर होत असल्याच्या दाव्यामुळे, भारत सरकारने १९९४ मध्ये प्री-नॅटल डायग्नोस्टिक तंत्र कायदा संमत केला. या कायद्यात आणखी सुधारणा करण्यात आली. आणि जन्मपूर्व लिंग तपासणी आणि स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी आणि शिक्षा करण्यासाठी २००४ मध्ये प्री-नॅटल डायग्नोस्टिक तंत्र (नियमन आणि गैरवापर प्रतिबंध) (पीसीपीएनडीटी) कायदा. तथापि, या कायद्याची अधिकाऱ्याकडून अंमलबजावणी होत नसल्याची चिंता आहे.

स्त्री भ्रूणहत्या आणि त्याची अंमलबजावणी यावर भारतीय कायद्यांचा प्रभाव अस्पष्ट आहे. संयुक्त राष्ट्र लोकसंख्या निधी आणि भारताच्या राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने २००९ मध्ये भारत सरकारला कायद्याच्या प्रभावाचे मूल्यांकन करण्यास सांगितले. द पब्लिक हेल्थ फाउंडेशन ऑफ इंडिया या प्रमुख संशोधन संस्थेने २०१० च्या अहवालात दावा केला आहे की, भारताच्या काही भागांमध्ये या कायद्याबद्दल जागरूकता नसणे, योग्य प्राधिकरणांची निष्क्रिय भूमिका, प्रसूतीपूर्व काळजी सेवा देणाऱ्या काही क्लिनिकमधील संदिग्धता आणि त्यांची भूमिका कायद्याची अवहेलना करणारे काही वैद्यकीय व्यवसायी. भारताच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने जागरूकता वाढवण्यासाठी क्लिनिक आणि वैद्यकीय व्यावसायिकांपर्यंत पोहोचण्यासाठी शिक्षण आणि मीडिया जाहिरातींना लक्ष्य केले आहे. इंडियन मेडिकल असोसिएशनने आपल्या सभा आणि परिषदांमध्ये सदस्यांना बेटी बचाओ (बेटी वाचवा) बॅज देऊन जन्मपूर्व लैंगिक निवड रोखण्यासाठी प्रयत्न केले आहेत. तथापि, नंदी आणि देवळालीकर (२०१३) यांनी केलेल्या अलीकडील अभ्यासात असा तर्क आहे की १९९४ च्या कायद्याने एका दशकात स्त्री भ्रूणहत्या रोखून थोडासा प्रभाव पाडला असावा.

भारत सरकारने, २०११ च्या अहवालात, सर्व भागधारकांना त्याच्या MTP आणि PCPNDT कायद्यांबद्दल अधिक चांगले शिक्षित करण्यास सुरुवात केली आहे. त्याच्या संप्रेषण मोहिमांमध्ये, लिंग निर्धारण बेकायदेशीर आहे, परंतु भारतातील काही वैद्यकीय परिस्थितींसाठी गर्भपात कायदेशीर आहे यावर जोर देऊन ते सार्वजनिक गैरसमज दूर करत आहे. सरकार लिंग निवडीच्या मूलभूत सामाजिक कारणांना संबोधित करण्यासाठी मीडिया मोहिमेसह लिंगभेद कमी करण्याचा प्रयत्न करणारे कार्यक्रम आणि उपक्रमांच्या अंमलबजावणीस समर्थन देत आहे.

**स्त्री भ्रूणहत्याची कारणे**:

१. स्त्रीविरोधी वृत्ती कोणत्याही अर्थाने गरीब कुटुंबांपुरती मर्यादित नाही. भेदभावामागे सांस्कृतिक श्रद्धा आणि सामाजिक नियमांचा मोठा हात असतो. ही प्रथा थांबवायची असेल, तर या नियमांना आव्हान द्यावे लागेल.

२. भारतातील स्त्रियांना तुच्छतेने पाहणे हे सामाजिक-आर्थिक कारणांशी जोडले जाऊ शकते. भारतात केलेल्या अभ्यासात महिलांशी होणाऱ्या गैरवर्तनामागे आर्थिक उपयुक्तता, सामाजिक-आर्थिक उपयोगिता आणि धार्मिक कार्य असे तीन घटक दिसून आले आहेत.

३. आर्थिक उपयुक्ततेच्या संदर्भात, अभ्यास दर्शवितात की वडिलोपार्जित शेती किंवा कौटुंबिक व्यवसायात काम करणे, उत्पन्न मिळवणे किंवा वृद्धावस्थेत पालकांना आधार देणे हे मुलींपेक्षा मुलगे जास्त आहेत.

४. लग्न झाल्यावर मुलगा घरातील कामात जास्तीची मदत करणारी व हुंड्याच्या रूपाने आर्थिक लाभ मिळवून देणारी सून आणून घराची संपत्ती वाढवतो, तर मुली लग्न झाल्यावर निघून जातात आणि आर्थिक भार पडतो. हुंड्याच्या रूपात.

५. स्त्रियांच्या अत्याचारामागील सामाजिक-आर्थिक उपयुक्तता घटक हा आहे की, चीनप्रमाणेच भारतात, पुरुष संतती आणि पुरुषप्रधान कुटुंबांची प्रथा अशी आहे की वंश चालवण्यासाठी किमान एक मुलगा असला पाहिजे आणि अनेक पुत्र असावेत. कुटुंबात. व्यतिरिक्त श्रेणी वाढते.

६. स्त्रीच्या वियोगाचा शेवटचा घटक म्हणजे धार्मिक प्रसंग, ज्यामध्ये हिंदू परंपरेनुसार फक्त मुलगेच सहभागी होऊ शकतात, जसे की आई वडिलांचा मृत्यू झाल्यास, आत्म्याच्या शांतीसाठी फक्त मुलगाच अग्नि देऊ शकतो.

याशिवाय, ७. सामाजीक रूढी. ८. गर्भजल परिक्षण. ९. वारसा पध्दती. १०. धार्मीक विश्वास. ११. हुंडापध्दती. १२. पुरुषप्रधान संस्कृती. १३. स्त्री कडे पाहण्याचा दृष्टीकोण. १४. स्त्री-पुरुष समानतेचा अभाव, इत्यादी कारणे जबाबदार आहेत.

**स्त्री भ्रुणहत्या रोखण्यासाठी उपाय**: १. मुलींना शिक्षण देणे. २. गर्भजल परिक्षणावर बंदी. ३. सामाजीक विचारात बदल. ४. मानसिकता बदलाची गरज. ५. जनजागृती. ६. स्त्री चळवळ. ७. महाविद्यालयीन स्तरवर जाणीव-जागृती.

**स्त्री भ्रुणहत्या रोखण्यासाठी शासनाच्या उपाययोजना व उपक्रम**: ही दुष्टाई संपवण्यासाठी आणि लोकांच्या दृष्टिकोनात बदल घडवून आणण्यासाठी सरकारने अनेक पावले उचलली आहेत. देशातील स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी सरकारने अवलंबलेल्या बहुआयामी धोरणामध्ये जनजागृती आणि कायदेशीर उपाययोजना तसेच महिलांना सामाजिक-आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी कार्यक्रमांचा समावेश आहे. यापैकी काही उपाय खाली दिले आहेत.

१. गर्भधारणेपूर्वी आणि नंतर लिंग निवड प्रतिबंधित करण्यासाठी आणि प्रसवपूर्व निदान तंत्रांचे नियमन करण्यासाठी, सरकारने एक व्यापक कायदा, गर्भधारणापूर्व आणि प्रसवपूर्व निदान तंत्र (लिंग निवड प्रतिबंध) कायदा, १९९४ लागू केला. २००३ मध्ये त्यात सुधारणा करण्यात आली.

२. सरकारने या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी जलद केली आणि नोंदणी नसलेल्या मशीन्स सील करणे आणि जप्त करणे आणि नोंदणी नसलेल्या क्लिनिकला दंड करणे यासह विविध नियमांमध्ये सुधारणा केल्या.

३. सर्व राज्यांना आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने या कायद्याची कठोरपणे अंमलबजावणी करण्याचे आणि बेकायदेशीर लिंग शोधण्याच्या पद्धती थांबवण्यासाठी पावले उचलण्याचे आवाहन केले आहे.

४. सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी लिंग गुणोत्तराचा कल मागे घ्यावा आणि शिक्षण आणि सक्षमीकरणावर भर देऊन मुलींच्या दुर्लक्षाला आळा घालण्याचे आवाहन केले.

५. आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना या कायद्याची गांभीर्याने अंमलबजावणी करण्याकडे जास्तीत जास्त लक्ष देण्यास सांगितले आहे.

६. पीएनडीटी कायद्यांतर्गत केंद्रीय देखरेख मंडळाची स्थापना करण्यात आली असून त्याच्या नियमित बैठका होत आहेत.

७. संकेतस्थळांवर लिंग निवडीच्या जाहिराती बंद करण्यासाठी हे प्रकरण दळणवळण आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाकडे नेण्यात आले.

८. राष्ट्रीय तपासणी आणि देखरेख समितीची पुनर्रचना करण्यात आली आणि अल्ट्रा साउंड डायग्नोस्टिक सुविधांची तपासणी जलद करण्यात आली.

९. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत कायद्याच्या अंमलबजावणीसाठी, माहिती, शिक्षण आणि संपर्क अभियानासाठी सरकार राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना आर्थिक सहाय्य देत आहे.

१०. भृणहत्येची कारणे शोधण्यासाठी, योग्य वर्तणूक बदल पोहोच मोहीम तयार करण्यासाठी आणि पीसी आणि पीएनडीटी कायद्याच्या तरतुदींची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी राज्यांना कमी लिंग गुणोत्तर असलेले जिल्हे व गावे यांच्याकडे विशेष लक्ष देण्याची सूचना देण्यात आली आहे.

११. लिंग गुणोत्तर आणि मुलींवरील भेदभावाविरुद्धच्या मोहिमेत धार्मिक नेते आणि महिलांचा सहभाग आहे.

१२. भारत सरकार आणि अनेक राज्य सरकारांनी समाजातील मुली आणि महिलांचा दर्जा सुधारण्यासाठी विशेष योजना लागू केल्या आहेत. यामध्ये धनलक्ष्मीसारख्या योजनेचा समावेश आहे.

***संदर्भ ग्रंथ:***


*१. भांडारकर, पी.एल., सामाजिक संशिधान पद्धती, दहासन प्रकाशन, नागपूर, १९७६.*

*२. आगलावे प्रदीप, सामाजिक संशोधन पद्धती आणि तंत्रे, साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००२.*

*३. यादव रामजी, समाजशास्त्रीय पद्धतियां, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, अन्सारी रोड, दरियागंज, नई दिल्ली.*

*४. सोमण माधव शंकर, सामाजिक संशोधनाची तंत्रे, पुणे विध्यार्थी गृह प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे.*

*५. आगलावे प्रदीप, आगलावे सरोज, भारतीय समाजः संरचनात्मक प्रश्न आणि समस्या, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.*

*६. भारंबे एस.एन., जावळे साधना, स्त्री भ्रुण हत्या आणि स्त्रियांवरील वाढते अत्याचार, प्रशांत पब्लिकेशन प्रताप नगर.*

*७. सोनवने व्ही.वाय., उपाडे जि.एम., स्त्री भ्रुण हत्या एक सामाजिक समस्या, प्रशांत पब्लिकेशन प्रताप नगर, ज्ञानेश्वर मंदिर रोड, नूतन मराठा कॉलेज जवळ, जळगाव, महाराष्ट्र.*

*९. www-ncbi-nlm-nih-gov/pubmed/ 20879612*

*१०. www-indiacelebrating-com/essay/female&foeticide&essay*

*११. www.unicef-in/PressReleases//227Female&foeticide&in*

# पर्यावरण प्रदुषण : एक ज्वलंत जागतिक समस्या

***प्रा. डॉ. रामू हिरामणजी उईके,*** *समाजशास्त्र विभाग प्रमुख, शरदचंद्र कला-वाणिज्य महाविद्यालय . बुटीबोरी, नागपूर*

**प्रस्तावना:** जगामध्ये पर्यावरणाच्या अध्ययनास फार महत्व प्राप्त झाले आहे. पर्यावरण हा शब्द जगाच्या जिव्हाळयाचा शब्द झाला आहे. पर्यावरणाचे अध्ययन भूगोल विषयात केले जात होते आणि आहे. परंतु अलीकडे वैद्यकशास्त्रात पर्यावरणीय आरोग्य आणि अभियांत्रिकी शाखेत पर्यावरणीय अभियांत्रिकी, औद्योगिक क्षेत्रात पर्यावरणीय अध्ययन तर सद्याच्या स्थितीत आर्थिक पर्यावरण, सामाजिक पर्यावरण इत्यादी शाखांद्वारे पर्यावरणाचे अध्ययन केले जाते. अशाप्रकारे सद्या पर्यावरण ही संज्ञा बहुचर्चित झाली असून तो संशोधनाचा आणि चिंतेचा प्रमुख विषय बनला आहे.

**प्रदुषणाची संकल्पना:** पर्यावरण प्रदुषणाची अत्यंत ज्वलंत समस्या संपूर्ण जगामध्ये निर्माण झाली आहे. याला भारत देखील अपवाद नाही. आज प्रदुषणाची समस्या ही विकासाच्या प्रक्रियेमुळे निर्माण झाली आहे. पूर्वी पर्यावरण प्रदुषणाची समस्या नव्हती. अनियंत्रित लोकसंख्या वाढ, औद्योगिकरणाचा परिणाम, जमिन, जंगल, नदी, हवा, पाणी व मानव यांच्यातील समतोल केव्हा व कसा ढासळला हे मानवाच्या लक्षातही आले नाही.

अतिवृष्टी, अवर्षण, वादळे, वणवे, त्सूनामी इत्यादी घडामोडींमुळे देखील हवेचे प्रदुषण होते. याला नैसर्गिक प्रदुषण असे म्हटले जाते. यावर निसर्गत:च उपाययोजना होत असतात. मानवाच्या अतिलोभापायी मोठ्या प्रमाणात पर्यावरण पदुषण होत आहे. अविचाराने मोठ्या प्रमाणात नैसर्गिक साधनसंपत्तीची नासधुस केली जाते. यामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडले. पर्यावरणाच्या अनुषंगाने ज्या परिसंस्था निर्माण झाल्या आहेत, त्यांचेही संतुलन बिघडते आणि पर्यावरण दुषित केले जाते. ज्या घटकांद्वारा पर्यावरण दुषित केले जाते त्यांना दुषितके असे म्हणतात. दुषितकांद्वारा जेव्हा पर्यावरण दुषित होऊन मानव व पर्यावरणाचा तोल ढासळतो तेव्हा त्या क्रियेला प्रदुषण असे म्हणतात.

मानव आणि त्यांच्या सभोवती असणारे पर्यावरण यांचे अतुट नाते आहे. मानव आणि सर्व सजीव सृष्टी पर्यावरणाशी या ना त्या नात्याने घनिष्ठ संबंधित झालेली आहेत. निसर्गातील हवा, पाणी, वृक्ष, वनस्पती, जमिन, पशुपक्षी आणि मानवप्राणी यांच्या परस्पर नात्यात जेव्हा नैसर्गिक समतोल असतो तेव्हा पर्यावरण संतुलित आहे असे म्हटले जाते. नैसर्गिक पर्यावरण हा सजीवांसाठी अनमोल ठेवा असतो. या ठेव्याच्या वारसा हक्कांचे संरक्षण, जतन करणे ही मानवी पिढ्यांची जबाबदारी आहे. या जबाबदारीत मानवाच्या हस्तक्षेपामुळे तफावत निर्माण होते आणि पर्यावरणाचे संतुलन बिघडते.

**प्रदुषणाची व्याख्या:** निसर्गाने आपल्याला निर्मळ आकाश दिले. सुंदर प्रकाश दिला. कोमल चंद्र दिला. विलोभनीय वनस्पती दिली. खळखळते पाणी दिले मात्र त्यात आपण विष कालवले असा प्रदुषणाचा साधा, सोपा आणि सरळ अर्थ आहे. विश्वकोषानुसार, 'मानवी जीवनाच्या, दृष्टिकोनातून नैसर्गिक घटकांमध्ये होणारा अपायकारक बदल म्हणजे प्रदुषण होय.' तर संयुक्त संस्थांच्या राष्ट्राध्यक्षांच्या वैज्ञानिक सल्लागार समितीनुसार, 'मानवी क्रियांनी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीने परिसरातील प्राकृतिक, रासायनिक व जैविक घटकांमध्ये मोठ्या प्रमाणावर होणारे अनिष्ट बदल म्हणजे प्रदुषण होय.'

**पर्यावरणातील प्रदुषके:** ज्या प्रकारे वस्तू किंवा त्यांच्या अस्तित्वामुळे पर्यावरणाचे अध:पतन होते. अशांना प्रदुषके असे म्हणतात. प्रदुषके ही नैसर्गिक व मानवनिर्मित असतात. नैसर्गिक प्रदुषके ही निसर्ग नियमानुसार कालांतराने नाहीशी होतात पण मानवनिर्मित प्रदुषके ही नाहीशी होत नसून ती घातक असतात. प्रदुषकाचे दृष्य आणि अदृष्य असे दोन प्रकार पडतात. दृष्य प्रदुषकांमध्ये धूर, वायू, धुळ, दुषित पाणी, मैलमिश्रित पाणी, कचरा, शेण, मानवी वापराच्या सडलेल्या वस्तू इत्यादींचा समावेश होतो तर अदृष्य प्रदुषकांत विविध प्रकारचे जीवाणू तसेच पाण्यात, जमिनीत मुरलेली व विरघळलेली रसायने इत्यादींचा समावेश होतो.

तसेच स्वरुपानुसार प्रदुषकांचे खालील सहा प्रकार आहेत.

१) घन :औद्योगिक कचरा, अस्वेस्टॉस, पारा, शिसे.

२) द्रव: समुद्र, पाण्यातील गळलेला पेट्रोलियम, सांडलेले अमोनिया क्लोराईड, वगैरे.

३) वायू : क्लोरो-फ्लुरोकार्बन, कार्बनडाय ऑक्साईड, सल्फरडाय ऑक्साईड, वगैरे.

४) नैसर्गिक : विविध वायू, द्रव व घन प्रदुषके.

५) सांस्कृतिक : प्रचंड लोकसंख्या, गरिबी, गुन्हेगारी, श्रीमंती, मागासलेपणा.

६) सजीव प्रदुषके : टोलधाड, तांबेरा, बुरशी, मावा, इत्यादी.

शरीराच्या रोगप्रतिबंधक नैसर्गिक शक्तींवर आघात करणारे ताण-तणाव, निकृष्ट आहार, हवेमध्ये तरंगणारे घटक, कारखान्यामध्ये वापरली जाणारी रसायने इत्यादी कारणांमुळे N.H.L. ची सुरुवात होते. नॉन-हॉजकिन्स लिम्फोमा (NHL) वाढत जातो आणि नैसर्गिक वातावरणात विष कालविल्या जाते.

**प्रदुषणाचे प्रकार:** पर्यावरण प्रदुषण हे सार्वत्रिक स्वरूपाचे आहे. विश्वातील असा एकही क्षेत्र नाही की जेथे प्रदुषण नाही. प्रदुषणाचे विविध प्रकारे वर्गीकरण केले जाते. परंतु पर्यावरणात्मक प्रदुषणाने सर्वात महत्वाचे आणि सर्वसमावेशक वर्गीकरण पुढीलप्रमाणे आहे.

१) **वायू प्रदुषण:** पृथ्वी सभोवती पसरलेल्या वातावरणात विविध वायूंचे मिश्रण आहे. साधारणपणे नायट्रोजन, ऑक्सीजन, कार्बनडाय ऑक्साईड, पाण्याची वाफ व इतर काही अल्प प्रमाणातील वायूंचे विशिष्ट प्रमाणात अस्तित्व असते. सजीवांसाठी हवेतील हे वायू घटक अत्यावश्यक असतात. म्हणूनच जीवसृष्टीचे संरक्षणक्षेत्र असाच वातावरणाचा उल्लेख करता येईल. परंतु नैसर्गिक कारणांमुळे व मानवी हस्तक्षेपामुळे वायू प्रदुषण सतत वाढत आहे. नैसर्गिक कारणांमुळे निर्माण झालेला वायू प्रदूषणाचे परिणाम त्या भागातच जाणवतात. कालांतराने ते नाहीसे देखील होतात. परंतु मानवनिर्मित ह्या प्रदुषणाचे परिणाम हे सर्वदूर पसरत जातात आणि त्याचे प्रमाण

उत्तरोत्तर वाढत जातात. वायू प्रदुषणाची समस्या ही प्राचीन काळापासून आहे. इ.सन. १३०६ साली इंग्लंडमध्ये लंडन या शहरात कोळसा वापरावर बंदी घातली आहे. वाहने आणि औद्योगिक उत्पादने यामुळे होणारे वायू प्रदुषण हे साधारणत शहरे आणि औद्योगिक भागातील लोकांच्या आरोग्यावर परिणाम करते तर ग्रामीण भागातील वायू प्रदुषण हे बऱ्याच प्रमाणात स्त्रियांवर परिणाम करीत असते. कारण घरगुती वापरासाठी लाकुडफाटा, शेण्याच्या गोवऱ्या जळतांना जो धूर निर्माण होतो त्याचा प्रत्यक्ष संबंध हा महिलांशी येत असतो.

२) **जलप्रदुषण:** मानवाच्या मूलभूत गरजांमध्ये पाण्याचा उल्लेख केला जातो. जल म्हणजे जीवन, मानवी जीवनात पाण्याला अत्यंत महत्व आहे. मानवास केवळ पिण्यासाठीच नाही तर स्वच्छता, जलसिंचन अनेक औद्योगिक प्रक्रिया इत्यादीसाठी पाण्याची नितांत आवश्यकता आहे. वाढत्या लोकसंख्येनुसार आणि उद्योगधंद्यानुसार गोड्या पाण्याची मागणी वाढत आहे. भूपृष्ठावरील उपलध असलेल्या पाण्याची टक्केवारी काढली असता असे दिसून येते की, एकुण पाण्यापैकी ९७.२ टक्के पाणी महासागरात आहे. फक्त २.८ टक्के पाणी गोड किंवा स्वच्छ आहे. ज्या पाण्यात कोणताही बाह्य अपायकारक घटक मिसळलेला नसतो, त्या पाण्याला शुद्ध पाणी म्हटले जाते. ते पाणी वापरसाठी उपयुक्त आणि सुरक्षित असते. ज्या पाण्यात सूक्ष्म जीवाणू किंवा मृत जैविक घटक मिसळलेले असतात त्या पाण्याला दुषित पाणी म्हणतात. असे पाणी वापरण्यासाठी अयोग्य असते. जगातील जवळपास २८ टक्के गावे आणि शहरे काठावर समुद्र, तळी, सरोवरे इत्यादी जलसाठ्याच्या सानिध्यात वसलेले आहे. माणसांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठी करण्यापासून तर त्यांनी केलेली सर्व प्रकारची घाण वाहून नेण्यापर्यंतची असंख्य कामे या पदांना करावी लागतात. तसेच अनेक प्रकारचे कारखाने आणि गिरण्या त्यांना नको असलेली निरूपयोगी पदार्थ व गाळ नद्यांच्या पात्रात सोडत असतात. अशाप्रकारे पाण्याचे प्रदुषण होत असते.

३) **ध्वनीप्रदुषण:** ध्वनी प्रदुषण ही मानवनिर्मित समस्या आहे. पूर्वी ध्वनी प्रदुषणाची समस्या नव्हती. परंतु आधुनिक काळात ध्वनी प्रदुषणाची गंभीर समस्या निर्माण झाली आहे.

मानवाची कर्णेद्रिये विविध क्षमतेपर्यंत ध्वनचा आघात सहन करु शकतात. ज्या तीव्र आवाजाने मानवाच्या शारीरिक, मानसिक स्वास्थ्यावर विपरीत परिणाम होतो आणि जो कर्कश आवाज मानवी श्रवणाच्या सहनशीलतेच्या पलीकडे जातो.

तसेच पर्यावरणात कर्णेद्रियाच्या क्षमतेपेक्षा मोठा ध्वनी किंवा गोंगाटा निर्माण होतो त्याला ध्वनी प्रदुषण म्हणतात. अशाप्रकारे नकोसा वाटणारा आवाज म्हणजे गोंगाट, त्यात नादमाधुर्य नसते तो कर्णकठोर व विसंवादी आवाज असतो गोंगाट त्रासदायक, संतापजनक, दुःखजनक, निद्रानाशक असतो. गोंगाटामुळे चित्त विचलीत होते. एकाग्रता भंग पावते व कार्यात अडथळा येतो.

मोठ्या आवाजातील मानवी संभाषण, सांस्कृतिक कार्यक्रमातील वाढवलेला आवाज, टेप रेकॉर्ड, नाचण्याचे कार्यक्रम, वाहनांचा आवाज, भोंगे कारखान्याचा आवाज, रेल्वेगाड्यांचा सतत आवाज, फेरीवाले, छापखाने, मिरवणुकी, स्वयंपाक घरातील आवाज, जेट विमाने, बॉम्बस्फोट व सुरुंगस्फोटाद्वारे निर्माण होणाऱ्या तीव्र लहरी इत्यादी.

४) **मृदा प्रदुषण:** भूमी ही नैसर्गिक साधन संपदा आहे. जमिनीचे क्षेत्र मर्यादित असल्यामुळे तिचा कोणत्याही प्रकारे केला जाणारा गैरवापर ही फार मोठी समस्या निर्माण करु शकते. जमिनीच्या निर्मितीत हजारो वर्षाचा कालावधी लागतो. त्यामुळे जमिनीचे संरक्षण करणे ही काळाची गरज आहे. मृदा हा पर्यावरणाचा एक महत्त्वाचा घटक आहे. हा घटक सुरक्षित राहील्यास पर्यावरणातील सर्व गोष्टी सुरळीत होऊ शकतात. मृदेवर अनेक गोष्टी अवलंबून आहेत. जसे निवास व्यवस्था, अन्नधान्य उत्पादन, पाणी, संचय, वृक्षसंपदा, पर्यावरण संतुलन इ. भूकंप, ज्वालामुखी, पूर, वारा या नैसर्गिक घडामोडींमुळे फार मोठे बदल घडून येतात. तसेच मानवनिर्मित घडामोडींमुळे देखील मृदेचे प्रदुषण झपाट्याने होत आहे. जसे वाढती लोकसंख्या, नागरीकरण, औद्योगिकरणासाठी होत असलेली वृक्षतोड यामुळे जमिनीचे संतुलन बिघडते. शेतीत वापरली जाणारी रासायनिक खते व किटकनाशके यामुळे दिवसेंदिवस जमिनीच्या प्रदुषणाची समस्या गंभीर रूप धारण करीत आहे. याशिवाय कारखान्यातील टाकाऊ पदार्थ, नागरी घन कचरा जमिनीवर टाकण्यात येणारा पारा, शिसे, कॅडामियम, क्रोमोनियम वगैरे अविघटनशील तुकडे व अनुकंद्रतील किरणोत्सर्गी सल्फेट, कोर्बोनेट, थायनाईड, फेनॉल इ. रासायनिक पदार्थांचा समावेश होतो. यामुळे मातीतील वनस्पती व जीवजंतू मरतात आणि जमिन नापिक बनते.

५) **अवकाश प्रदुषण:** खगोलशास्त्राच्या जिज्ञासेतून अवकाशाचे ज्ञान मिळण्यास मदत होते. अवकाश म्हणजे ज्यामध्ये आपली पृथ्वी, सूर्य, सूर्यमालेतील अन्य सर्व ग्रह, तारे व आकाशगंगा ह्या सर्व गोष्टी आकाशात तरंगत आहेत असे दिसून येते या पोकळीलाच अवकाश असे म्हणतात. वैज्ञानिक तंत्रज्ञानाच्या विकासामुळे अवकाशत जाऊन पाहणे मानवाला शक्य झाले आहे.

विश्वाच्या निर्मितीचे रहस्य जाणून घेण्याची मानवाची महत्वाकांक्षा आहे. या महत्वाकांक्षेच्या पूर्तीसाठी वैज्ञानिकांची सतत धडपड सुरु आहे. चंद्र व मंगळावर मानवाच्या वसाहती स्थापन करणे, पृथ्वीप्रदक्षिणा, अंतराळप्रवास याबाबत पर्यटकांची हौस पूर्ण करणे या दिशेने वैज्ञानिक व तंत्रज्ञानाचे प्रयत्न सुरु आहेत. या प्रयत्नामुळे मानवाचे अवकाशातील हस्तक्षेप मोठ्या प्रमाणात वाढत आहे. यामधूनच अवकाश प्रदुषणाची समस्या निर्माण झाली आहे.

**प्रदुषणाचे परिणाम:** पर्यावरणातील प्रदुषणाचा अत्यंत प्रतिकुल परिणाम म्हणजे नैसर्गिक असंतुलन निर्माण झाले आहे. त्याचा जीवसृष्टीवर देखील वाईट परिणाम होत आहे. तसेच मानवसमाजावर सुद्धा पर्यावरण प्रतिकुल परिणाम झालेला आहे. पर्यावरण प्रदुषणाचे दूरगामी होणारे परिणाम ठळकपणे पुढीलप्रकारे दर्शविलेले आहेत.

१) **वातावरणातील परिणाम:** पर्यावरण प्रदुषणाचा दूरगामी परिणाम वातावरणावर झाला आहे. या वातावरणातील प्रामुख्याने अनिष्ट परिणाम झाले व होत आहेत. वातावरणातील कार्बनडाय ऑक्साईड व हरितगृह वायुंचे प्रमाण वाढत असल्यामुळे पृथ्वीचे तापमान दिवसेंदिवस वाढत आहे. ओझोन थर पृथ्वीरील सर्व जीवसृष्टीचे सूर्याच्या अत्यंत प्रखर अतिनील किरणांपासून संरक्षण करतो परंतु पर्यावरण प्रदुषणामुळे ओझोन थराला छिद्रे पडले आहेत. त्यामुळे

पृथ्वीवरील मानवसहित सर्व सजीव सृष्टिच्या अस्तित्वालाच धोका निर्माण झाला आहे.

२) **वनस्पतीवरील परिणाम:** पर्यावरण प्रदुषणामुळे वनस्पतीवर परिणाम होतो. हवेतील कणरुप प्रदुषके वनस्पतींच्या पानांवर पसरल्याने त्याची श्वसन क्रिया मंदावते आणि ऑक्सीजनची निर्मिती पाहिजे तेवढ्या प्रामणात करु शकत नाही. तसेच वृक्ष-वनस्पतींची वाढ खुंटते. आम्लपर्जन्य वनस्पतींना घातक आहे. त्यातील गंधकाम्लामुळे वनाचा नाश होतो.

३) **प्राण्यावरील परिणाम:** पर्यावरण प्रदुषणामुळे प्राणी जीवनावर विपरीत परिणाम होतो. पर्यावरणातील दुषित गवत, झाडाची पाने, फुले, मुळे वगैरे जनावरांनी खाल्याने त्यांना विषबाधा होते आणि वन्यप्राणी, पक्षी व पाळीव प्राणी यांच्या मृत्युचे प्रमाण वाढत आहे.

४) **जनपरिसंस्थेवरील परिणाम:** पाण्यातील प्रदुषणामुळे जलपरिसंस्थेवर परिणाम होतो. पाण्यातील प्राणवायू वाढविणाऱ्या वनस्पती सूक्ष्मजीव त्यावर जगणारे मासे, तसेच त्यावर जगणारे पशुपक्षी व इतर जीव यांची अन्न साखळी नाश पावते. भारतात नद्यांच्या संगमावर अनेक तिर्थक्षेत्रे आहेत. त्याठिकाणी लाखो भाविक स्नान करतात, कपडे धुतात, जनावरे धुतात तसेच औद्योगिकरणाद्वारे सोडलेले सांडपाणी यामुळे पाणी दुषित होऊन त्यात सूक्ष्मजीवजंतूंची प्रचंड प्रमाणात वाढ झाल्यामुळे तसेच प्रदुषित पाण्यात शेवाळाची वेगाने वाढ होते. पाणवनस्पती व जलपर्णी यांचीही वाढ होते. तसेच पाण्यातील ऑक्सीजन त्यांना भरपूर प्रमाणात लागते आणि जलचर प्राण्यांना ऑक्सिजन कमी पडत असल्याने त्यांचा मृत्यू होतो.

५) **जमिनीच्या उत्पादन क्षमतेवरील परिणाम:** जमिन प्रदुषणाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. याचे विपरीत परिणाम जमिनीवर होऊन प्रदुषणाची समस्या निर्माण होते. किटकनाशके, जंतुनाशके आणि तणनाशकांच्या वापरामुळे मातीतील विघटनकारी व मातीची सुपिकता वाढविणारे सूक्ष्म जीवाणू नष्ट होतात. मृदाकण विस्कळीत होतात. त्यामुळे मृदेची झील झपाट्याने होते. जमिनीची सुपिकता नष्ट होऊन कालांतराने जमिन ओसाड बनते. अर्थात जमिनीची उत्पादन क्षमता कमी होते. त्यामुळे शेती उत्पादनात घट होऊन अन्नधान्याची कमतरता निर्माण होते.

६) **मानवाच्या आरोग्यावरील परिणाम:** पर्यावरणातील प्रदुषणाचा फार मोठा दुष्परिणाम मानवाच्या आरोग्यावर पडतो. वातावरणातील दुषित हवा शरीरात गेल्यास फुफ्फुसे, नाक, कान, घसा, रक्ताभिसण इत्यादीचे विकार जडतात. दुषित पाण्यामुळे साथीचे रोग, पचनसंस्थेत बिघाड, अतिसार, कावीळ, कॉलरा, विषमज्वर इ. रोग जडतात. विविध रसायनामुळे दमा, कॅन्सर, रक्ताक्षय होतो. परायुक्त पाण्यामुळे चेतनसंस्थेचे विकार, त्वचारोग, अर्धांगवायू, वेडसरपणा, अपंगत्व येते, ध्वनीप्रदुषणामुळे मानवी आरोग्यात बिघाड होतो.

**पर्यावरण नियंत्रणाचे उपाय:** पर्यावरण प्रदुषणाचे मानवासहित सर्वच सृष्टिवर अतिशय गंभीर स्वरूपाचे परिणाम होत आहेत. याचा उगम विविध मार्गाने होत आहे. उदा. वायुप्रदुषण, भूमी प्रदुषण, जलप्रदुषण इ. प्रकारच्या प्रदुषणाचा जीवसृष्टीवर वाईट परिणाम पडला आहे. यापासून बचाव करण्यासाठी पर्यावरणाचे संवर्धन करणे आवश्यक आहे. यासाठीचे उपाय पुढीलप्रमाणे आहेत.

१) **वृक्ष व वनस्पतीचे संवर्धन:** वायुप्रदुषण हे मानवासाठी घातक आहे. तेव्हा वायूप्रदुषण रोखण्यासाठी वृक्ष व वनस्पती यांचे मोठ्या प्रमाणात संवर्धन करणे गरजेचे आहे. कारण वृक्ष व वनस्पती हे वायूप्रदुषणाचे नैसर्गिक नियंत्रक आहेत. म्हणून वृक्षतोडीवर निर्बंध घालून औद्योगिक क्षेत्रात, कारखान्याला लागून तसेच शहराच्या परिसरात रस्त्याच्या आजूबाजूला वृक्षारोपण करून त्यांचे संवर्धन करणे आणि वनिकरणाला प्रोत्साहन देणे ही आजच्या काळाची गरज आहे.

२) **दुषित पाण्याचे शुद्धीकरण:** शहरामधील सांडपाणी आणि इतर टाकावू पदार्थ नदीनाल्यात सोडण्यापूर्वी त्यावर प्रक्रिया करुन त्यातील अशुद्ध घटक बाजूला ठेवावे आणि शुद्ध झालेले पाणी सिंचन करावे. याविषयाची प्रक्रिया नागपूर शहरात केली जात आहे. तसेच कारखान्यातील प्रदुषीत पाण्याचे शुध्दीकरण करणे गरजेचे आहे. कारण त्यात पारा, शिसे, रसायने, क्षार इत्यादी असतात. ती वेगळी करण्याची प्रक्रिया करणे हे उद्योगाना बंधनकारक असले पाहिजे तसेच घनकचरा जलाशयामध्ये न सोडता तो खोल खड्डयामध्ये पुरणे हे बंधनकारक असले पाहिजे.

३) **कारखान्यावर प्रदुषण विरोधी योजना बंधनकारक करणे:** कारखान्यातील धुरांडी तसेच स्वयंचलित वाहनांची उत्सर्जके यांना बसवलेली गाळणे ही धुराडयांवाटे कणरुप पदार्थ अडकतील अशी असावी. धुरांडयाची उंची वाढविल्यास धूर उच्च वातावरणात जाईल आणि निदान खालच्या थरात हवेचे प्रदुषण कमी होईल. यामुळे लोकांच्या श्वसनाला त्रास होणार नाही. याकरिता कारखान्यावर प्रदुषणविरोधी योजना बंधनकारक करावी.

४) **जलशुद्धीकरण योजना राबविणे:** पाणी हे जीवन आहे. जीवनच प्रदुषित असेल तर मानवाच्या आयुष्यावर प्रश्नचिन्ह निर्माण होते. अर्थात याचे विपरीत परिणाम संपूर्ण जगासमोर निर्माण झाले आहे. याची खानेवारी पाहली असता, असे दिसून येते की, जगातील एकुण लोकसंख्येपैकी सुमारे १०० कोटी लोकांना पिण्याचे स्वच्छ पाणी मिळत नाही. विकासाच्या उंबरठ्यावर असलेल्या देशात तर स्वच्छ पाण्याअभावी कोट्यावधी लोक आजारी पडतात. प्रदुषित पाण्यामुळे दरवर्षाला सुमारे ३ दशलक्ष मुले मरतात तर सुमारे ९० कोटी लोकांना पोटाचे विकार जडतात. कॉलरा, गॅस्ट्रो असे रोग होऊन लाखो लोक मृत्युमुखी पडतात. तेव्हा जलप्रदुषणाच्या परिणामापासुन लोकांना वाचविण्यासाठी जलप्रदुषणाच्या नियंत्रणाचे उपाय पुढीलप्रमाणे आहे. - १. जलप्रदुषणाची समस्या ही वैयक्तिक बाब नसून ती प्रादेशिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाब असल्यामुळे यासाठी सामुदायिक प्रयत्न करणे गरजेचे आहे. २. शहरातील सांडपाणी, टाकाऊ पदार्थ व विसर्जित केलेली घाण नदी, नाल्यात किंवा समुद्रात सोडण्यापूर्वी त्यावर संस्करण प्रक्रिया केल्यानंतर ते सोडावे तसेच संयत्राकरिता सरकारने पुरेसा फंड उपलब्ध करुन द्यावा. ३. धार्मिकदृष्ट्या निर्माण होणारे जलप्रदुषण जसे उत्साहाच्या मुर्ती, निर्माल्य तसेच मृतजनावरे हे ह्या गोष्टी तलावात, नदीत, विहिरीत इ. ठिकाणी टाकल्या जावू नये यासाठी लोकशिक्षणातून व्यापक स्तरावर जनजागृती करणे. ४.

कारखाने, उद्योगातील प्रदुषके रोकण्यासाठी जलशुध्दिकरण प्रक्रिया संयत्रे उभारून तो कार्यवाहीत ठेवावीत. ५. सागरांमध्ये तेल गळती होणार नाही याची दक्षता घ्यावी. ६. अन्नधान्य उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी शेतीत सेंद्रिय आणि रासायनिक खतांचा समतोल असावा. ७. सरकारने जलप्रदुषणाची कडक निर्बंध लावून त्याची योग्य ती अंमलबजावणी करणे. ८. पाणी शुद्धिकरणाच्या नवनविन उपायांसाठी वारंवार संशोधन व्हावयास हवे. ९. जलप्रदुषण नियंत्रणाची माहिती देऊन तसेच पाण्याचे महत्व काटकसर, पाणी प्रदुषणाची कारणे, प्रकार व त्यावरील उपाय या विषयी समजजागृती करणे गरजेचे आहे.

अशाप्रकारे सामुदायिक प्रयत्न केल्याने जलप्रदुषणाच्या समस्येचे निराकरण होऊ शकते.

१) **रासायनिक खते व किटकनाशकांचा वापरावर मर्यादा घालणे:** रासायनिक खते व किटकनाशकांचा अतिवापरामुळे शेतजमिनीच्या गुणवत्तेवर फरक पडून ते नापिक होते. विषारी जंतुनाशकाच्या अतिवापरामुळे एकीकडे शेतजमिनीचे उत्पादन क्षमता कमी होत जाते तर दुसरीकडे हे सर्व पदार्थ मानवी आरोग्याच्या दृष्टिनेही घातक असतात. अशाप्रकारची घातकता टाळण्यासाठीचे नियंत्रक उपाय पुढीलप्रमाणे आहेत. - १. रासायनिक खते व किटकनाशकांचा वापर कमी करुन त्याएवजी नैसर्गिक खते व किटकनाशकांचा वापर वाढवावा. २. शेतीतील काडीकचरा, तण, सड इत्यादींपासून कंपोस्ट खत तयार करावे. ३. जनावरांपासून तयार झालेलया शेणखताचा वापर करावा. या नैसर्गिक खताचा वापर हा शेतीसाठी विकास उत्पन्न झालेल्या अन्न-धान्याची सकसता वाढेल आणि मानवाचे आरोग्य देखील सुदृढ राहील. ४. रासायनिक खते व किटकनाशकाच्या अतिवापरामुळे अन्नधान्याची तात्पुरती वाढ होते पण त्यात सकसता नसते. ५. फळांवर किटकनाशकांचा फवारा केल्याने फळे विषारी बनतात. अशा फळांच्या सेवनाने विषबाधा होण्याची शक्यता असते. ६. शेतीत वापरली जाणारी रासायनिक खते व किटकनाशके यामुळे दिवसेंदिवस मृदा प्रदुषणाची समस्या गंभीर रुप धारण करीत आहे.

अशाप्रकारे रासायनिक खते व किटकनाशकांच्या अतिवापरामुळे होणारी हानी लक्षात घेऊन जनजागृती करणे आजच्या काळाची गरज आहे.

१) **अपारंपारिक सौर उर्जेचा वापर करणे:** सौरउर्जा हे महत्वाचे अपारंपारिक उर्जा संसाधन आहे. सौर उर्जा सूर्यकिरणापासून सहज आणि मुबलक प्रमाणात पृथ्वीवर उपलब्ध होते. पृथ्वीपासून अंदाजे वय करोड कि.मी. वर असलेला सूर्य एक तप्तगोळा असून उदजन (६०%) आणि हिलीयम (२८%) ह्या मुख्य मुलद्रव्यांचा बनलेला आहे. त्यांच्या केंद्रीय भागाचे तापमान १.५ x १०⁷ केल्वीन आहे. आण्विकमुळे सूर्यावरील उदजन (Fusion) वायुंचे सतत हिलीयम वायुमध्ये रुपांतर होऊन ह्या क्रियेत प्रचंड उर्जा उत्सर्जित होते. तेव्हा उर्जेच्या विद्युत चुंबकीय लहरी आणि भारित कणांच्या स्वरुपात किंरणांद्वारे पृथ्वीवर पोहचतो यामुळे पृथ्वीला उष्णता आणि प्रकाश मिळतो. यामुळेच परिसंस्थेतील सर्व सजीव जगत आहेत. सौरउर्जेचा वापर अमेरिका, जपान, इस्त्राईल इत्यादी देशात औद्योगिक व घरगुती वापरसाठी केला जातो तसेच भारतातील राजस्थान व आंध्रप्रदेशात कृषी व घरगुती कार्यात व्यापक प्रमाणात वापरला जातो. या उर्जेच्या वापरामुळे कोणत्याही प्रकारचे प्रदुषण नसल्यामुळे त्याचा वापर करणे कसे गरजेचे आहे ते पुढीलप्रमाणे- १. पृथ्वीवरील सर्व जीवसृष्टी सौर ऊर्जेमुळे विकसित झाली आहे आणि जगत आहे. २. सौरऊर्जेचा वापर विद्युत उत्पादनासाठी, सौर उपकरणांद्वारे गरम पाणी आणि भोजन मिळविण्यासाठी होतो. ३. सौरऊर्जा ही सूर्यापासून मिळणारी अखंड ऊर्जा पारंपारिक आणि क्षयी ऊर्जा संसाधनाऐवजी वापरता येणे शक्य आहे. ४. सौरऊर्जेचा उपयोग औद्योगिक आणि घरगुती क्षेत्रात करता येते. त्यासाठी ऊर्जा संग्रहित करणे, वाहून नेणे इत्यादीसाठी तंत्राचा व उपकरणाचा विकास होणे गरजेचे आहे. ५. अपरंपरागत सौर ऊर्जेसाठी अपरंपरागत इंधनाच्या संशोधनावर भर देण्यात आला पाहिजे.

१) **पर्यावरण कायद्याची योग्य अंमलबजावणी करणे:** पर्यावरण संतुलनासाठी आणि प्रदुषण रोखण्यासाठी भारत सरकारने वेळोवेळी अनेक कायदे केले आहेत. जसे पर्यावरण संतुलनासाठी भारत सरकारने १९५२ मध्ये वननीती जाहीर केली. वन्यजीव संरक्षण कायदा १९७२, जलप्रदुषण बचाव व नियंत्रण कायदा १९८०, वायुप्रदुषण व नियंत्रण कायदा १९८१, राष्ट्रीय पर्यावरण निवाडा कायदा १९९५ आणि जीवविविधता कायदा २००२ इ. कायदे हे शासनाने पर्यावरण प्रदुषण रोखण्यासाठी केले आहेत. या सर्व कायद्यांची अंमलबजावणी झाल्यास पर्यावरण प्रदुषण रोखल्या जावू शकते.

२) **पर्यावरण शिक्षण व जनजागृती करणे:** वाढते पर्यावरण प्रदुषण रोखण्यासाठी जनजागृतीची गरज आहे. यासाठी सर्व प्रथम पर्यावरण शिक्षण दिले पाहिजे. यात पर्यावरणाचे महत्व व प्रदुषणामुळे होणारी हानी याविषयीचे शिक्षण सर्व पातळीवर दिले पाहिजे. पर्यावरण जर आपल्या घरापासुन सुरु होते तर त्याचे संरक्षण करणे आपले देखील कर्तव्य आहे. रोगाच्या साथींची ज्याप्रमाणे आपण स्वत: प्रतिबंधक उपाय करतो. तसे प्रयत्न आपण सभोवतालचे पर्यावरण स्वच्छ राखण्यासाठी केले पाहिजे. प्रसार माध्यमांचा यात सिंहाचा वाटा उचलता येईल. आपले प्रयत्न राजकीय, इच्छाशक्ती व प्रसारमाध्यमे, वर्तमानपत्रे, दूरदर्शन, रेडिओ इत्यादीच्या माध्यमातून संयुक्त विद्यमाने समाजात पर्यावरणाची चेतना यशस्वीपणे जागृत करता येईल.

***संदर्भ:***

१. *पर्यावरण शिक्षण, डॉ. भांडारकर, नूतन प्रकाशन, पुणे, १९९८.*
२. *Ethics of Ecology and Environment, S. Subbarao, Rajat Publication, New Delhi, 2001.*
३. *Environment Awarenesses Among Teacher: G. C. Pathan AIU, New Delhi, 1995.*
४. *पर्यावरण शिक्षण, गजानन पाटील, निराळी प्रकाशन, पुणे.*
५. *ग्रामगीता, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, दहावी आवृत्ती, १९९१.*
६. *भारतीय संस्कृती कोश, भारतीय संस्कृती कोश मंडळ, पुणे.*

# कोविड-१९ चा हातगाडी कामगारावरील सामाजिक परिणाम

*प्रा. प्रियंका राजेंद्र आठे, समाजशास्त्र विभाग, डॉ. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव.*

***सारांश:*** *कोविड १९ च्या काळात हातगाडी कामगार, रोजंदारीवर काम करणारे मजूर, नाका कामगार आणि किरकोळ व्यवसाय करून स्वतःचा उदरनिर्वाह करणारे यांची या संकटकाळात वाईट अवस्था झाली. टाळेबंदीमुळे अन्न आणि निवारा यांची भ्रांत निर्माण झाल्याने देशातील लाखो स्थलांतरित मजुरांनी आपल्या गावाकडच्या घराची वाट धरावी लागली. संघटित क्षेत्रात काम करणा-या कर्मचा-यांसमोरही रोजगाराचा प्रश्न उभा राहिला. आहे ती नोकरी हातातून जाण्याचे संकट त्यांच्यावर घोंघावत राहिले. अशा असंख्य समस्यांना कामगारांना सामोरे जावे लागले. या काळात या कामगार वर्गाला आर्थिक, सामाजिक, शारीरिक, मानसिक, कौटुंबिक अडचणीचा सामना करावा लागला.*

**प्रस्तावना:** या जगामध्ये मनुष्याने अनेक रोगांचा सामना केला आहे पण आज संपूर्ण जगभरात अशा व्हायरस ने थैमान घातला आहे कि ज्यामुळे संपूर्ण दुनियेची झोप उडाली आहे. लोकांच्या मनात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे, आणि जीवन जगणे सुद्धा कठीण झाले आहे, आणि या व्हायरसचे नाव आहे कोरोना व्हायरस. मागच्या तीन वर्षापासून कोविड-१९ ने जगभरात थैमान घातले. अनेकांचे व्यवसाय ठप्प झाले आहेत, लोक बेरोजगार झाले, उपासमारीची वेळ आली, प्रसंगी मृत्यूचा सामना करावा लागला. एवढेच नाही तर या काळात शिक्षण, आरोग्य क्षेत्राचे बाजारीकरण झाले. सामाजिक, राजकीय क्षेत्रात अनेक परीवर्तन झाले. या सर्व बाबीचे समाजाला दुष्परिणाम भोगावे लागले. तसेच या मध्ये अनेक लोकांचे व्यवसाय बंद झाल्यामुळे त्यांचे आर्थिक नुकसान झाले यात प्रामुख्याने हातगाडी कामगार होळपला गेला. कारण लोकांनी हातगाडी कामगारावरील मालावर बहिष्कार टाकला. त्यामुळे हा वर्ग डबघाईला आला आणि अनेक समस्यांचा या हातगाडी कामगार वर्गाला सामना करावा लागला.

वरील सर्व बाबीचा विचार केल्यावर सामाजिक घटका मधील अत्यंत महत्वाचा व छुपा कामगार वर्ग म्हणजे 'हातगाडी कामगार', या वर्गाने कोरोना काळात मोठ्या प्रमाणात आर्थिक, सामाजिक, शारीरिक, मानसिक, कौटुंबिक अडचणीचा सामना केला.

म्हणून या वर्गाचा अभ्यास करणे आवश्यक ठरले. वरील सर्व बाबीचा विचार करून ही समस्या निवडण्यात आली.

**अध्ययन क्षेत्र:** जळगाव शहरातील काही परिसर. (विशेष संदर्भ : हरीविठ्ठल नगर, विवेकानंद नगर, जळगाव.(

**संशोधन पद्धत:** संशोधन तथ्य संकलनासाठी मुलाखत अनुसूची व प्रश्नावली चा वापर केला.

**संशोधनाची उदिष्टे:** १) कोविड १९ चा हातगाडी कामगारावरील आर्थिक समस्यांचा अभ्यास करणे. २) कोविड १९ च्या काळातील हातगाडी कामगारांच्या शारीरिक, मानसिक स्थितीचा अभ्यास करणे. ३) कोविड १९ चा हातगाडी कामगाराच्या कौटुंबिक स्थितीचा अभ्यास करणे.

**संशोधन योजना:** बेंडाळे महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागातील विध्यार्थिनीनी वरील उदिष्टे निश्चित करून जळगाव शहरातील काही परिसर. (विशेष संदर्भ :- हरीविठ्ठल नगर, विवेकानंद नगर, जळगाव( अध्ययन क्षेत्र म्हणून निवडले. या अध्ययनात तथ्य संकलनासाठी मुलाखत, अनुसूची, प्रश्नावली या पद्धतीचा व संभव्यता नमुना निवड पद्धतीतील साधा याधृचीक या पद्धतीतील कोटा नमुना निवड या पद्धतीने ५० नमुन्याची निवड केली. नमुन्याकडून प्रत्यक्ष मुलाखत तंत्राचा अवलंब करून अनुसूची भरून घेतलेल्या माहितीच्या आधारे खालील निष्कर्ष मांडले गेले.

काही निवडक प्रश्नांचे विश्लेषण या ठिकाणी केले आहे :

**१.आर्थिक समस्यांचा अभ्यास:**

१. कोरोना काळात सरकार कडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीचा तुम्ही उपयोग करून करून घेतला का?

अध्ययनास निवडलेल्या ५० उत्तरदात्यापैकी, वरील प्रश्नाशी सहमत असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ३५ असून त्यांचे शेकडा प्रमाण ३५% आहे व वरील प्रश्नाशी असहमत असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ११ असून शेकडा प्रमाण ११ % तर यापैकी नाही उत्तराशी कोणीही सहमत असणाऱ्याची संख्या ०४% आहे.

**निष्कर्ष :-** वरील प्रश्नाशी सहमत असणाऱ्याची संख्या सर्वात जास्त ३५% आहे.

२. कोरोना काळात मालाला योग्य भाव मिळाला का ?

अध्ययनास निवडलेल्या ५० उत्तरदात्यांपैकी, वरील प्रश्नाशी सहमत असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ३६ असून त्यांचे शेकडा प्रमाण ३६% आहे व वरील प्रश्नाशी असहमत असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या १० असून शेकडा प्रमाण १०% तर यापैकी नाही उत्तराशी कोणीही सहमत असणाऱ्याची संख्या ०४% आहे

**निष्कर्ष :-** वरील प्रश्नाशी सहमत असणाऱ्याची संख्या सर्वात जास्त ३६% आहे.

३. कोरोनामुळे तुमचा माल तसाच पडून राहिला का ?

अध्ययनास निवडलेल्या ५० उत्तरदात्यांपैकी, वरील प्रश्नाशी सहमत असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ३१ असून त्यांचे शेकडा प्रमाण ३१ % आहे व वरील प्रश्नाशी असहमत असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या १९ असून शेकडा प्रमाण १९% तर यापैकी नाही उत्तराशी कोणीही सहमत नाही.

**निष्कर्ष :-** वरील प्रश्नाशी सहमत असणाऱ्याची संख्या सर्वात जास्त ३१% आहे.

**२.हातगाडी कामगारांच्या शारीरिक :-**

१. कोरोना काळात तुम्ही तुमची व कुटुंबाची काळजी कशी घेतली ?

अध्ययनास निवडलेल्या ५० उत्तरदात्यांपैकी, वरील मास्क वापरले होते का ? या प्रश्नाशी सहमत असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ०६ असून त्यांचे शेकडा प्रमाण ०६ % आहे व सोसीअल अंतर ठेवले का? या प्रश्नाशी सहमत असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ०६ असून त्यांचे शेकडा प्रमाण ०६% आहे. पौष्टिक जेवण घेतले होते का. या प्रश्नाशी सहमत असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ०७ असून त्यांचे शेकडा प्रमाण ०७ % आहे. नियमित व्यायाम केले का? या प्रश्नाशी सहमत असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ०५ असून त्यांचे शेकडा प्रमाण ०५% आहे बातम्या कमी पहिल्या का? या प्रश्नाशी सहमत असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ०९ असून त्यांचे शेकडा प्रमाण ०९ % आहे. व्हिटामिन च्या गोळ्या नियमितपणे सेवन केल्या का ? या प्रश्नाशी सहमत असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या १० असून त्यांचे शेकडा प्रमाण १०% आहे. कोरोना काळात घरीच थांबले होते का? या प्रश्नाशी सहमत असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ०७ असून त्यांचे शेकडा प्रमाण ०७% आहे.

**निष्कर्ष :-** बातम्या कमी पहिल्या का ? प्रश्नाशी सहमत असणाऱ्याची संख्या सर्वात जास्त ०९ % आहे.

२.कोरोना मुळे तुमच्या कुटुंबात कोणाचा मृत्यू झाला का?

अध्ययनास निवडलेल्या ५० उत्तरदात्यांपैकी, वरील प्रश्नाशी सहमत असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या १६ असून त्यांचे शेकडा प्रमाण १६ % आहे व वरील प्रश्नाशी असहमत असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ३४ असून शेकडा प्रमाण ३४% तर यापैकी नाही उत्तराशी कोणीही सहमत नाही.

**निष्कर्ष :-** वरील प्रश्नाशी सहमत असणाऱ्याची संख्या सर्वात जास्त १६% आहे.

३.कोरोना काळात रोग प्रतिकारक शक्ती वाढण्यासाठी तुम्ही उपाय केले का?

अध्ययनास निवडलेल्या ५० उत्तरदात्यांपैकी, वरील प्रश्नाशी सहमत असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ४० असून त्यांचे शेकडा प्रमाण ४० आहे व वरील प्रश्नाशी असहमत असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ०७ असून शेकडा प्रमाण ०७% तर यापैकी नाही उत्तराशी कोणीही सहमत असणाऱ्याची संख्या ०३% आहे.

**निष्कर्ष :-** वरील प्रश्नाशी सहमत असणाऱ्याची संख्या सर्वात जास्त २८ % आहे.

**३.मानसिक स्थिती:**

१. कोरोनाची तुम्ही मनात खूप भीती बाळगली का?

अध्ययनास निवडलेल्या ५० उत्तरदात्यांपैकी, वरील प्रश्नाशी सहमत असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या २८ असून त्यांचे शेकडा प्रमाण २८% आहे व वरील प्रश्नाशी असहमत असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या २२ असून शेकडा प्रमाण २२% तर यापैकी नाही उत्तराशी कोणीही सहमत नाही.

**निष्कर्ष :-** वरील प्रश्नाशी सहमत असणाऱ्याची संख्या सर्वात जास्त २८% आहे.

२. मुलांमध्ये एकलकोंडे पणा वाढला का?

अध्ययनास निवडलेल्या ५० उत्तरदात्यांपैकी, वरील प्रश्नाशी सहमत असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या २७ असून त्यांचे शेकडा प्रमाण २७ % आहे व वरील प्रश्नाशी असहमत असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या २२ असून शेकडा प्रमाण २२ % तर यापैकी नाही उत्तराशी कोणीही सहमत असणाऱ्या संख्या ०१ आहे.

**निष्कर्ष :-** वरील प्रश्नाशी सहमत असणाऱ्याची संख्या सर्वात जास्त २७ % आहे.

३. या काळात समाजातून तुम्हाला वागणूक चूकीची मिळाली का ?

अध्ययनास निवडलेल्या ५० उत्तरदात्यांची, वरील प्रश्नाशी सहमत असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ३७ असून त्यांचे शेकडा प्रमाण ३७% आहे व वरील प्रश्नाशी असहमत असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या १२ असून शेकडा प्रमाण १२% तर यापैकी नाही उत्तराशी कोणीही सहमत असणाऱ्यांची संख्या ०१ % आहे.

**निष्कर्ष :-** वरील प्रश्नाशी सहमत असणाऱ्याची संख्या सर्वात जास्त ३७% आहे.

**४.कामगाराच्या कौटुंबिक स्थितीचा अभ्यास:**

१.कोरोना मुळे तुमच्या कुटुंबात कोणाचा मृत्यू झाला का?

अध्ययनास निवडलेल्या ५० उत्तरदात्यांपैकी, वरील प्रश्नाशी सहमत असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या १६ असून त्यांचे शेकडा प्रमाण १६ % आहे व वरील प्रश्नाशी असहमत असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ३४ असून शेकडा प्रमाण ३४% तर यापैकी नाही उत्तराशी कोणीही सहमत नाही.

**निष्कर्ष :-** वरील प्रश्नाशी सहमत असणाऱ्याची संख्या सर्वात जास्त १६% आहे

२. लॉकडाऊन मध्ये तुम्ही तुमच्या कुटुंबाबरोबर वेळ घालवला का?

अध्ययनास निवडलेल्या ५० उत्तरदात्यांपैकी, वरील प्रश्नाशी सहमत असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ४१ असून त्यांचे शेकडा प्रमाण ४१ % आहे व वरील प्रश्नाशी असहमत असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ०९ असून शेकडा प्रमाण ०९ % तर यापैकी नाही उत्तराशी कोणीही सहमत नाही.

**निष्कर्ष :-** वरील प्रश्नाशी सहमत असणाऱ्याची संख्या सर्वात जास्त ४१% आहे.

३. तुमच्या कुटुंबात तुम्ही एकटेच कमावतात का ?

अध्ययनास निवडलेल्या ५० उत्तरदात्यांपैकी, वरील प्रश्नाशी सहमत असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या २५ असून त्यांचे शेकडा प्रमाण २५ % आहे व वरील प्रश्नाशी असहमत असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या २३ असून शेकडा प्रमाण २३% तर यापैकी नाही उत्तराशी कोणीही सहमत असणाऱ्याची संख्या ०२% आहे

**निष्कर्ष** :- वरील प्रश्नाशी सहमत असणाऱ्याची संख्या सर्वात जास्त २५% आहे.

**निष्कर्ष:** १. कोविड १९ काळात हातगाडी कामगारांना बऱ्याच आर्थिक, सामाजिक व कौटुंबिक समस्यांना सामोरे जावे लागले. २. कोविड १९ च्या काळात हातगाडी कामगाराचा व्यवसाय ठाप्पं झाला त्यामुळे या लोकांना दैनंदिन गरजा पूर्ण कशा करायचा या संदर्भातला गंभीर प्रश्न त्यांच्या समोर उभा राहिला. ३. कोविड १९ काळात हातगाडी कामगारच्या बऱ्याच कौटुंबिक सदस्यांचा मृत्यू झाला त्यामुळे त्यांचे मानसिक

स्वास्थ बिघडले. ४. कोविड १९ मुळे त्यांच्या मुलांच्या मानसिकतेवर परिणाम झाला एकलकोंडेपणा या सारख्या समस्येचा सामना करावा लागला. ५. या काळात रोगप्रतिकार औषधांचे बाजारीकरण मोठ्या प्रमाणात झाले. ६. कोविड १९ काळात सरकारने सांगितलेले नियम आरोग्यहितासाठी आवश्यक होते परंतु, सारखे लॉकडाऊन झाल्यामुळे उपासमारीची वेळ आली. ७. कोविड १९ मध्ये हातगाडी कामगारांच्या मुलांचे शिक्षण online झाले त्यामुळे नवीन मोबईल, रिचार्ज या सारख्या अतिरिक्त पैशाची गरज पूर्ण करावी लागली. ८. कोविड १९ काळात हातगाडी कामगारवर समाजाकडून वाईट वागणूक दिली गेली. त्यांच्या कडून माल घेणे लोकांनी बंद केले त्यांना नगरामध्ये प्रवेश बंद केले. एकंदरीतच तुच्छ वागणुक मिळाली. ९. कोविड १९ काळात हातगाडी कामगारांचा वस्तूची नेआण करण्याचा प्रश्न निर्माण झाला त्यामुळे वाहतूक विस्कळीत झाली. माल हवा त्याच जागेवर राहिला त्यामुळे तो माल खराब झाला. १०. या काळात हातगाडी कामगारांनी पर्यायी व्यवसाय केला परंतु त्यात त्यांना यश आले नाही. ११. कोविड १९ काळात आर्थिक अडचण, पैशाची कमी, कुटुंबाच्या काळजीचा प्रश्न, व्यवसाय मंदी यामुळे मनात नकारात्मक विचार येऊ लागले.

**उपाययोजना:** १. हातगाडी कामगारांना पूरक व्यावसायची माहिती देणे. २. हातगाडी कामगारांच्या कुटुंबाला स्वस्त धान्य उपलब्ध करून देणे. ३. हातगाडी कामगारांना वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देणे. ४. हातगाडी कामगारांसाठी आरोग्य विमा सेवा उपलब्ध करून देणे. ५. मानसिक तानतणाव संतुलीत राहण्यासाठी हातगाडी कामगारांसाठी फ्री योगा शिबिरांचे आयोजन करणे. ६. हातगाडी कामगारांना सरकारमान्य पेन्शन मिळायला पाहिजे. ७. या काळात हातगाडी कामगारांना आर्थिक अडचणीचा सामना मोठ्या प्रमाणात करावा लागला. यामुळे बचत करणे किती आवश्यक आहे हे त्यांना कळेल जेणे करून पुन्हा भविष्यात अशा प्रकारची महामारीचे सावट जगावर आले तर बचत केलेल्या पैशाची मदत या आर्थिक मंदीच्या काळात होईल. या विषयी जागरूकता पसरवायला हवी. ८. या भयंकर महामारीच्या काळात शारिरीक, मानसिक स्थिती जपणे खूप आवश्यक असते. यासाठी योगा, मेडीटेशन, प्रेरणादायी चित्रपट, आत्मचरित्र यांचे सामूहिक आयोजन या वर्गासाठी सुट्टीच्या दिवशी केले पाहिजे. ९. या महामारीच्या काळात हातगाडी कामगारांचा संपर्क अनेक लोकांशी येतो यामुळे हा वर्ग संसर्गित आहे अशी जनसामन्यात भीती असते पण असे असेलच असे नही, अशा वेळेस या लोकांचे विचार परिवर्तन करण्यासाठी नाटके, पथनाट्य, उदबोधन वर्गाचे आयोजन केले पाहिजे. १०. शिबिरे, कार्यशाळा यांचे आयोजन करून या वर्गाविषयी आपण सामजिक प्रबोधन करू शकतो. ११. हातगाडी कामगारांच्या कुटुंबीयांना देखील माफक दरात वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून दिली पाहिजे.

***संदर्भ ग्रंथ :-***


१. *सुधीर बोधनकर, सामाजिक संशोधन पद्धती, साईनाथ प्रकाशन,नागपूर, .२०१०*
२. *प्रदीप आगलावे, समाजशास्त्र संकल्पना आणि सिद्धांत, साईनाथ प्रकाशन, नागपूर,२०१०.*
३. *दा.धो.काचोळे, संजय भा. साळुंके, समाजशास्त्रीय सिद्धांत आणि संशोधन प्रक्रिया, कैलाश पब्लिकेशन्स, गोकुलवाडी, औरंगपुरा, औरंगाबाद, २०१२.*
४. *दिलीप खैरनार, समाजशास्त्र परिचय, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००८.*
५. *आर. के. दातीर, जी. जे. लोमटे, भारतीय अर्थव्यवस्था, समस्या आणि भवितव्य, निराली पब्लिकेशन्स.*
६. *https://imirror.digital/?p=6183*
७. *https://www.maharashtrajanbhumi.in/2022/04/*
८. *https://mahitiasaylachhavi.com/e-shram-card-online-registration-process/*
९. *https://mulukhmaidan.com/*
१०. *https://mr.wikipedia.org*
११. *https://www.ijcrt.org/papers/*

I S S N 2278 - 3199

Published By

DEPARTMENT OF SOCIOLOGY

**SETH NARSINGDAS MOR ARTS, COMMERCE & SMT. GODAVARI DEVI SARAF SCIENCE COLLEGE**

TUMSAR, DIST. BHANDARA - 441912.

Email-principalsnmorcollege@rediffmail.com / rjbhagat1968@yahoo.co.in
Website - www.snmorcollege.org.in Journal Website: www.journalsnmcsip.org.in
Phone No. - 07183-233300 / 07183-233301 Mobile - 09422113067 / 09420359657